# महाभारत

## महाभारत खंड सातवा

## सभापर्व भाग दुसरा

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत


## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट  किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न के यास कायदेशीर कारवाय होऊ शकते .



ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**



©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी  किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**प्रकाशन : १० ऑगस्ट २०१८**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत साधारणपणे चाळीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे

जाईल अशी अपेक्षा आहे. त्यात मूळ महाभारताचे खंड केले आहेत, त्यातील हा सातवा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.
माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.
आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई–मेल – ashokkothare@gmail.com

ह्या वरुन आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

माझे विचार व संशोधन कांहीं ब्लॉग मधून प्रसिद्ध करत असतो ते असें –

You are invited to visit my other blogs

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/

for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

You may visit blog, Ideas and tips on any subject,

http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते
Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/



ह्या खंडातील प्रकरणे खालील प्रमाणे आहेत

सभापर्वातील दुसर्या भागातील पर्व – द्यूत पर्व आणि अनुद्युता पर्व आहेत.

# सभा पर्व भाग शेहेचाळीस

(द्युत पर्व सुरु)

वैशंपायन सांगतात, तो सर्वात अवघड समजला जाणारा राजसूय यज्ञ पांडव यशस्वीरित्या तडीस नेतात. व्यास त्यांच्या शिष्यांसह युधिष्ठीराला भेटतात. त्याना पाहून तो राजा मोठ्या विनम्रतेने उठून उभा राहतो, त्याच्या बरोबर त्याचे चार भाऊ असतात. व्यास महर्षी जे त्याचे पितामह होते, त्यांची पादपुजा करून त्यांना व त्यांच्या सर्व शिष्यगणांना बसण्यासाठी सोन्याची झालर लावलेल्या मऊ गालिचा असलेल्या बैठकींची आसन व्यवस्था करतो, त्यानंतर तो त्यांचे क्षेमकुशल विचारतो. महान ऋषी कृष्ण द्वैपायनाने आसन ग्रहण केल्या नंतर ते युधिष्ठिराला सांगतात कीं, त्यांने उभे रहाण्याची आवश्यकता नाही. तो व त्याचे भाऊ त्यानंतर बसतात. त्या नंतर व्यासमुनी बोलतात, "अरें कुंतीसुता , तुझे नशिब थोर झाले आहे. कोणालाही मुष्किलीने मिळणारे सम्राटपद तुला एकदाचे प्राप्त झाले आहे. तुझ्या कर्मामुळें सगळ्या कौरवांचा त्यामुळें फायदा झाला आहे. माझा यथायोग्य सन्मान तू केला आहेस तरी आता मी तुमची रजा घेऊ इच्छितो". ते ऐकून युधिष्ठीर त्यांना वंदन करतो. त्यांचे पाय स्पर्शून तो त्या सावळ्या वर्णाच्या ऋषीस, त्याच्या पितामहास सांगतो, "अहो महर्षी, माझ्या मनांत कांहीं शंका उत्पन्न झाली आहे त्याबद्दल आपल्याला कांहीं विचारण्याची परवानगी द्यावी. त्यांचे निरसन जर आपण केले तर कृपा होईल. आपण अवतारी पुरुष अहात तेव्हां आपणच त्या शंकेचे निरसन करू शकाल असें मी समजतो". पुढे तो विचारतो, "जगद्गुरू नारद म्हणाले होते, ह्या राजसूय यज्ञामुळें फायदे (शुभादेश) मिळतात. ते स्वर्गीय, आकाशी आणि भौतिक असतात. मला विचारावयाचे आहे किं, शिशुपालाच्या वधामुळें त्यावर कांहीं परिणाम झाला आहे कां"?

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराचे ते ऐकून तो पराशराचा पुत्र, कृष्णद्वैपायनी, ज्याची कांति सावळी होती व जो दिसण्यात अतिकुरूप होता, ते सांगतात, "तेरा वर्षांसाठी ते फार मोठा आघात तुझ्या कारकिर्दीवर पाडू शकतात. त्यामुळें मोठा विध्वंस सुद्धा होऊ शकतो. अरे राजराजेश्वरा, सगळ्या क्षत्रियांना तो भोगावा लागणार आहे तुझ्या कारणांने.

अरे भरत कुळी, हे समजून घे की, त्याला तुम्ही कारण असणार अहात". मोठ्या प्रमाणात क्षत्रियांचा संहार होईल. त्यास कारण असेल तुझ्या चुलत भावाचे, दुर्योधनाचे पापकर्म आणि तुझ्या भिम व धनंजयाचे सामर्थ्य". ते सांगितल्यानंतर तो महामुनी युधिष्ठीराला सांगतो, "अरे पंडुपुत्रा, आज रात्री तुला एक स्वप्न पडेल, त्यात तू नीलकंठी भवांस (शंकर), ज्यांने त्रिपुराचा वध केला होता, तो समाधिस्थ असल्याचे तू पहाशिल. त्याचे चिन्ह असेल नंदी जो माणसाच्या कवटीतून रक्त पित आहे असें तुला दिसेल. फार भयंकर असें ते दृष्य असेल. तो देवादिदेव, उमेश्वर ज्याला एरव्ही हर, वृषा अथवा शर्व म्हणतात, त्याच्या हातात त्याची हत्यारे त्रिशूळ, पिनाक नांवाचे धनुष्य असतील आणि अंगावर व्याघ्रचर्माचा अंगरखा असेल. तूला तो दिसेल जसा शुभ्र कैलाश, उंच आकाशाला भिडणारा, जो दक्षिणेकडे वेगांने जात आहे आणि त्याच्या पुढे पितरांचा राजा (वेताळ) त्याचा मार्ग तयार करत आहे. असें स्वप्न तू पुनः पुन्हा पहाशिल. अरें राजा असें स्वप्न दिसले म्हणून कष्टी होऊ नकोस. हा सगळा काळाचा महीमा आहे, त्याला कोणीही थांबवू शकत नाही. तुझे कल्याण हो". त्यानंतर तो ऋषी राजाला सांगतो, "मी आता कैलास पर्वताकडेच प्रयाण करत आहे. तेव्हां तू तुझे राज्य शांत चित्ताने, सामंजस्याने, सावधगिरीने, विवेकाने आणि कष्टपूर्वक साभाळ त्यात तुला तुझे चार पांडव मदत करतील".

वैशंपायन पुढे सांगतात, वेदाचे पालन करणारा तो कृष्ण द्वैपायन आपल्या शिष्यांसह कैलास पर्वताकडे निघाला. त्याचे आजोबा ते सांगून गेले परंतु, त्यामुळें युधिष्ठीराचा घोर वाढला. तो त्यावर सतत विचार करत राहिला. तो समजतो कीं, ज्याअर्थी ते असें सांगतात त्याअर्थी ते तसे घडणारच. त्याचा मुकाबला आपल्याला स्वसामर्थ्यानेच करावा लागेल. त्या विचारांने प्रेरीत झालेला युधिष्ठीर त्याच्या भांवांना बोलतो, "अरे माझ्या मर्द भावंडानो तुम्ही ऐकले आहे आपले आजोबा काय बोलून गेले. त्यामुळें मी असा निश्चय केला आहे कीं, मी माझा अंत केला पाहिजे कारण ह्या सगळ्या गोष्टींना मींच कारण आहे, सगळ्या क्षत्रियांच्या नाशास मींच जबाबदार आहे. जर काळांने असेंच ठरवले असेल तर माझ्या रहाण्यात कांहींच अर्थ रहात नाही". असे नैराश्यपूर्ण बोलणे मोठ्या भावाचे ऐकल्यावर अर्जुन बोलतो, "अहो राजर्षी अशा भयंकर नाशाचे ऐकल्यावर असें बोलणे

कितपत योग्य ठरेल"? "थोडा धीर धरा, हिम्मत वाढवा, त्यातून काय मार्ग आहे त्याचा विचार करा". ते ऐकूनही युधिष्ठीर द्वैपायनांचे उद्‌गार आठवत अर्जुनाला बोलतो, "तुझे कल्याण हो, परंतु, ह्यापुढे माझा निर्धार काय असेल ते सांगतो, आज पासून पुढची तेरा वर्षे मी माझ्या राज्यात रहाणार्या माझ्या मित्रांना अथवा नातेवाईकांना अथवा इतर कोणालाही कठोर वचनाने दुःख देणार नाही. मी सातत्याने पुण्ण्याचाच मार्ग आचरीन, माझी अशी कल्पना आहे कीं, मी असें वागल्यामुळें कोणीही माझ्यामुळें दुखावले जाणार नाही व त्यामुळें कोणाशीही शत्रूत्व होणार नाही. माणसे दुखावली गेली कां शत्रूत्व व त्यामुळें युद्ध होत असतात पण जर शत्रूत्वच नसेल तर युद्ध उद्भवणार नाही व तो व्यासांनी सांगितलेला विनाश आपण टाळू शकू"! "नेहमी इतरांना खूष ठेवल्यामुळें सगळे आनंदात रहातील, असे वागल्याने माझी ख्याति होईल". सदैव मोठ्या भावांचे ऐकणारे ते सगळे पाडव त्या धोरणाला मान्यता देतात. हे ठरल्यावर तो राजा युधिष्ठीर आपले भाऊ आणि दरबारी पंडीतांच्या बरोबर नेहमीचे धार्मिक विधी ज्यांमुळें विविध दैवते संतुष्ट होतात ती उरकतो. त्यानंतर त्याच्या कडे यज्ञा निमित्ताने आलेले समस्त राजे त्यांचा पांडवांचा निरोप घेतात आणि आपापल्या राज्याकडे रवाना होतात. युधिष्ठीर त्याच्या भावंडांसह आपापल्या निवासस्थानी जातात. परंतु, त्यांचे चुलत भाऊ, दुर्योधन त्याच्या जोडीदारांसह म्हणजे शकुनी, सुवलाचा मुलगा तेथेच वस्ती करून रहातात.

आशारितीने सभा पर्वातील द्युत पर्वाचा शेहेचाळीसावा भाग संपला.

# सभा पर्व भाग सत्तेचाळीस

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, तो सामर्थ्यवान दुर्योधन पांडवांच्या सभागृहातील पाहुण्यांच्या कक्षातच राहतो. शकुनी बरोबर तो कपटी दुर्योधन कांहीं दुष्ट बुद्धीने त्या महालाचे बारीक निरीक्षण करत फिरत असतो. त्या महालातील बर्याच दैवी रचनांचा तो नीटपणे अभ्यास करत असतो. त्याला त्या कामात त्याचा मामा शकुनी आणि सुवल पुत्र मदत करत असतो. दुर्योधन समजतो कीं, त्या सभागृहात असलेल्या कित्येक गोष्टी त्याला नव्या होत्या. एक दिवस त्या महालातील विविध दालनांतून फिरत असतांना तो एका स्फटीकाच्या तक्तपोशीकडे पहातो. त्याला वाटते तो नितळ स्वच्छ पाण्याचा तलाव आहे व तसे समजल्याने तो आपले कपडे उतरवून त्यात उडी मारतो. पण ती घन जमीन असल्यामुळें त्याला जबरी मार बसतो. त्याचे त्याला फार वैषम्य वाटते. पुढे तो एक असाच भाग पहातो तो त्याला जमीन समजतो व त्यात पाय ठेवतो पण ते पाणी होते त्यामुळें तो त्या तलावात बुडण्याची परिस्थिती उत्पन्न होते. त्याला एका ठिकाणी सुंदर कमळें दिसतात पण नंतर त्याला समजते कीं, ती खरी नसून दगडाची आहेत. अशामुळें त्याची सतत फटफजिती होत रहाते. त्याच्यावर भिमाची तीक्ष्ण नजर असते, एकदा असांच तो जमीन समजून उतरण्यासाठी त्यात जातो तर ते पाणी असल्यामुळें तो त्यात पडतो व पूर्णपणे भिजतो. ते भिम पहातो व जोरजोराने हंसू लागतो. त्या त्याच्या हसण्याचा दुर्योधनाला फार राग येतो पण तो कांहीं करू शकत नाही. अशारितीने प्रत्येक वेळी त्याची होणारी फटफजिती पाहून भिम हसत असल्यामुळें आणि त्यांच्या बरोबर तेथील कर्मचारीसुद्धा त्यात सामील होत असल्यानें त्या कौरवाचा पांडवांवरील द्वेष कणा कणाने वाढत जातो. भिम मुद्दाम त्याच्या मागे राहून तो कसा व कोठे फसतो ते पहात असतो, जणू काय ते त्याचे विरंगुळ्याचे एक साधन झाले होते. पुढे पुढे भिमाच्या जोडीला अर्जुन सुद्धा सामील होऊ लागला होता. तेवढ्याने भागत नसल्यामुळें कीं काय, त्यांच्या बरोबर नकुल व सहदेव सुद्धा दुर्योधनाचे मागून जाऊन त्याचा पिच्छा पुरवत होते. दुर्योधन हा एक करमणूकीचा विषय जणू झाला होता त्या सगळ्या पांडवांसाठी. दुर्योधनाला त्यांचे ते हसणे सहन होत नव्हते. दुर्योधनाला कोणीही हस्तिनापुरात हसत नसें, त्याला अशा

वागवणूकीची सवय नव्हती. त्यामुळें त्याचा संताप अनावर होत होता. परंतु प्रत्येक वेळी असे कांहीं होत असें कि तो हसण्याचा कारण बनत असें. दुर्योधन वरकरणी त्यांच्याकडे लक्ष नसल्याचे दाखवत असला तरी त्यांचे मुद्दाम त्याच्या आवती भोवती असणे केवळ त्याला फसतांना पहाण्यासाठी होते हे तो चांगलेच समजत होता. एकदा तो हस्तिनापुराचा राजा अशाच एका सुक्या भागातून जातांना तेथे पाणी आहे असें समजून आपले कपडे वर उचलून त्यातून जाऊ लागतो व ते करतांना त्याला नंतर समजते किं, तेथे पाणी अजिबात नाही. त्या नंतर तो तसांच त्यातून जात असतांना न दिसणार्या भिंतीवर तो जाऊन आदळतो, ते पाहून सगळे पांडव त्याला जोरजोरांने हसू लागतात. दुर्योधन मात्र स्वताचे डोके हातात धरून बसतो. त्या हस्तिनापुरच्या राजाला त्याच्या राज्यात कोणी हसत नव्हते मात्र येथे अगदी सामान्य सेवक सुद्धा त्याला नुसते पाहिले तरी आधी घडून गेलेल्या गोष्टींच्या आठवणींने हसत असत. एकदा एक दरवाजा त्याला दिसतो म्हणून तो त्यात शिरण्याचा प्रयत्न करतो तर ती भिंत असते त्याच्याच बाजूला भिंत दिसत असते, पण प्रत्यक्षात तो उघडा दरवाजा असतो. अशा अनेक प्रकारे त्याची फसगत होत असें व त्यामुळें तो मानी राजा मनातल्या मनाता चरफडत असतो. त्या सगळ्या हसण्याचा सूड उगवण्याचा तो मनातल्या मनात निर्धार करत असतो. अशा मामुली गोष्टींमुळें कौरव आणि पांडवांच्यातील तेढ मात्र दिवसें दिवस वाढत असते परंतु, पांडवांना मात्र ते लक्षात येत नव्हते. त्या सभागृहात अशारितीने फिरत असतांना त्याला राजसूय यज्ञात पांडवांनी जमा केलेली अफाट संपत्ति सुद्धा पहात असतो. प्रत्येक दालनात कित्येक मण सोने, रत्नं जवाहीरे असें सगळे तो पहात असतो. ते सगळे व्यवस्थितपणे लक्षात घेऊन तो आता हस्तिनापुरात परतण्याचे ठरवतो. ते पांडवांचे वैभव पाहून त्याच्या मनात पापी विचार उत्पन्न होऊ लागतात. स्वताचे कित्येक वेळा हसें झाल्याच्या मनस्तापात भर म्हणून कीं काय, त्याला पांडवांचे वाढते राजकीय सामर्थ्य आणि ज्या प्रकारे पृथ्वीचे राजे त्याला खंडणी देत होते ते पाहून त्याची झोप उडलेली असते. त्यांची सगळी प्रजा युधिष्ठीराची सेवा मनोभावे करतांना त्यांने पाहिले होते ते सगळे समजल्यावर आपण त्यांच्या तुलनेत कोठेच नाही हे लक्षात आल्यावर तो बेचैन होतो. त्याला त्या दैवी सभागृहाच्या आठवणी सतावत होत्या. त्यांचे वैभव आणि त्यांना मिळणारे प्रजेचे सहकर्य असें सगळे त्याला

अस्वस्थ करत होते. मत्सर आणि द्वेष ह्याने त्याचे उर भरलेले होते. प्रवासात तो कांहीं बोलत नाही ते पाहून सुवलाचा मुलगा आणि त्यात तो त्याचा मामा पुनः पुन्हा त्या गोष्टींची आठवण करून भर घालत होते. तो त्याच्या पापी मनाला उत्तेजित करण्याचा प्रयत्न करत होता. तो बोलत होता, "अरें, असा काय नाराज होत आहेस".

तो दुर्योधन त्याच्या मामाला, शकुनीला बोलतो, "अरे मामा, अर्जुनाच्या शस्त्राने जे कमावले आहे, भिमाच्या शौर्याने व इतर दोघांच्या सामर्थ्याने जे युधिष्ठीराने जे मिळवले आहे ते पाहून मी थक्क झालो आहे. त्यात युधिष्ठीराचे दातृत्व इंद्रालासुद्धा लाजवेल असे आहे ते सुद्धा मी पाहिले आहे, त्या सगळ्यामुळें माझा त्यांच्या बद्दलचा मत्सर वाढला आहे आणि म्हणून मी बेचैन झालो आहे. काय करावे ते समजत नाही. असेंच जर होत गेले तर मी सुकून जाईन, मरून जाईन. शिशुपालाचा वध कृष्णाने केला त्या बिचार्या शिशुपालाला कोणी मदत करण्यासाठी पुढे आला नाही, ह्याचा अर्थ काय? पांडवांना भिऊन ते सगळे राजे गप्प बसले दुसरे काय समजावयाचे? त्या एका कृतीमुळें पांडवांची ताकद एवढी वाढली कीं, सगळे त्याना खंडणी गुपचुप देत होते. हा सरासर अन्याय आहे राजे लोकांवर, नाही कां? जसे वैश्य पैसे गुपचुप आणून देतात राजांना तसे अक्षरशः होत होते. म्हणजे आम्ही राजे ह्या पांडवापुढे वैश्यासमान झालो आहोत काय? त्या पंडुच्या मुलांचे ते वैभव मला अक्षरशः जाळत आहे. मी काय करावे"? अशा प्रकारे आपले दुःख मामाला सांगून नंतर तो बोलतो, "मी ठरवले आहे किं, एक तर मी स्वताला अग्नीच्या हवाली करावे अथवा वीष खाऊन मरून जावे किंवा पाण्यात जीव द्यावा असे विचार सतत माझ्या मनात येत आहेत. अशा जगण्यात काय अर्थ आहे अरे मामा सांग"? "आपले शौर्य काय कामाचे जर आपल्याला आपला शत्रू मोठा होत आहे, मजेत रहात आहे व मला फालतू कारणांवरून हसत आहे, ते पहात बसावे लागणार असेल तर. मी माझ्या बळांवर अशी संपत्ति कधीच मिळवू शकणार नाही. मला असें दोस्तसुद्धा नाहीत ज्यांच्या मदतीने मी असें कांहीं करू शकेन. त्यासाठी मी स्वतःचा नाश करणेंच योग्य समजतो. त्याला दुसरा पर्याय मला तरी दिसत नाही. आता माझी खात्री पटू लागली आहे कीं, नशीबाला कोणी हरवू शकत नाही. पांडवाच्याकडे जे नशीब आहे त्यापुढे आपले नशीब कुचकामी ठरणार आहे. मी किती किती केले त्या कुंतीपुत्रांना हतबल करण्यासाठी पण प्रत्येक वेळी असे

कांहीं होई व ते निसटून जात. सगळी आपली कारस्थानं फुकट गेली हे तुम्हाला दिसत नाहीं कां? आमच्या पित्याची मुलं सावकाशपणे नष्ट होत आहेत आणि पृथाची मुलं संपन्नतेकडे जात आहेत, ते मूर्ख सेवक न घाबरता मला हसत आहेत, ते विलक्षण सभागृह, हे सगळे आता मला सहन होत नाही रे माझ्या मामा, शकुनी. मला ह्यातून कांहींच मार्ग दिसत नाही. अरे मामा, मी हे सगळे माझ्या पित्यास कोणत्या तोंडाने सांगू कीं, मी पांडवांपुढे कुचकामी आहे".

अशारितीने सभा पर्वातील द्युत पर्वाचा सत्तेचाळीसावा भाग संपला.

# सभा पर्व भाग अठ्ठेचाळीस

(द्युत पर्व पुढे चालू)

ते दुर्योधनाचे हताशपणे काढलेले बोलणे ऐकून शकुनी मामा त्याला सांगतो, "अरे दुर्योधना पांडवांचे नशिब बलवत्तर आहे त्याकरता त्यांचा द्वेष करून तुला कांहीं फायदा होणार नाही. पंडुची मुलं त्यांचे सुख भोगत आहेत. त्यांच्या गत कर्माप्रमाणे त्यांना त्याची उत्तम फलं उपभोगण्यासाठी मिळत आहेत. त्याचा विचार करण्यात काय अर्थ आहे? त्यासाठी कितीही कारस्थानं केलीस तरी त्यांना तू खलास करू शकणार नाहीस. कितीतरी कारवाया तू म्हणतोस त्याप्रमाणे आधीच अजमावून पाहिल्या आहेस हे तू मघा सांगितले आहेस. नशिब असले कीं असेंच होते कांहींही उपयोग होत नाही. असें पहा, त्यांना द्रौपदी मिळाली, त्यामुळें द्रौपदासारखा महाबली दोस्त झाला, त्यानंतर असे पहा कृष्ण त्यांचा मित्र झाला आहे. त्या एकाच्या ताकदीने तो युधिष्ठीर सगळे जग पादाक्रांत करू शकतो. त्याशिवाय त्याच्या पित्याचा हिस्सा त्याना विना मेहनत मिळाला त्यात त्यांनी स्वबळावर आणखीन राज्य वाढवले, त्यात तुला वाईट वाटण्यासारखे काय आहे? तू जळून त्यांचे काय बिघडणार आहे? उलट तुझी प्रकृती बिघडेल, त्याचा कदाचित त्यांना फायदा होईल! त्या हुताशनाला (अग्नीदेव) संतुष्ट करून त्याच्या कडून गांडीव धनुष्य मिळवले, त्याबरोबर दोन कधीही न संपणारे भाते मिळवले, आणि आणखीन कितीतरी दैवी शस्त्रे व अस्त्रे मिळवली, त्या विलक्षण शस्त्रांच्या मदतीने व त्याच्या स्वताच्या कौशल्याने त्यांने साम्राज्य उभे केले आहे. त्यात तूला कां जलन होते ते मला कळत नाही. त्या मायासुराला त्यांने अग्नीदेवापासून वाचवले म्हणून त्या मायासुरांने उपकाराची फेड म्हणून तो सभागृह त्यांना बांधून दिले आणि त्या मायासुराचे किंकर जातीचे भयंकर दिसणारे राक्षस त्या सभागृहाचे संरक्षण करीत आहेत. म्हणून तू तेथे सतत मूर्ख होत होतास. आता ह्यात तुला मत्सर करण्यासारखे काय आहे ते मला समजत नाही. तू समजतोस कीं तुला दोस्त नाहीत. परंतु ते खरे नाही. तुझे सगळे कौरव बंधू तुझ्याशी प्रामाणिक आहेत. द्रोण आणि त्यांचा मुलगा हे तुझ्याकडे आहेत. त्यांच्या शौर्याची चर्चा नको असे ते आहेत, राधाचा मुलगा कर्ण सर्वस्वी तुझाच आहे. त्याशिवाय तुझे गुरू कृपाचार्य, गौतम, मी स्वतः, माझे सगळे बंधू, राजा सौमदत्त, असें तुझ्याकडे असतांना तू असा कां विचार करत आहेस? ते

सगळे एकत्र आले तर ते पृथ्वी काबिज करू शकतील हे तू जाणतोस". ते समजावणीचे सांत्वन करणारे शकुनीचे बोलणे ऐकल्यावर दुर्योधन उत्तेजित होऊन त्याला सागतो, "तू म्हणतोस ते खरे आहे, तुमच्या मदतीने मी पांडवांना हरवून ते सभागृह, ती अफाट संपत्ती आणि ते साम्राज्य मला जिंकता येईल हे माझ्या लक्षातच आले नाही".

ते ऐकल्यावर शकुनी त्याला सावध करण्याच्या अविर्भावात सांगतो, "अरे पण ते धनंजय, भिम, वासुदेव, नकुल, सहदेव, द्रौपद, त्याचा मुलगा हे सगळे दैवी शक्तीने प्रभावित असल्यामुळें आपण त्या मार्गाने त्याना कधीच जिंकू शकणार नाही. तरी त्यात एक कच्ची कडी आहे व ती आहे युधिष्ठीर स्वतः, त्याला द्युत खेळण्याचा मोह आवरता येत नाही. त्या गोष्टीचा जमलं तर आपण उपयोग करू शकतो. त्या मार्गाने आपण त्यांना बरबाद करू शकतो. पण त्यासाठी तुला माझे ऐकावे लागेल. ह्या एका पांडवाला द्युत खेळण्याचा नाद आहे त्याचा मी उपयोग करून त्याची सगळी संपत्ति त्याच्या कडून काढून घेऊ शकतो. एक गोष्ट अशी किं. जरी त्याला द्युत खेळण्याचा छंद असला तरी त्याला तो नीटपणे खेळता येत नाही, त्या उलट मी द्युत उत्तम खेळू शकतो. त्यामुळें कोणतीही लढाई न करता केवळ द्युताच्या डांवाने आपण त्याचे सर्वस्व काढून घेऊ शकतो. आपण त्याला द्युत खेळण्याचा आग्रह करावा, तो त्याला नाकारू शकणार नाही. एकदा कां तो खेळावयास बसला कीं मी त्याला द्युतात बाद करून सगळे जे त्याचे आहे ते आपल्या ताब्यात घेऊन त्याला हकलवून देऊ. त्याची भावंड त्याच्या आज्ञेत आहेत हे आपल्यासाठी सोईचे आहे कारण, ते त्याला द्युत खेळण्यापासून अडवू शकणार नाहीत. हे तू तुझ्या पित्याला सांग व त्यांना राजी कर बाकीचे काम मी सांभाळीन". दुर्योधन त्यावर खूष होतो व तसें करण्याचे ते ठरवतात. तो सांगतो कीं, "त्याबद्दल धृतराष्ट्राला त्यांनेच त्याप्रमाणे समजावावे व राजी करून घ्यावे. कारण मी ते करू शकणार नाही. तू त्यांचा लाडका आहेस म्हणून तुला ते नाही म्हणणार नाहीत".

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा अठ्ठेचाळीसावा भाग संपला.

# सभा पर्व भाग एकोणपन्नासावा

(द्युत पर्व पुढे चलू)

वैशंपायन पुढे सांगतात, सुवलाचा मुलगा, शकुनी, युधिष्ठीराच्या राजसूय यज्ञामुळें प्रभावित झालेला, आता दुर्योधनाच्या चिंतेचा विचार करून त्यावर उपाय करण्याच्या उद्देशांने धृतराष्ट्राला भेटण्याचे व त्याचा इरादा सांगण्याचे ठरवतो. त्या राजाला भेटून तो गांधारीचा भाऊ त्यांना सांगतो, "पांडवांच्या श्रेयाचे दर्शन केल्यानंतर आपला पुत्र हतबल झाला आहे. त्याच्या चेहर्याचे रंग उडून गेले आहेत. तो फार दुःखी कष्टी झाला आहे. आपण त्याच्याशी बोलून काय मामला आहे ते समजून घ्यावे असें मला वाटते. कारण, अशा मानसिक अवस्थेत तो राज्याचा कारभार करू शकणार नाही. तो आपला ज्येष्ठ पुत्र असल्यामुळें त्याचे दुःख काय आहे ते आपण समजून घेण्याचा प्रयत्न कृपया करावा. कोण्या शत्रूच्या भितीने तर तो चिंतीत झाला नाही नां, ते पहावयाला पाहिजे आणि त्यावर यथोचित उपाय योजला पाहिजे". ते ऐकल्यावर धृतराष्ट्र दुर्योधनाला विचारतात, "माझ्या मुला, असें काय आहे ज्याची तुला खंत वाटते ते मोकळ्या मनांने सांग. जर ते मला सांगण्यासारखे असेल तरच सांग. हा शकुनी मला सांगतो आहे कीं, तुझ्या चेहर्याचा रंग उडला आहे त्या भितीमुळें, तर ती कोणती भिती आहे जी तुला सतावत आहे? मला समजत नाही असें कांहीं असू शकते ज्यामुळें तुला भिती वाटावी किंवा दुःख व्हावे. हि अफाट संपत्ती तुझ्या ताब्यात आहे आणखीन काय तुला पाहिजे? तुझे सगळे बंधू तुझे प्रामाणिकपणे ऐकत आहेत, आपले सगळे आप्त सुद्धा आपल्याशी एकनिष्ठ आहेत असें असतांना तुला चिंता कसली पडली आहे. तुझ्या सगळ्या निजी गरजा तुझ्या मनाप्रमाणे आहेत, तुझ्याकडे उत्तम घोडे, रथ, महाल, सुंदर दास्या, दागदागिने, खाणे पिणे, उत्तमोत्तम युद्धसामुग्री असें सगळे असतांना काळजी करण्यासारखे काय आहे? सगळे तुझे सेवक तुझ्या आज्ञेत आहेत मग कशाची तुला अशाप्रकारे फिकीर पडली आहे कीं, तुझा मामा मला येऊन सांगतो किं, तू पोरका झाला आहेस असा तुझ्या चेहर्याचा रंग पडला आहे"? ते ऐकल्यावर दुर्योधन त्याच्या पित्यास सांगतो, "अहो तात, मी एकाद्या पतिता सारखा खात पित जगत आहे. माझ्यातील मत्सराग्नी मला सतत जाळत आहे. मी असा आहे ज्याला त्याच्या शत्रूचे वर्चस्व पहात रहावे लागते आहे. आणि ते पहातच तो

कांहीं न करता आपल्या प्रजेला त्यांच्या कह्यात जातांना पहात आहे, असहायपणे. समाधानीपणा आणि दुराभिमान हे दोनही माणसाच्या प्रगतीला अडसर होतात. त्याच प्रमाणे, दयाबुद्धी व भिती हे सुद्धा शत्रूला मदत करत असतात. जे राजे ह्या चारांच्या प्रभावाखाली काम करतात ते कधीही उत्कर्ष पावत नाहीत. युधिष्ठिराचे वैभव पाहून आल्यावर मला माझी किंव वाटू लागली आहे. आम्ही कौरव पांडवांच्या मानाने तुच्छ ठरतो ही कल्पना मला खात आहे. ते माझे शत्रू इतके संपन्न आहेत व मी असा फालतु आहे त्यामुळें मला त्यांची संपत्ति आणि वैभव प्राप्त व्हावे असें वाटते पण ते कसे प्राप्त होणार ते समजत नाही, म्हणून मी बेचैन असतो. त्या कारणांने माझ्या चेहर्याचा रंग उडाला आहे. युधिष्ठीर अठ्ठ्यांऐशी स्नातकांचा पोशिंदा झाला आहे. त्या प्रत्येक पांडवाकडे तीस तरुण मुली दास्या म्हणून काम करत आहेत. त्याशिवाय आणखीन हजार ब्राह्मण दररोज त्याच्या वाड्यात जेवत असतात आणि ते पांडवांसाठी प्रार्थना करतात. ते प्रत्येक सोन्याच्या ताटात जेवतात. कंभोजच्या राजांनी त्याना भेट म्हणून उत्तम जातीच्या कडली सांबाराच्या कातडी पाठवला आहेत, त्यातील कांहीं काळ्या रंगाच्या तर कांहीं करड्या रंगाच्या व कांहीं लाल रंगाच्या अशा विविध आहेत, ते मी स्वतः पाहिले. हजारो मादी हत्तीणी त्याच्याकडे आहेत, तीस हजार उंटीणी आहेत, ते सगळे त्याच्या विशाल वाड्याच्या प्रांगणात मजेत फिरत असतात. त्यावरून ते सगळे किती विशाल असेल त्याची तुम्ही कल्पना करावी. ते सारे पृथ्वीवरील विविध देशांच्या राजांनी त्यांना भेट व खंडणीच्या स्वरुपात दिले आहे. त्याशिवाच रत्नं, माणकं, हिरे, असे जवाहराचे नुसते ढीग पडलेले मी पाहिले आहेत. त्याची गणती करू शकणार नाही इतके ते सगळे आहे. मी कधी अशा प्रचंड वैभवाची कल्पनासुद्धा करू शकत नाही. त्या यज्ञात पांडवांनी ती सगळी संपत्ती ब्राह्मणांना दान केली. ते पाहून पांडवाच्या क्षमतेची कल्पना येईल. मी त्यांच्याशी अशा गुणवत्तेत आमची तुलना करू शकत नाही. अहो राजे, माझ्या शत्रूची ती ताकद पाहिल्यामुळे माझी झोप उडाली आहे. कारण, अशा सामर्थ्यवान शत्रूला मी नेहमीच्या क्षात्र मार्गांने कधींच बरबाद करू शकणार नाही. त्यासाठी कोठलातरी वेगळा मार्ग वापरावा लागेल पण तो कोणता ते अजून लक्षात येत नाही. तरी माझ्या मामाने एक वैश्य मार्ग सांगितला आहे पण त्यासाठी आपल्या अनुमतिची आवश्यकता आहे. त्यांच्या वैभवाचे

काय वर्णन करू, मी  पाहिले आहे कीं, त्यांच्या वाड्या बाहेर आणखीन भेटी घेऊन माणसें आंत प्रवेश मिळण्यासाठी प्रतिक्षा करत होती. त्यांच्या कडे सोन्याच्या कमंडलूंत साजूक तुप होते. पांढर्या तांब्याच्या कळशांतून अशी सुरा आणलेली होती जी इंद्राच्या दरबारात मिळणार्या सुरेपेक्षा सरस होती. बाहेर उभ्या लोकांचा तेथे अपमान होत नव्हता. वासुदेवांने उत्कृष्ट शंख आणले होते कुंतीपुत्रांसाठी जे ते युद्धात वाजवणार आहेत. ते पाहून माझ्या हृदयाचा ठोकाच थांबला. जणू काय ती सगळी तयारी आमच्या विरुद्ध लढण्याचीच आहे असें वाटू लागले. त्यामुळें माझा त्यांच्या बद्दलचा द्वेष उफाळून आला आहे. तो असा सहजासहजी शांत होणारा नाही. यज्ञात वापरण्यासाठी पूर्व आणि पश्चिम समुद्रांचे पाणी असंख्य हंड्यांतून भरून आणले जात होते. तुम्हाला माहीत नाही पण मी सांगतो, त्या उत्तर प्रदेशात कोणीही जाऊ शकत नाही पण अर्जुन गेला होता व त्यांने तेथून खंडणी गोळा करून आणली होती जे आम्हाला केवळ अशक्य आहे. आणखीन एक विलक्षण गोष्ट मी अनुभवली जी मी तुम्हाला सांगतो, ती अशी कीं, असे ठरले होते किं, प्रत्येक एक हजार ब्राह्मणांच्या दानानंतर शंख नाद होणार. परंतु अहो राजे, माझे हृदय पिळवटून जाते ते सांगतांना कीं, तो शंखनाद सतत होत होता. म्हणजे कल्पना करा किती ब्राह्मण आले होते व कित्येक दान घेऊन आशिर्वाद देऊन जात होते. तो भव्य दरबार असंख्य राजे रजवाडे ह्यांनी तुडूंब भरला होता. जणू देवच पृथ्वीवर उतरले आहेत. तो नजारा प्रेक्षणिय होता, दुसरे कोणी असते तर माला फार काही वाटले नसते पण ते माझ्या वैर्याचे कौतुक होते म्हणून माझ्या नजरेत खुपत होते. एवढेच नाही तर ते राजे असें असें नजराणे पांडवांना देत होते कीं, ते पाहून एकाद्याचे डोळे दिपून जातील. राजाला खूष करण्यासाठी व्यापारी जसें भेटी आणतात तसे ते दृष्य होते. तात सांगा, मी हे कसे सहन करावयाचे"? "मी जे वैभव पांडवांच्या येथे पाहिले तसें वैभव इंद्र किंवा वरूण किंवा यमाकडे किंवा गुह्यकांकडे सुद्धा सापडणार नाही. त्यामुळें माझे हृदय आगीने भडकलेले आहे. त्यामुळें माझ्या मनाला शांती मिळत नाही". दुर्योधनाचे ते रुदन ऐकून शकुनी बोलतो, "माझ्याकडे त्यासाठी जालिम इलाज आहे त्या मार्गांने तू ती सगळी संपत्ती, ते सगळे वैभव तुझे करू शकशिल. त्या मार्गांने तुझे खरे होईल. मी द्युतात तरबेज आहे माझ्यासारखा द्युतपटु ह्या उभ्या जगात नाही. कुंतीचा मुलगा युधिष्ठीर जरी तो द्युत चांगला

खेळू शकत नसला तरी स्वतःला चांगला द्युतपटु समजतो. त्याचा फायदा उठवून आपण त्याला द्युत खेळण्याचे आमंत्रण द्यावे. पुढचे मी पाहून घेईन, माझ्या भाच्यांसाठी मी एवढे निश्चितच करू शकतो. नशिबावर अवलंबून रहाणारे द्युतासारख्या नशिबाच्या खेळांत रमतात. त्या पांडवांपैकीं एक युधिष्ठीर सोडला तर बाकीचे चार कर्तृत्वावर विश्वास ठेवणारे असल्यामुळे ते द्युत खेळत नाहीत परंतु, हा एकच असा पांडव आहे जो कर्तृत्वापेक्षां दैवावर जास्त भरवसा ठेवतो. त्यानेच म्हंटले आहे किं. राजसूय यज्ञ त्याने यशस्वी केला कारण त्याचे नशिब बलवत्तर आहे. तो नेहमीच त्याच्या बलवत्तर दैवाचा दिमाख दाखवत असतो. त्या यज्ञातील यश वस्तुतः त्याच्या इतर चार भावंडांचे आहे पण तो दैववादी ते मानत नाही. गंमत पहा त्याला बायकोसुद्धा त्याच्या भावांने मिळवलेली आहे. जे सगळे वैभव आहे ते त्या चारांनी कष्टाने मिळवलेले आहे व हा आयतोबा त्यावर राजा बनून राज्य करत आहे. नेहमी मोठ्या ज्ञानाच्या गप्पा मारत असतो. त्यांने कधीच कोणतेही कर्तृत्व गाजवल्याचे ज्ञात नाही. वडील भाऊ असल्याचा सतत गैरफायदा घेतच तो सगळी मजा करत आहे. आता पहा खंडणी गोळा करण्यासाठी त्याचे चार पराक्रमी भाऊ चार दिशांना गेले व मेहनत करत होते व हा दैववादी त्या कृष्णाबरोबर रंगेलिया करत इंद्रप्रस्थात बसला होता. ह्या त्याच्या मनोरचनेचाच आपण फायदा घेऊन त्याला द्युतात फसवून हरवून त्याचे सगळे त्याच्या कडून काढून घेऊ शकू. विशेष म्हणजे त्याचे धाकटे चारही बंधू कितीही मोठे शक्तिमान आणि कर्तृत्ववान असले तरी त्यांची एक कमजोरी आहे कीं, ते ह्या आळशी दैववादी दांभिक ज्येष्ठ भावाच्या आज्ञेत रहातात. ते त्याला तो चुकीचा असला तरी विरोध करत नाहीत, ह्या परिस्थितीचा आपण उत्तमरित्या उपयोग करू शकू. असें केल्याने युद्ध न करता आपण त्यांना बरबाद करू शकू व त्याने आपल्या दुर्योधनाला जर मनःशांती मिळत असेल तर ते करणे माझ्यामते श्रेयस्कर आहे. शत्रूच्या कमजोरी ओळखून त्यांचा वापर करणे ह्यालाच राजकारण असें म्हणतात". त्यावर धृतराष्ट्र शकुनीला विचारतो, "अरे सुवलपुत्रा, जर खरोखरच युधिष्ठीराचे दैव बलवत्तर असेल तर तुझे द्युताचे ज्ञान काय कामाचे"? ते ऐकल्यावर छद्मिपणे हसत शकुनी बोलतो, "जर दोघे बिड्डु प्रामाणिकपणे खेळत असतील तर निश्चिचपणे द्युत हा नशिबाचा खेळ आहे तसेंच जर दोघेही अप्रामाणिकपणे खेळत असतील तरसुद्धा बर्याचवेळी तो नशिबाचा खेळ असू

शकतो पण जेव्हां एक बिड्डु प्रामाणिक आहे व दुसरा अप्रामाणिक आहे तर त्या परिस्थितीत तो खेळ नशिबाचा रहात नाही. तो खेळ त्याच्या बाजूचा होतो जो अप्रामाणिकपणे खेळतो. ह्या ठिकाणी द्युत खेळला गेला तर त्यात युधिष्ठीर प्रामाणिकपणे खेळणार हे ठरलेले आहे व मी अप्रामाणिकपणेच खेळणार म्हणून, अहो माझे भाऊजी, जीत नेहमी आपलीच होणार आहे ह्याची खात्री बाळगा". द्युत प्रामाणिकपणे खेळणे म्हणजे मूर्खपणा असतो कारण कधीही कोणीही द्युती प्रामाणिकपणे खेळत नाही हे लक्षात ठेवा. परंतु, आपले युधिष्ठीर आळशी व मुर्ख असल्यामुळें तो प्रामाणिकपणेंच खेळेल म्हणून जीत आपलीच होईल. ह्यात मेख अशी आहे किं, जर आपण परवानगी दिली तर आपण त्याला हस्तिनापुरी आमंत्रण देऊन बोलवावे व त्याला गमतीने द्युत खेळण्याचे विचारावे. त्याचा त्याच्या दैवावर एवढा भरवसा आहे कीं, तो खात्रीने द्युत खेळण्याला तयार होईल. एकदा खेळ सुरु झाला कीं, तो त्यात फसत जाईल व एकामागोमाग एक असें सगळे त्याचे वैभव त्याला पणाला लावावयाला लावून ते जिंकून घेऊ. त्यांनंतर ती संपत्ती दुर्योधनाची म्हणून मग तो व त्याचे कौरव मजेत राहू शकतील. युधिष्ठीर सगळे हरल्यावर त्याच्या धाडशी व हिम्मतवान भावांना पुनः ते मिळवण्यास पाठवेल व पुन्हा श्रीमंत होईल त्याला त्यात काहींच करावयाचे नसेल".

वैशंपायन पुढे सांगतात, राजा दुर्योधन शकुनीच्या त्या वक्तव्यानंतर ताबडतोब आपल्या पित्यास विनंती करतो कीं ह्या शकुनीच्या कारवायीला मान्यता द्यावी. त्यावर तो अंध राजा त्यांना सांगतो मी खत्ताशी विचारविनियम केल्याशिवाय कांहीं निर्णय घेत नाही. म्हणून त्याला विचारून व त्याच्या सम्मतीने जो ठरेल तो निर्णय घेतला जाईल. खत्ता न्यायी आहे व दोघांच्या भल्याचा सारासार विवेक करूनच तो काय योग्य ते सांगेल व ते आपल्याला मान्य करावे लागेल. ते ऐकून दुर्योधन घाबरतो कारण त्याला माहित असते किं, खत्ता (विदूर) ह्या प्रस्तावाला मान्यता देणार नाही. तो ओरडून बापाला सांगतो, "जर खत्ताने ह्याला मान्यता नाही दिली तर मी, अहो माझे बाबा, ह्या जगात रहाणार नाही कारण, मग अशा जगात माझे रहाणे निरर्थक ठरते. त्यानंतर तुम्ही व विदूर माझ्या अंतानंतर पांडवां बरोबर मजेत रहा". असें बोलून तो त्याच्या बापावर भावनिक दबाव आणण्याचा प्रयत्न करतो.

वैशंपायन पुढे सांगतात, त्याचा अपेक्षित परिणाम धृतराष्ट्रावर होतो. तो आपला मुलगा खरोखरच जीवाचे कांहीं बरेवाईट करील ह्या भयानें त्याच्या जवळ असलेल्या सेवकांना आज्ञा करतो कीं, त्वरेने असा एक प्रशस्त सुंदर आनंददायी महाल बनवा ज्यात आपण पांडवांचे स्वागत करू शकू. ज्याला त्यात शंभर दरवाजे असतील, हजार खांबे असतील, त्यात रत्नं व इतर मौल्यवान खडे बसवलेले असतील, त्याच्या दगडी भिंती सजवलेल्या असतील. ती आज्ञा दिल्यानंतर तो राजा त्या सेवकांनी सांगतो कीं, तो महाल तयार झाला कीं, त्याला कळवावे. एवढे केल्यानंतर तो समजतो कीं, त्याचा पुत्र शांत झाला असेल व त्यानंतर तो असहाय राजा विदूराला बोलावणे धाडतो. कारण तो सम्राट विदूराच्या मान्यतेशिवाय कांहींही करत नसें. धृतराष्ट्राला द्युताचे दुष्परिणाम माहीत होते तरी पुत्र प्रेमांने व्याकूळ झालेला तो पिता असें करण्यास तयार झालेला असतो. तो बुद्धिमान प्रधान, विदूर ते सगळे समजल्यावर ओळखतो कीं, आता कली घरात प्रवेश करणार आहे. त्याला भवितव्यात घडणार्या घटनांचा अंदाज येण्यास सुरुवात होते. अशा मनस्थितीत तो धृतराष्ट्राकडे जातो. तो त्याला बोलतो, "अहो राजर्षी मी ह्या प्रस्तावाचे स्वागत करू शकत नाही. कारण अशा खेळातून जर त्या दोन चुलत भांवांत कांहीं वाद उत्पन्न झाला तर तो मोठा भयंकर होईल कारण आपण जाणताच कीं, ते पांडव कौरवांपेक्षा कितीतरी जास्त सामर्थ्यवान आहेत. त्यांचा राग विशेष करून भिम व अर्जुन ह्यांचा क्रोध कौरवांना नाशाकडे नेऊ शकतो". त्यावर धृतराष्ट्र बोलतो, "अरे खत्ता, जर देव प्रसन्न असतील तर अशी वेळ येणार नाही. म्हणून योग्य अथवा अयोग्य परंतु, असा खेळ त्यांना खेळण्याची परवानगी तू द्यावीस. तो द्युत दोनही बाजूंचे मनोरंजन जर करण्यास उपयुक्त होत असेल तर तुला त्यात काय उणीव दिसते? पांडवांच्या यशाचे कौतुक करण्याची माझ्या मुलांची अशी इच्छा आहे तेव्हां त्यात तू अडसर घालू नकोस. कदाचित हे सुद्धा त्यांच्या भाग्याचा एक भाग असेल. जेव्हां भिष्म, द्रोण, मी आणि तू असें आपण सगळी वडील माणसे आहोत तेव्हां असा कोणताही अतिप्रसंग आपण उद्भवू देणारच नाही असें माझे मत आहे". पुढे तो सम्राट विदूराला आज्ञा करतो कीं. "ताबडतोब रथातून तू स्वतः जाऊन खांडवप्रस्थातून युधिष्ठीराला एकट्याला घेऊन येण्याची व्यवस्था करावी". असें बोलून तो अंध राजा आपल्या मुलासाठी उतावीळ झालेला, त्या विदूराला सांगतो किं,

"ही माझी आज्ञा समजून त्याची अंमलबजावणी ताबडतोब करावी, त्यावर उगाचच नसत्या शंकाकुशंका काढत बसू नकोस. शेवटी दैव हेंच अंतिम असते त्यात कोणीही फेरबदल करू शकत नाही हेंच खरे". धृतराष्ट्राचे ते आततायी वागणे पाहून विदूर समजतो कीं, कुरु वंशाचा नाश समीप आला आहे हेंच खरे. त्यानंतर तो भिष्माची संम्मति घेण्यासाठी त्याच्याकडे जातो.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा एकोणपन्नासावा भाग संपला.

# सभा पर्व  भाग  पन्नासावा

(द्युत पर्व पुढे चालू)

जनमेजय विचारतो, "अहो ऋषीवर्य आपण वेदांचे जाणकार अहात. असें असतांना त्या ठिकाणी द्युतासारखा पापकारक खेळ खेळण्याची परवानगी दिली गेली आणि त्यासाठी दैवाची सबब कशी वापरली गेली ते समजावून द्या. केवळ पापबुद्धिने ते होत होते ज्यामुळे माझे पणजोबा अतोनात अशा दुर्दैवात गेले. त्यावेळी दुसरे कोण इतर राजे तेथे उपस्थित होते कां"? त्यातील कोणी अशा कारवायीला मान्यता देत होते व कोणी विरोध अथवा नाराजी दाखवत होते. तुम्ही अवतारी पुरुष अहात तेव्हां त्याची माहिती सविस्तरपणे सांगावी. ते जर टाळले असते तर जगाचा नाश झाला नसता".

सौती सांगतो, जनमेजयानें असे विचारल्यानंतर व्यासांचे शिष्य वैशंपायन मोठ्या उत्साहाने जे घडले ते सांगू लागला.

वैशंपायन सांगतात, तुझी तशी इच्छा आहे म्हणून मी आता ते सगळे जसें घडले तसें सांगतो. धृतराष्ट्र विदूराचे विरोधी मत असल्याचे पाहून दुर्योधनाला बोलावून एका बाजूला घेऊन सांगतो कीं, त्यांने द्युत खेळण्याचे टाळावे म्हणजे स्वतः दुर्योधन द्युत खेळणार नाही परंतु, इतर कोणीही खेळले तर ते वेदाच्या पवित्र नियमांनुसार वर्ज्य नव्हते. त्या प्रमाणे ठरते की, द्युत दुर्योधन खेळणार नाही. त्याच वेळी युधिष्ठीराने खेळण्याने वेदांप्रमाणे पांडव दोषी ठरत होते. कारण, क्षत्रियांनी द्युत खेळणे वर्ज होते वेदाच्या आज्ञेनुसार. धृतराष्ट्र दुर्योधनाला सांगतात, "तुझा काका, विदूर हे ह्या खेळा विरुद्ध आहेत. त्यांनी आजपर्यंत जे सल्ले मला दिले आहेत त्यामुळे आपले नेहमी चांगलेच झाले आहे. म्हणून त्याच्या म्हणण्याप्रमाणें केले पाहिजे". धृतराष्ट्र त्याला पुढे सांगतात, "विदूर नितीशास्त्राचे सगळे बारीक नियम जाणतात व त्यांना विरोध करणे शिष्टाचारात बसत नाही. प्रत्येक गोष्ट करण्याची पद्धत असते व ती पाळणे आपल्यासाठी हितकारक आहे हे समजून घे. ते नितीशास्त्र, वृहस्पती जे वसवाचे अध्यात्मिक गुरु होते, त्यांनी मर्त्य माणसासाठी निश्चित केले आहेत. म्हणून माझ्या लाडक्या पुत्रा, विदूरांचे ऐक व हा हट्ट सोडून दे. कारण द्युतासारख्या गोष्टी फक्त भेद करतात. त्यामुळें आजवर कोणाचेही भले झालेले नाही. कारण, अशा गोष्टीमुळें जे आपले आहे ते सुद्धा नष्ट होऊ शकते. तुझ्या पूर्वजांनी भरपूर

तुम्हाला दिले आहे त्यावर तुम्ही समाधानी रहाणेच सगळ्यांच्या भल्याचे आहे. तुला पाहिजे तर तू तुझ्या उच्च शिक्षणाच्या जोरावर आणि क्षत्रिय तेजांने तुझे राज्य वाढवू शकतोस मग हा पापाचा मार्ग तू कशासाठी अवलंबत आहेस? तुझा मामा स्वताला मोठा जुगारी समजतो पण जर त्याचे दैव फिरले तर त्याचे फासे विरुद्ध नाही पडणार असें तू कसे समजतोस"? तसें झाले तर तुमचे सुद्धा पांडवांचे होईल तसें झाले तर तुझी काय गत होईल त्याचा विचार तू केला आहेस कां? तुला काय कमी आहे येथे किं तू अशारितीने त्या साध्या भोळ्या पंडुच्या मुलांपाठी लागत आहेस"? आपले साम्राज्य काय कमी आहे कां? तो शकुनी मला माहित आहे, त्याचे महत्व आपल्यात वाढवण्यासाठी तुम्हा भांवात तेढ निर्माण करत आहे हे मला दिसते पण मी काय करणार, माझ्या कळा तुला कां समजत नाहीत"? तू माझा पुत्र हुशार आहेस परंतु, मत्सराग्नीने तुला ग्रासले आहे". ते ऐकून त्रस्त दिसणारा दुर्योधन त्याच्या पित्याला सांगतो, "मी एक पापी पतित आहे असें समजा हवे तर. कारण मी खातो, पितो, कपडे नेसतो आणि हे सगळे माझ्या शत्रूचे वैभव गुपचुप पहात करत आहे. जो आपल्या शत्रूच्या यशामुळें त्रस्त होत नाही तो पापी पतित असतो म्हणून मी स्वताला तसे समजत आहे. जो शत्रूचा बिमोड करण्याचा विचार न करतां आपल्या राज्यात समाधानाने रहातो तो राजा नीच समजला पाहिजे. अहो राजर्षी, अशा रितीने आधीच पूर्वजांनी कमावलेल्या समृद्धीत खूष रहाणार्यांपैकीं मी नाही. पांडवांच्या तळपत्या समृद्धीच्या तेजामुळें मी भयंकर त्रस्त झालो आहे. जेव्हां मी त्यांचे पारिपत्य करीन तेव्हांच मला शांती मिळेल. मग ते पारिपत्य युद्धाने अथवा कटकारस्थानाने किंवा द्युताने कसेही मी ते साध्य करणार आहे. त्यात अडसर नको, तुम्ही फक्त साथ द्या. ते पांडव आमच्या डोक्यावर बसलेले आहेत, ते आमचे राज्य केव्हाही गिळंकृत करू शकतात. मी पाहिले आहे कीं, मोठे महारथी निप्प, चित्रक, कुक्कुर, करष्कर आणि लवजंघ असें सगळे त्यांच्या वाड्यात मजुरी करत आहेत. उद्या तो भिम मलासुद्धा त्या पंगतीत बसवेल त्यावेळी तुम्ही काय करणार"? हिमालयापासून खाली समुद्र तटापर्यंत सगळे रत्नं, माणिकं, मोती असे उत्पन्न करणारे सगळे युधिष्ठीराच्या आज्ञेत आहेत. तुम्हाला माहीत आहे कां, त्यांने मला मुद्दामच त्या कामाला नेमले म्हणजे मला समजावे किं, किती संपत्ती त्याच्याकडे जमा होत आहे. ते इतके धन होते कीं,

त्याची मोजदाद करण्यात माझे दोनही हात थकून गेले. मी ते मोजत असतांना ते दूरुन आलेले राजे रांगेत ताटकळत उभे असतं त्यांची पाळी येईस्तोवर. हे मला सहन होण्या पलिकडले आहे. हिमालयातील विंदू सरोवरातून मायासुरांने आणलेल्या जादुई रत्नांने त्याने एक सरोवर दिसेल असे प्रांगण तयार केले होते. त्याला मी खरोखरचा तलाव समजलो व त्यात माझे कपडे काढून मी उडी मारली तो त्या पाण्यासारखी दिसणारी जमीन मला जोरात लागली व मला मार बसला तेव्हां ते भिम आणि अर्जुन व त्यांचे सेवक मला खूप हसले. ते मला अजिबात आवडलेले नाही. मी एक राजा आहे त्याची पर्वा त्यांच्या सेवकांनी केली नाही हे मला सहन होत नाही. मला जर शक्य असते तर मी त्या वकोदराला ठार मारले असते पण त्याचे काय आहे समजत नाही तो कांहींही केले तरी मरत नाही. जर आपण शांत बसलो तर जे शिशुपालाचे झाले ते आपले होणार असें माझे मन मला सांगते. ह्या सगळ्या गोष्टी तुम्हाला समजत नाहीत म्हणून तुम्ही मला शांत रहाण्यास सांगता पण ते कसे शक्य आहे"? "तुम्हाला माहीत आहे कां, त्या सरोवरासारख्या इतर प्रांगण्यात मी भटकत असतांना लपून ते पांडव आणि त्यांची बायको, द्रौपदी आणि तिच्या सख्या माझ्या मागून फिरत होते, माझी आणखीन कशी फटफजिती होते ते पहाण्यासाठी व मी पडलो कां ते माझ्याकडे पाहून फिदी फिदी हसत रहात. सांगा बाबा, हे मी कसे सहन करावे"? माझे वस्त्र खराब झाले म्हणून युधिष्ठीराने नवीन कपडे दिले एका सेवकांद्वारा, जो मला कपडे देतांना माझ्याकडे पहात हसत होता. एकदा एका दालनातून बाहेर पडण्यासाठी मी दरवाज्याकडे गेलो तर ती भिंत होती व माझे डोके त्यावर जोरात आपटले तर ते सगळे माझी मजाच बघत होते त्यांच्या बरोबर त्यांचे नोकरसुद्धा मला पाहून हसत होते ह्या सगळ्या गोष्टींचा मला सूड घ्यावा असें सारखे वाटते. एका जागी दरवाजा बंद होता तो उघडण्याचा मी प्रयत्न करत होतो तेव्हां मला समजले कीं, ती भिंत आहे. पुनः ते सगळे मला हसत होते. सहदेव आणि नकुल मला सांभाळत होते पण ते सुद्धा गालातल्या गालात हसत माझ्याशी केव्हाही बोलत असत. मला माहीत होते कीं, त्यांचे हसणे शिष्टाचाराचे नव्हते तर माझी फटफजिती होत होती म्हणून होते. अहो माझे पिता, तुम्ही समजू शकता आता मला कां त्यांना धडा शिकवावा असें वाटत आहे. त्या सर्वात भिमाचे मोठ्याने हसणे मला बिलकूल आवडत नव्हते. त्याचा

मी सुरुवातीपासून द्वेष करत आहे त्यात ह्यामुळें भर पडली आहे. आणखीन काय सांगू माझे बाबा, तेथे एकेक असें रत्न पाहिले ज्यांची नांवेसुद्धा आम्हाला माहीत नाहीत. आपण कौरव त्यांच्या पेक्षा सर्व बाबतीत तुच्छ ठरतो त्याचे मोठे वैषम्य वाटते. ज्यांना आम्ही आमच्यापेक्षा कमी समजत होतो ते एवढे पुढे गेले ते सहन करण्याच्या पलिकडले झाले आहे, त्यांचा बंदोबस्त केलाच पाहिजे. त्यात मामा शकुनीचाच मार्ग उचित वाटतो".

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा पन्नासावा भाग संपला.

# सभा पर्व भाग एकावन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

दुर्योधन पुढे सांगतो, अहो भरत कुळी माझे पिता, ऐका मी काय सांगतो ते, सर्वात मौल्यवान अशा एक एक चिजा त्यांच्याकडे आज ढीगाने पडलेल्या आहेत. जणू काय कुबेराचा खजिना असावा. मी ते सगळे पाहून माझी शुद्ध हरवून गेलो. एका पाठोपाठ एक असें राजे कोठून कोठून ते ऐवज आणून देत होते तेसुद्धा मला समजण्या पलिकडले होते. त्यात कांहीं नैसर्गिक आणि कांही माणसांने बनवलेले असे सगळ्या प्रकारचे होते. राजा कंबोजाने विविध रंगाच्या कातड्या आणून दिल्या होत्या. कांहीं मोठ्या प्राण्याच्या तर कांहीं मांजर, उंदरा एवढ्या लहान प्राण्याच्या होत्या. त्यात मृदू होत्या व खरबरीत होत्या. त्या कातड्यावर जरीचे काम केलेले होते. त्याने पांडवांना कांहीं खास प्रकारचे घोडे भेट दिले, त्यात तिटेती आणि कल्माश प्रजाती विशेष वाटल्या. त्यांची नांक पोपटाच्या चोचीसारखी होती. असें घोडे आपण कधीच पाहिलेले नाहीत. त्याशिवाय तिनशे उंट आणि तितकीच धष्टपुष्ट गाढवं त्याने खंडणी म्हणून आणली होती. विशेष म्हणजे ते देतांना ते आनंदी दिसत होते म्हणजे त्यांत पांडवांबद्दलचा आदर व्यक्त होत होता. ह्याचे मला फार दुःख झाले कारण त्या सगळ्या खंडणी पांडव बळजबरीने मिळवत नव्हते तर ते राजे स्वखुषीने देत होते. हे अक्षरशः अति होत होते माझ्यासाठी. असंख्य गुरढोर घेऊन ब्राह्मण वाड्याच्या बाहेर प्रवेश मिळावा म्हणून ताटकळत उभे होते. युधिष्ठीरांनी त्यांचे स्वागत करावे म्हणून ते वाट पहात होते. जणू काय अशा स्वागताचे त्या ब्राह्मणांना खास वाटत होते. मी पाहिले कीं, तेथे वाड्याच्या बाहेर तीस लक्ष खंडणी देणारे प्रवेश मिळावा म्हणून ताटकळत होते. ह्यावरून किती खंडणी त्यांना मिळत होती ते समजते. वाडा आतमध्ये भरलेला होता व त्या प्रत्येकांचे मुल्यमापन करणे ह्याला समय लागत होता त्यामुळें ती दरवाज्या बाहेरची गर्दी वाढतच होती. असें असले तरी त्या सगळ्यांना तेथे पांडवांचे सेवक मोठ्या आदराने वागवत होते त्यामुळें परिस्थिती हाता बाहेर जात नव्हती, ह्याचे मला वाईट वाटत होते. कोणीतरी त्या जमलेल्या लोकांना अपमानित करील अशी मी आशा करत होतो पण तसें होत नव्हते. तेथे आलेले ब्राह्मण त्यांच्या कडील सोन्याच्या कमंडलुंतून साजूक तुप राजाला देण्यासाठी आतुर होते व पांडव त्या सर्वांचे मोठ्या

आदरांने स्वागर करत होते, एवढेच नाही तर मलासुद्धा त्या अभ्यागतांना आदरपूर्वक वागवावे लागत होते. जणूकाय तो भिम माझ्यावर लक्ष देऊन होता असें किं, मी कांहीं आगळीक करून पांडवांच्या नांवाला काळिमा लागू नये! कांहीं शुद्र राजे समुद्र किनारी रहाणारे कर्पशिक, त्यांच्या बरोबर शेकडो दास्या घेऊन आले होते. ते सगळे प्रवेश मिळावा म्हणून कित्येक घटका बाहेर वाट पहात होते. त्या सगळ्या सुंदर काळ्यासावळ्या उत्तम शरीरयष्टी असलेल्या होत्या. त्यांच्या अंगावर जरीचे वस्त्र होती. कांहींनी रंकु प्रजातीच्या हरणाचे कातडी आणली होती. त्यात वैरमन, परदास, तुंग आणि कितव जातीचे खरीपाची शेती करणारे समुद्र किनारी रहाणारे शेतकरी होते. रानात रहाणारे, परदेशांत रहाणारे, समुद्राच्या पलिकडील असें बरेच लोक त्यात होते. वाड्यात फार गर्दी झाल्यामुळें ते बाहेर ताटकळत होते. हे पांडवांच्या सामर्थ्याचे प्रतिक होते आणि म्हणूनच ते मला सहन होत नव्हते. त्यांनी आणलेली त्याची जनावरे व इतर सामुग्री ज्यात कातडी, गालिचे, मौल्यवान रत्न त्यांच्या बरोबर होती. प्रागज्योतिषपुरचे बलाढ्य राजे भागदत्त, म्लेच्छांचे मुख्य त्यांच्या बरोबर यवनांची मोठी फौज घेऊन आले होते. तेसुद्धा प्रवेशासाठी दरवाज्यात उभे होते. त्यांच्या कडे उत्तम जातीचे घोडे होते. ती गर्दी पाहून तो राजा तेथून निघून गेला. त्याने त्याच्या बरोबर उत्तम प्रकारच्या हस्तीदंताच्या मुठी असलेल्या व त्यावर हिर्याचे जडण केलेले अशा तलवारी आणल्या होत्या. तेथे विचित्र प्रकारचे लोक सुद्धा पाहिले, त्यातील कांहींना दोन डोळे, तीन डोळे तर कांहींना एकच डोळा असें होते. कांहींच्या कपाळात डोळे होते. त्यांची नांव होती औष्मिक, निषाद, रोमक, कांहीं नरमांसभक्षक, कांही एकपाद होते. त्या विविध देशांतून आलेल्या राजांनी दहा हजार खेचरं आणली होती त्यांचे रंग चित्रविचित्र होते. त्या जातीची ख्याति सगळ्या जगात आहे. वांकू देशातून ते आणली होती. इतर बर्याच राजांनी सोने चांदीच्या लाद्या आणल्या होत्या युधिष्ठीराला भेट देण्यासाठी. ते एकपाद त्यांच्या बरोबर वेगवान घोडे घेऊन आले होते. त्यातील कांहीं घोडे नारंगी रंगाचे होते. कांहीं सप्तरंगी होते. ते सगळे घोडे त्यांच्या वेगासाठी प्रसिद्ध आहेत. चिनी, शक, उद्रस आणि बरबर टोळ्याचे लोक आले होते. कांहीं जंगलात रहाणारे तर कांहीं वाळवंटात रहाणारे. कितीतरी वृश्नी आणि हरहण जे हिमालयातील आहेत असें कितीतरी आले होते. त्यांनासुद्धा प्रवेश मिळत नव्हता. ते सगळे

त्यांच्याबरोबर खेचरांच्या विविध प्रजाती पाळत होते. कांहीं खेचराच्या त्वचेला मृदू स्पर्श होत होता. वल्हिकांनी गालिचे आणले होते. त्याची लोकर मृदू होती. ती चीनदेशातून आलेली होती. ती लोकर रंकू जातीच्या हरणाची होती. त्यांचे कपडे तागाचे होते. कांहीं किड्यांचे (तसर किंवा रेशीम) धागे वापरलेले होते. तशा प्रकारची विविध वस्त्रं त्यां लोकांनी खंडणी म्हणून आणली होती ती कापसापासून बनवलेली नव्हती. कांहीं अभ्यागतांनी शस्त्रास्त्र आणली होती त्यात तीक्ष्ण धारेच्या तलवारी, कुर्हाडी, समशेरी, चाकू, सुरे आणलेले होते. ते यवनांकडून आले होते. कांहींनी अत्तरं आणली होती त्यांचे सुगंध दरवळल्यावर आसमंत प्रसन्न होत होते. ते सगळे प्रवेश नाही म्हणून बाहेर ताटकळत उभे होते. शक, तुर्ख, कंख आणि रोमक ह्यानी हजारो मोठे हत्ती आणले होते ते एवढे मोठे होते किं, त्याना बघतांना माना वर कराव्या लागत होत्या. त्याशिवाय घोडे होते. अगण्य इतके सोने, चांदी, हस्तिदंत त्या वाड्याच्या दरवाजात ढीग लावून ठेवलेले होते कारण आत ठेवावयाला जागा नव्हती. कित्येकांनी चिलखतं, विविध प्रकारची शस्त्रे, विविध आकाराचे बाण, भाले, बरच्या, गालिचे, इतर प्रकारच्या मौल्यवान चीजा ह्यांचा खच पडला होता. घोडे आणि हत्तींच्या अंगावरील आंथरणी त्यात होती. काय नव्हते ते सांगा आणि सगळे उत्कृष्ट दर्जाचे होते त्यामुळें माझे डोळे दिपून गेले होते. माझ्या अंगाची लाही लाही होत होती.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा एकावन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग बावन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

दुर्योधन पुढे सांगतो, अहो तात, माझे ऐका, असें फार मोठ्या प्रमाणात संपत्तीचा खच तेथे पडलेली मी पाहिला आहे. अनेक राजांनी व तेसुद्धा जगभरच्या विविध प्रदेशातील, खंडणी म्हणून ते युधिष्ठीरासाठी आणलेले होते. कांहीं जे सैलोदा नदीच्या किनारी रहात, जी नदी मीर व मंदार पर्वतरांगांमधून जाते, व ज्या प्रदेशांत किचक बांहूंची जंगल आहेत म्हणजे इकसान अर्हा आणि प्रदर, दीर्घवेणू, परदास, कुलिंद, तंगण आणि त्यांचे दुसरे ह्या लोकांनी हंडे भरून सोने दिले होते ज्याची गणती करणे अशक्य होते. ते सोने माणसांने काढलेले नव्हते तर ते जमिनीतील मुंग्याने उकरून जमिनीवर आणलेले असें अतिशुद्ध स्वरुपात होते. म्हणून त्या सोन्याच्या चुर्णाला त्या मुंग्यांचे नांव दिले होते. दूर पहाडी इलाख्यात रहाणारे त्यांच्या बरोबर शुभ्र रंगाच्या चावर्या (केसांचे पंखे) आणि मध घेऊन आले होते. ते मध चंपक फुलांतून काढलेले होते. त्याशिवाय त्या फुलाच्या माळासुद्धा आणलेल्या होत्या. त्याशिवाय उत्तर कुरु प्रदेशांतून आलेल्यांनी विविध प्रकारची जडीबुट्टी आणली होती. ते सगळे ती सामुग्री घेऊन पांडवांच्या वाड्या बाहेर उभे होते प्रवेश मिळावा म्हणून. मी अगण्य किराट राजे तेथे उभे असलेले पाहिले. त्यांची भयंकर शस्त्रे त्यांच्या बरोबर होती, हे लोक क्रूरपणे त्यांच्या शत्रूस मारतात असें मी ऐकले आहे. ते तेथे बसून बरोबर आणलेली फळे व कंदमुळं खात होती. हिमालयाच्या उत्तर पूर्वेकडील उतारांवर रहाणारे ते लोक चामड्याचे वस्त्र घालून आले होते ज्या प्रदेशाकडून सूर्य उगवतो. त्या कुरुश प्रांतातून जो लोहित्य पर्वतराशी व तेथील समुद्राशी जोडलेला आहे तेथून कांहीं आले होते. त्या लोकांनी चंदन आणि इतर औषधी सामुग्री आणली होती. त्या शिवाय ढीगारभर कमावलेली उत्तम प्रकारची चामडी व विविध सुवासिक अत्तरे होती. त्या शिवाय दहा हजार मुली सेविका म्हणून भेट आणल्या होत्या. त्यांच्या कडील डोंगरात मिळणारे सोने हंडेभरून आणलेले होते. ते किराट दरवाज्यात उभे होते कधी आत जाण्याची परवानगी मिळते त्याची वाट पहात होते. कैरट, दर्द, दर्व, वैमक, औडुंवर, दुरविभंग, परद, आणि वल्हीक, काश्मिरी, कुमार, गुरखा, हंसकवनी, सिवी, तृगर्ती, यौधन्य, मद्र देशाचा राजा, कौकेयी, अंवष्टी, कौकुर, तर्ख्र्य, वस्त्रपी, आणि पल्हव, वशटवयी, मौलयी, क्षुद्र, मल्लव, पौंड्र,

कुक्कुर, शक, अंग, वंग, पुन्ड्र, सनवत्य, गयी असें सगळे उच्च कुलिन क्षत्रिय त्यांच्या दर्जा प्रमाणे त्यांच्या शस्त्रांच्या योग्यतेनुसार तेथे आपापली खंडणी घेऊन आले होते. त्यातील वंग, कलिंग, मगध, ताम्रलिप्त, सुपुंड्रक, दौवलिक, सागरक, पत्रनी, शैष्व आणि अनेक कर्णप्रवर्नक जे दरवाजात हजर होते त्यांना राजांने सांगितले कीं, जर ते तोलामोलाची खंडणी आणणार असतील तर त्यांच्यासाठी वाड्याचे दरवाजे उघडले जातील. त्यानंतर त्यांनी प्रत्येकी, एक हजार उत्तम हस्तीदंत, नांगराच्या फाळा सारखे, असलेले सादर केले तेव्हां कोठे त्यांची वर्णी लागली. त्या हस्तीदंतांवर जरी आणि सोन्याचे मखर बसवलेले होते. त्यांच्या पाठीवर गुलाबी रंगाच्या बुरणुस होते. त्याशिवाय युद्धाच्या चिलखताने सज्ज असें ते होते. अशी महागडी खंडणी दिल्यानंतर त्यांच्यासाठी दरवाजे उघडले गेले असा दिमाख होता त्या पांडवांचा. त्याशिवाय माहीत नसलेले असें अगणित राजे आले होते भेटी घेऊन त्यांनी मौल्यवान रत्नं, माणकं, हिरे, मोती असें जवाहर आणलेले होते. गंधर्वांचा राजा जो अर्जुनाचा मित्र म्हणवतो, तोसुद्धा आला होता. त्यांने चार हजार अश्व भेट केले. त्यांचा वेग वार्यासारखा होता. त्याशिवाय गंधर्व तुम्वूरु आणखीन शंभर तसेंच घोडे देऊन गेला. त्या घोड्यांचा रंग हिरवा होता. त्या प्रत्येकावर सोन्याचे दागिने नेसवले होते. अहो कुरुकुळाच्या राजा, त्या म्लेच्छ राजांने ज्याचे नांव शुकरस आहे, शेकडो हत्ती दिले. मत्स्य देशाच्या राजांने दोन हजार हत्ती आणले होते खंडणी म्हणून. पंशुचा राजा वसुदन सहाशेवीस हत्ती व दोन हजार चांगले तरणेबांड घोडे दिले. त्या सुळ्यावर सोन्याचे दागिने घातलेले होते. इतेर अनेक राजेसुद्धा आपापल्या भेटी घेऊन येतच होते. यज्ञसेनाने पंडुच्चा मुलांसाठी त्या यज्ञात कामाला येण्यासाठी चौदाहजार सुंदर तरुण मुली आणल्या होत्या. त्यांच्या बरोबर इतर कामासाठी पुरुष माणसे व त्यांच्या बायका आल्या होत्या. हजारो हत्ती, रथ घेऊन तो वृश्नी कुळातील वासुदेव आला होता व त्यांने त्याचे राज्य सुद्धा त्या यज्ञासाठी दान केले होते. त्यामुळे त्याचा परम मित्र अर्जुनाची श्रेष्ठता निश्चित झाली होती. त्याने आणखीन चौदा हजार उत्तम हत्ती आणले होते. हे असें होते कीं, वाटावे अर्जुनाचा आत्माच कृष्ण आहे. त्यामुळें अर्जुन स्वर्गात जाणार आणि कृष्ण त्याच्यासाठी पृथ्वीवर येणार कीं काय असें. चोल देशाच्या राजांने असंख्य हंडे भरून मलय देशाचे प्रसिद्ध सुगंधी चंदनाचे तेल, आणले होते. त्याशिवाय चंदनाची खोडं, कोरफडीची पातं

द्रदुरसच्या डोंगरातील आणलेली होती. त्याशिवाय जरीकाठ असलेली पातळं साड्या लुगडी अशी बायकांची वस्त्रं होती. सिंघलमधून आलेले नीलमणी घेऊन आले होते. त्याशिवाय ढीगारभर मोती होते ज्यांची गणती नव्हती. हत्ती, घोडे ह्यांची पालख होती कित्येक. रात्रीसारखे काळे असलेले  त्यांच्या डोळ्याच्या कडा लालबुंद होत्या. त्यांच्या कातडीच्या नेसण्यावर मौल्यवान रत्न जडवलेली होती. असे सगळे विविध देशांचे विविध संस्कृतीचे लोक तेथे राजाला भेटण्यासाठी आले होते. त्याशिवाय असंख्य ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ज्यांना पांडवांनी मदत केली आहे तसेंच त्यांचे सेवक (शुद्र) आले होते आपले ऋण फेडण्यासाठी. ते त्यांच्या ऐपतीनुसार छोट्या चिजा प्रेमांने आणत होते. कांहीं हरल्यामुळें तर कांही उपकाराच्या आठवणीमुळें अशा प्रेमाच्या भेटवस्तु आणत होते. मला माहीत नसलेल्या अशा प्रदेशांतून तेथे लोक येत होते त्याचे मला आश्चर्य वाटत होते. पांडवांची ख्याति इतकी दूर गेलेली आहे त्याचा मला रांग येत होता. युधिष्ठीर जणू जगाचा राजा झाला आहे असेंच वाटत होते ते सगळे पाहिल्यावर. मला असें वाटले, मी मरून जावे हे सगळे पांडवांचे वैभव पहाण्यापेक्षा. अशी माझी अवस्था झाली आहे. मी तुम्हाला पांडवांच्या सेवकांच्या ऐटीची माहीती आता सांगतो. त्यात शिजलेले आणि कच्चे खाद्य तेथे येणार्या जनावरांना आणि माणसांना द्यावे लागते त्याची माहीती सांगतो, एका भटारखान्यात ते सगळे खाद्य प्रथम जमा केले जाते. तेथे त्याचे मोजमाप होते. दुसर्या ठिकाणी त्यातले शिजवावयाचे ते नेले जाते. त्यानंतर शिजलेले खाद्य लोकांना दिले जाते. त्यामुळें सगळे आनंदात असतात, कोणीही उपाशी नसतो. पांडवांच्या नोकरांत केवळ खाण्यापिण्याची व्यवस्था आहे असेंच नाही तर त्यांच्या अंगावर दागिने असतात. ते एकाद्या श्रीमंतासारखे दिसतात. आपल्या राज्यातल्या एकाद्या श्रीमंतापेक्षा ते जास्त श्रीमंत आहेत असें मला वाटले. त्याशिवाय अठ्ठ्याऐंशी स्नातक दररोज तेथे जेवत असतात! त्यांची काळजी पांडवाचे कारभारी पहातात. त्या ब्राह्मणांचे काम शत्रूच्या नाशासाठी यज्ञ करत रहाणे असें असते. त्या ब्राह्मणांच्या सेवेसाठी प्रत्येकी तीस बायका सेविका म्हणून नेमलेल्या आहेत! ते सगळे ब्राह्मण सोन्याच्या ताटात जेवतात. त्या सामान्य ब्राह्मणांचा रुबाब आपल्या सारखा आहे हे पाहून माझे चित्त उसळून निघाले. त्याशिवाय शुक्ल ब्रह्मचर्य आचरणारे दहा हजार संन्याशी पांडवांच्या आश्रयाला आहेत. ते घोर तपस्या

करून राजासाठी पुण्यसंच करत असतात. तेसुद्धा सोन्याच्या ताटात जेवतात. राजा यज्ञसेनी (युधिष्ठीर) उपाशी राहून प्रथम सगळे त्यात अपंग, निराधार, दुर्दैवी असें येतात, जेवले कीं नाही ते पाहून मग स्वतः जेवावयाला बसतो. त्यामुळें त्याच्या राज्यात कोणीही उपाशी नसतो. सर्वात शेवटच्या पंगतीला सगळे पांडव बसत असतं. पहिल्या पंगतीत स्नातक आणि संन्याशी व ब्राह्मण बसत. अहो माझे पिता, धृतराष्ट्र, फक्त दोन लोक पाडवांना खंडणी देत नाहीत त्यात पांचाल येतात कारण ते त्यांचे आप्त आहेत आणि वृश्नी व अंधक जे मित्र आहेत.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा बावन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग त्रेपन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

दुर्योधन नंतर बोलतो, "ते राजे ज्यांचा आदर सगळे करतात, जे सत्याचे रखवालदार आहेत, जे न्यायाने वागतात, जे शब्दाचे पक्के आहेत, जे तत्त्वशिल आहेत, जे व्रतस्थ आहेत, जे उत्तमरित्या प्रशिक्षित आहेत, जे वेदांतील सर्व शाखांत प्रवीण आहेत, जे यज्ञ करतात, ज्यांच्या पुण्यप्रभावाचे काय सांगावे, जे शूर असून नम्र असतात, ज्यांची ख्याति चारही दिशांना पसरलेली आहे, ज्यांचे प्रतिष्ठीतपणे राज्यारोहण झाले आहे असे सगळे महान श्रेष्ठ असूनही त्या पांडवांच्या पुढे नतमस्तक होऊन त्या दरबारात उभे असलेले मी पाहिले आहे".

"मी पाहिले आहे, हजारो गायींचे दुध भरलेले शुभ्र तांब्याचे हंडे घेऊन यज्ञासाठी राजे स्वतः घेऊन युधिष्ठीराकडे जात होते. ते यज्ञात ब्राह्मणांना द्यावे म्हणून युधिष्ठीर घेत होता. यज्ञाच्या समारोपाच्या वेळी ते सगळे राजे शुद्ध जलांने भरलेले हंडे घेऊन येत होते, त्यावेळी राजा वल्हिक सोन्याने मढवलेला रथ घेऊन येतो, राजा सुदक्षिण स्वतः चार घोडे कंबोज जातीचे उत्तम, त्या रथाला जोडतो. त्या रथाला राजा सुनीथ ध्वजाचा दांडा बसवतो. त्या दांडावर छेडीचा राजा स्वतः ध्वज लावतो. दख्खनचा राजा व्यक्तिशः त्या ठिकाणी पहारा देत होते. मगध देशाचा राजा युधिष्ठीराला वारा घालण्यासाठी उभे होते. महारथी वसुदन एका साठ वर्षाच्या हत्तीवर बसून, मत्स्य देशांचा सोन्याने मढवलेल्या रथात राजा, राजा एकलव्य जोडे घेऊन, राजा अवंती उत्तर स्नानासाठी पाणी घेऊन, राजा चेकितन हातात भाता घेऊन, काशीचा राजा धनुष्य घेऊन, राजा शल्य समशेर घेऊन उभे होते ज्या समशेरीची मुठ सोन्याची होती व त्यावर हिरे बसवलेले होते. एवढी तयारी झाल्यानंतर ज्येष्ठ ऋषी धौम आणि द्वैपायन, नारद, असीत ऋषींचे पुत्र देवल राजाच्या रोहणाच्या विधीसाठी राजासाठी उभे होते. ते त्या विधीत राजावर अक्षतं शिंपणार असतात. ते महान ऋषी मोठ्या अल्हाददायक मनानी त्या अक्षतं युधिष्ठीरावर शिंपतात. इतर तितकेच श्रेष्ठ ऋषी त्याला अनुमोदन देतात त्यानंतर ते वेदशास्त्र संपन्न जमदग्नीच्या मुलांसह युधिष्ठीरीला भेटतात. ते सगळे मंत्र उच्चारून ते सात ऋषी इंद्राला आवाहन करतात कीं, त्यांने ह्या राजसूय यज्ञाचे फलित मान्य करावे. त्या प्रसंगी

युधिष्ठीरांवर सत्यकीनी विधीपूर्वक छत्री धरली होती. राजाच्या दोन बाजूस उभे राहून भिम आणि धनंजय चावर्या घेऊन त्या हलवून वारा घालत होते. त्याशिवाय नकुल व सहदेव चामर घेऊन उभे होते. हजार निष्क सोने वापरून विश्वकर्माने वरुणासाठी तयार केलेले शंखू साक्षात समुद्र देव तेथे घेऊन आलेला होता. तो शंखू आधीच्या कल्पात ब्रह्माने इंद्राला भेट दिला होता. त्या शंखूतून कृष्ण स्वतः युधिष्ठीरीला आंघोळ घालतो. हा विघी यज्ञ समाप्तीच्या वेळी संपन्न झाला. ते सगळे पाहून माझे चित्त भडकून गेले. तुम्हाला काय सांगू, मी बेभान झालो होतो. समुद्राचे पाणी आणण्यासाठी लोक पूर्व, पश्चिम, दक्षिण समुद्राकडे जातात पण येथे स्वतः समुद्रच त्याचे पाणी घेऊन येतो म्हणजे कमाल झाली त्या पांडवांच्या सामर्थ्याची, हे कसे मी सहन करणार, तात तुम्हीच सांगा? आपण समजतो फक्त पक्षीच उत्तरेकडे जाऊ शकतात परंतु, हे पांडव त्याच्याही पलिकडे गेले त्यांचे राज्य वाढवण्यासाठी! तेथून आणलेले हजारो शंख त्या यज्ञात वेळोवेळी वाजवले गेले त्यांच्या गर्जनेने आसमंत दुमदुमून जात होते. जसें ते शंख फुंकले जात व त्यांचे एकत्र ध्वनी सर्वत्र ऐकू जाई माझ्या अंगावरील रोम ताठ उभे रहात, एका वेगळ्या प्रकारच्या भयांच्या भावनेने. कित्येक राजे ते फुंकतांना घेरी येऊन पडत असलेले मी पाहिले . त्याच वेळी दृष्टद्युम्न, सत्यकी, पंडुचे पांच पुत्र आणि केशव असें मिळून आठजण मात्र ते शंखू जोराने फुंकून वाजवत होते. त्या अशक्त राजांच्या त्या घेरी येऊन पडण्यामुळें कित्येकांना त्यांचे हंसू येत होते त्या हसणार्यात मीसुद्धा होतो. त्या घटनेमुळें पांडवांच्या ताकदीचे दर्शन होत होते. त्या विघीनंतर विभत्सू (अर्जुन) प्रमुख ब्राह्मणांना पांचशे बैल दान करतो. ज्यांच्या भल्यामोठ्या शिंगावर सोन्याचा पत्रा बसवला होता. तो यज्ञ यशस्वीरित्या संपन्न केल्यामुळें तो कुंतीपुत्र युधिष्ठीर हरिश्चंद्रासारखा इंद्राच्या बरोबर बसण्याच्या योग्यतेचा झाला होता. ते वैभव रतिदेव, नभग, जौवनस्व, मनु, किंवा राजा पृथू वेणाचा मुलगा, भगिरथ, ययाति, नहुशा अशा कोणाही तेजस्वी राजाला मिळवता आले नव्हते. ते पृथाच्या पुत्रांचे यश, वैभव पाहून माझी जगण्याची वासनाच संपुष्टात आली आहे. हे पहात रहाण्यापेक्षा मेलेले चांगले असा विचार माझ्या मनात सारखा येत आहे. मी त्या भिमापुढे हजार वेळा हरल्या सारखे होत आहे. मी येथे राजा असले तरी त्यांच्यापुढे मी यत्किंचित ठरत आहे. नवीन पिढी पांडवांचे वैभव

पहात मोठी होईल आणि जुनी ते पहात मरून जाईल. त्यांचीच चर्चा सर्वत्र होत राहिल मग आम्हा कौरवांचे काय होणार"?

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा त्रेपन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग चौपन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

ते दुर्योधनाचे यज्ञाचे वर्णन ऐकल्यावर धृतराष्ट्र त्याला बोलतात, "अरे दुर्योधना, तू माझा ज्येष्ठ पुत्र आहेस. माझ्या पहिल्या बायकोपासून झालेला आहेस. म्हणून तू अशारितीने पांडवांचा मत्सर करणे आपल्या घराण्याच्या इभ्रतीला शोभत नाही. जो द्वेष, मत्सराच्या अग्नीत होरपळतो तो कधीही सुखी होऊ शकत नाही. तसा माणूस जीवंतपणी मरण यातना भोगत असतो. तू जाणतोस कीं, तुझे चुलत भाऊ खोटे काम कधीच करत नाहीत. ते पूर्णतया पापभिरू आहेत. आता ते अतोनात संपन्न झाले आहेत, त्याची सापत्तिक स्थिती तुझ्या सारखीच उच्च दर्जाची झाली आहे, त्यांच्याशी सलोख्याचे नाते ठेवणे इतर कांहीं करण्यापेक्षा जास्त सोयीचे आहे असें माझे मत आहे. कारण, पांडव कधीही तुमचा कौरवांचा द्वेष मत्सर करत नाहीत. म्हणून, तू त्यांचा द्वेष करणे बंद करणेच आपल्या सगळ्यांच्या हिताचे आहे. अरे दुर्योधना, तू मित्र आणि दोस्त राष्ट्र ह्यांच्या मध्ये पांडवांच्या इतकाच ख्यातनाम आहेस. तुला तुझ्या चुलत भांवाच्या मालमत्तेचा मोह धरणे शोभत नाही. जर तुला त्या यज्ञामुळें मिळणारी प्रतिष्ठा आकर्षित करत असेल तर आपण दुसरा एक यज्ञ करू शकतो, त्या यज्ञाचे नांव तुला माहित आहे, सप्ततंतू तो तू मोठ्या वैभवाने करून तुझी इच्छा पूर्ण करू शकतोस. पाहिजे असेल तर मी आताच त्यासाठी पुरोहितांची नेमणूक करतो. त्या यज्ञासाठीसुद्धा सगळी कडील राजे तुझ्याकडे रीघ मोठ्या आनंदाने लावतील. तेसुद्धा तुझ्यासाठी मोठमोठ्या देणग्या आणतील. तुला माहीत आहे कीं, दुसर्याच्या मालमत्तेचा मोह धरणे हे एक महापाप समजले जाते. जो त्याच्या कमाईत खूष रहातो तो खरा सुखी समजला जातो. तू तुझ्याकडे जे दैवाने दिले आहे ते सांभाळणे व वाढवणे ह्यातच आपले हित आहे हे लक्षात घे, त्यातच महानता असते. जो राजा त्याच्या जबाबदार्या समजून कार्य करतो तो सर्व प्रकारच्या दुर्दैवावर मात करू शकतो. जो नको त्या मोहात पडत नाही तो त्याची कामं उत्तम रित्या करून जगात प्रसिद्ध होऊन रहातो. पंडुच्या मुलांनी नेमके तेंच केले म्हणून ते आज उत्कर्षाच्या उच्चबिंदूला पोहोचले आहे. त्यांनी स्वकर्तृत्वाने कोणाच्याही मालमत्तेचा मोह न बाळगता सगळी संपत्ती मिळवली आहे तसें तुम्ही शंभर कौरव कां करत नाही. दुष्टबुद्धीने भांडणं उकरून काढणे सत्प्रवृत्त राजाला

शोभत नाही. तुझ्या बरोबर तुझे वडीलधारे रहात आहेत त्यांना काय वाटते त्याचा तू थोडातरी विचार केला पाहिजेस. तूसुद्धा तुझ्या चुलतभावां प्रमाणे मोठी दानं ब्राह्मणांना करून प्रसिद्ध सहज होऊ शकशील. हे असें विकृत विचार करण्यात समय न घालवता तो समय तुम्ही सगळे माझे कौरव, सुंदर स्त्रीयांबरोबर रमण्यात घालवावा हे जास्त श्रेयस्कर नांही कां"?

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा चौपन्नावा भाग संपला.

# सभा पर्व  भाग  पंचावन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

ते त्याच्या पित्याचे उद्गार ऐकल्यावर दुर्योधन त्यांना सांगतो, "ज्यांने पुष्कळ अभ्यास केला आहे शास्त्रांचा पण प्रत्यक्ष प्रचिती घेतलेली नाही अशा माणसांच्या सल्ल्यात कांहीं तथ्य नसते. अनुभवानेंच शास्त्राभ्यास खर्या अर्थाने सिद्ध होत असतो. जसें, चमच्याने खाल्ले तरी चमचा त्या पदार्थाची चव समजू शकत नाही कारण त्याला जिभ नसते असें ते आहे. तुम्हाला सगळे समजते तरी तुम्ही माझा गोंधळ वाढवत अहात. आपली अशी गत झाली आहे जशी दोन होड्या एकमेकांला बांधलेल्या असाव्यात. तुम्ही फक्त तुमच्या दृष्टीकोनापुरता विचार करता, माझ्या विचारांची तुम्ही दखल घेत नाही. तुमच्या मनांत माझ्याबद्दल द्वेष आहे असा आता मला संशय येऊ लागला आहे. कारण, जे कांहीं मी सांगेन ते कसेतरी धुडकावून देण्याचाच तुमचा उद्देश आहे असें मला दिसते. तुम्हाला त्या कुंतीपुत्रांचा जरा जास्तच कैवार आहे असें मी समजू शकतो पण त्यामुळें मी माझ्या धोरणात बदल करीन असें जर तुम्ही समजत असाल तर तो योग्य नाही. तुम्ही पाहू शकत नाही कीं, तुमचे मुलगे आणि त्यांचे दोस्त मोठ्या संकटात आहेत ह्या पांडवांच्या प्रगतीमुळें. जर हे असेंच होत गेले तर तुम्ही राजे रहाण्याच्या योग्यतेचे उरणार नाही. जो दुसर्याच्या सल्ल्याने निर्णय घेतो तो कधीच त्या सल्लागाराच्या पेक्षा जास्त पुढे जाऊ शकत नाही. सल्लागार नेहमी प्रथम स्वतःचे हित राखून सगळे सल्ले देत असतो. म्हणून दुसर्याकडून सल्ला घेतांना ज्या कांहीं गोष्टी सांभाळणे अगत्याचे असते त्याचे भान मी राखूनच माझे निर्णय घेत असतो. तुम्ही व तुमचे सल्लागार असलेले वडीलधारे ज्या पद्धतीने विचार करतात ते मला मंजूर नाही कारण त्यात आम्हा कौरव भावंडांचे हित मला तरी दिसत नाही. बृहस्पतिने सांगितले आहे किं, सामान्य माणूस व राजा ह्यांच्या दृष्टींत फरक असतो. म्हणून राजाने नेहमी सावध राहून व भविष्यातील घटनांचा अंदाज घेऊन त्यांना सामोरी जाण्याच्या तयारीने सगळी धोरणं आखावयाची असतात. जिंकणे हाच केवळ एकमेव उद्देश क्षत्रियाचे खरे लक्षण असते. समाधानी रहाणे हे क्षत्रियाचे लक्षण नाही. ते ब्राह्मणांचे व सामान्य माणसांचे असू शकते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी कोणते साधन, धोरण स्वीकारावयाचे, त्यात चांगले कीं वाईट हे महत्वाचे नसते. आपल्या शत्रूचे

वैभव त्याच्या कडून खेचून घेणे हेंच क्षत्रियाचे कर्तव्य असले पाहिजे. हे एक प्रकारचे युद्ध आहे. पांडवांना मी चुलत भाऊ म्हणून पहात नाही तर माझे, आम्हा कौरवांचे, शत्रू म्हणून पहातो हे तुमच्या केव्हां लक्षात येणार? साधन सुचीता महत्वाची नसते खर्या युद्धात, जिंकणे महत्वाचे असते. कोणाला मित्र मानावयाचे व कोणाला शत्रू हे त्याच्या नात्याने अथवा परिस्थितीने ठरत नाही. ज्याच्या प्रगतीमुळें आपल्याला दुःख होते तो शत्रू हि खऱ्या शत्रूची माझी व्याख्या आहे. ज्याच्या प्रगतीमुळें आनंद होतो त्याला मी मित्र समजतो. पांडवांच्या प्रगतीमुळें आम्हा कौरवांना दुःख होते म्हणून ते आमचे शत्रू ठरतात तर कर्णाच्या प्रगतीमुळें आम्हा कौरवांना आनंद होतो म्हणून तो आमचा मित्र ठरतो. अहो तात, तुम्ही आम्हाला समाधानी रहाण्यास सांगता, परंतु, समाधानी माणसें कधीही प्रगती करत नाही. असमाधानीपणा हेंच प्रगतीचे मुख्य कारण असते. खरे क्षत्रिय कधीही समाधानी नसतात. तसें आम्ही सुद्धा समाधानी नाही. हे खरे राजकारणी जाणतात. जो क्षत्रिय समाधानी झाला त्याचा नाश होणारच असा अनुभव आहे. शत्रू बेसावध असतांनाच हल्ला करावयाचा असतो. असे पहा, जेव्हां नमुची बेसावध होता तेव्हांच शक्राने त्याचे शीर उडवले. जर नमुची सावध असतां तर शक्र ते करू शकला नसता. म्हणून युद्धात नेहमीचे नितिशास्त्राचे नियम लागू होत नाहीत. युद्धाचे नितिशास्त्र जरा माझ्याकडून तुम्ही समजून घ्या. राजकारण हा जिंकण्याचा उद्योग आहे. त्यात प्रतिस्पर्ध्याला फसवणे हांच धर्म असतो. न फसवता कोणीही कोणालाही जिंकू शकणार नाही. म्हणून राजकारणातील धर्म वेगळा असतो हे, अहो तात, आपण विसरला अहात कां? मग ते युद्धातील असों अथवा द्युतातील असो. साप त्याच न्यायांने बेडकांस गिळतो, पृथ्वी निष्कर्मी राजाला खाते, ब्राह्मण जो फिरत नाही त्याला तो देश खातो. अहो राजे, कोणीही असांच शत्रू ठरत नाही त्यासाठी ज्यांचे ईप्सित आपल्या उद्देशाच्या आड येते तोंच स्वाभाविकपणे शत्रू ठरतो. पांडवांचे व आमचे उद्देश एकच असल्यामुळें ते माझे शत्रू ठरतात. जो मूर्खपणाने आपल्या प्रतिस्पर्धाच्या चालीकडे दुर्लक्ष करतो तो नष्ट होतो, असा नियम आहे. जसें, रोग वाढण्या आधीच त्याचा पायबंद करावयाचा असतो. काहीं रोग वेळीच थांबवले नाहीत तर तो रोग त्याला मारून टाकतो. शत्रू कितीही क्षुद्र दिसत असला तरी जर त्याचा पायबंद वेळीच केला नाही तर तो शत्रू, जसे वाळवी छोटी असली तरी मोठे झाड खाऊन टाकते तसा,

मारून टाकतो. त्यासाठी अहो अजामिदाचे वारस, पांडवांच्या उत्कर्षाला स्वताचा उत्कर्ष समजून संतुष्ट राहू नका. पांडवांचे वैभव आपल्यासाठी आनंद व्यक्त करण्याची बाब नाही तर चिंता करण्याची बाब आहे हे तुमच्या केव्हां लक्षात येणार? जर मला उत्कर्ष करावयाचा असेल तर इतर कोणाला कां मारू? मी पांडवांचा नाश करून ते मिळवले तर काय हरकत आहे? धूर्तपणाने जर मी ते साध्य केले तर आपल्याला कां वाईट वाटते? ह्याला राजकारण समजा हवेतर, पण मला अडवू नका. माझ्या कुवतीला सगळे आप्त हसत आहेत हे तुमच्या कसे लक्षात येणार कारण, तुम्ही अंध अहात जर तुम्हाला डोळे असते तर मला तुम्ही अडवले नसते. तुम्हाला आमच्या पेक्षा पांडव जास्त विश्वसनीय वाटतात कां? तुमचे खरे वारस कोण? पांडव कां आम्ही तुमच्या रक्ताची मुलं? मी कसेही करून हे द्युतयुद्ध करून दाखवणार आहे किं, मी पांडवांना चीत करू शकतो. मग ते युद्धात असेल अथवा द्युतात. आपण पांडवांना फक्त द्युताचे आमंत्रण देणार आहोत, त्यांने ते स्वीकारले तर ते खेळतील व जर हरले तर त्यात आपला काय दोष? माझी आता अशी मनस्थिती आहे कीं, जर कांहीं नाही केले तर माझे कांहीं खरे नाही हे आत्ताच तुम्हाला सांगून ठेवतो. कारण पांडव सतत मोठे होत आहेत, आणि आम्ही, तुमची मुलं, जैसे थे असें आहोत".

अशारितीने सभा पर्वातील द्युत पर्वाचा पंचावन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग छप्पन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

ते बोलणे होत असतांना तेथे हजर असलेले शकुनी मध्येच बोलतो. "अहो आमचे शूरवीर राजे, मी तुम्हाला विश्वास देतो कीं, त्या युधिष्ठीराची सगळी संपत्ती तुमच्या साठी ह्या द्युताच्या मदतीने काढून आणीन, त्यावर विश्वास असू द्या. ते झाल्यानंतर तुमच्या आत्म्यास शांति प्राप्त होईल. कोणालाही न मारता जर आपण केवळ युक्तीने ते साध्य करणार त्याला कां कोणी विरोध करणार? विनाहत्त्या आपण हे साध्य करणार म्हणून उलट आपले कौतुक व्हावयाला पाहिजे. फक्त मला द्युताचे फासें टाकण्याची परवानगी द्या बाकीचे नुसते पहात रहा". शकुनी मोठ्या आत्मविश्वासांने बोलतो. "म्हणून, कृपया त्या कुंतीपुत्राला आणखीन समय न दवडता द्युताचे आमंत्रण द्या . मी एक वेगळ्या प्रकारचा योद्धा आहे, माझे द्युत हे धनुष्य, फासे माझे बाण, त्याचे फेकणे माझ्या धनुष्याची दोरी आणि द्युताचा सारीपाट आहे माझा रथ. दैववादी युधिष्ठीराला समजू द्या कसे त्याचे फळफळलेले हे दैव माझ्या द्युताने मी उलटवतो ते". ते विश्वासपूर्ण उद्गार ऐकल्यावर दुर्योधन त्याच्या बापाला बोलतो, "हा पहा माझा मामा त्याच्या द्युतकलेने युधिष्ठीराचे दैव फोडणार आहे व आपल्याला ती संपत्ती विनायुद्ध म्हणजे शांततेच्या मार्गाने कोणाचाही मृत्यू न होता मिळवून देण्याचे आश्वासन देत आहे तरी त्याला द्युत खेळण्याची परवानगी द्यावी. पाहू या युधिष्ठीराचे दैव मोठे कां माझ्या मामाचा द्युत मोठा"!

दुर्योधनाची आग्रही भूमिका ऐकल्यावर तो अंध राजा आपल्या मुलाला सांगतो, "अरे दुर्योधना तुला माहीत आहे कीं, मी कोणताही निर्णय माझ्या धाकट्या भावाची संम्मति घेतल्याशिवाय करत नाही. म्हणून मी प्रथम त्याच्याशी बोलेन मग काय ठरेल तसे करू". ते ऐकल्यावर हात झटकत दुर्योधन बोलतो, "ते तुमचे बंधू, नेहमी पांडवांच्याच बाजूचे असतात. त्या आमच्या काकाचे मत आमच्या विरुद्धच नेहमी असते. म्हणून मला खात्री आहे कीं, ते ह्या द्युताच्या प्रस्तावाला मंजूरी देणार नाहीत. जो राजा दुसर्याच्या सल्ल्यावर अवलंबून असतो तो कधीच निर्णय घेऊ शकत नाही. दोन माणसांचे विचार जुळणे नेहमीच अवघड असते. जो मूर्ख परिणामांना घाबरून निर्णय घेणे टाळतो त्याची गत पांवसात वाहून जाणार्या किड्यासारखी असते. एकाद्याला आजारपण किंवा यम भेटण्यासाठी तो

समृद्ध होण्याची वाट पहात नाही. म्हणून जोवर तुमच्यात धमक आहे तो पर्यंत जे साधायचे आहे ते साधणेच श्रेयस्कर असते".

त्यावर धृतराष्ट्र त्याला सांगतात, "अरे मुला, आपल्यापेक्षा जास्त बलवान असणार्याशी कोणीही शहाणा वैर करत नाही कारण अशा वैरातून फक्त नुकसानच पदरी पडते. तुझा प्रस्ताव त्यासाठी योग्य नाही. त्यामागे विवेक नाही तर केवळ द्वेषभाव आहे. द्वेषाचा उपयोग शस्त्रासारखा करू नकोस. ते शस्त्र पोलादाचे नाही पण मोठे युद्ध सुरु करण्यास पुरेसे आहे. एकदा ते द्वेषाचे परिणाम सुरु झाले कीं, मोठी मोठी शस्त्रं बाहेर येतात. आणखीन एक शंका येते, जर समजा शकुनी युधिष्ठीराला द्युतात हरवू शकला नाही तर तुझे जे आहे तेसुद्धा पांडवांचे होईल त्याचा विचार तू केला आहेस कां"? ते ऐकल्यावर शकुनी मध्येच बोलतो, "सर्वांना माहीत आहे युधिष्ठीराचे द्युताचे कसब म्हणून तो सवाल उपस्थित होत नाही, आमचे राजे".

दुर्योधन आपल्या बापाला सांगतो, "फार प्राचीन काळी माणसांने द्युताचा शोध लावला. त्यामुळें हत्येशिवाय, युद्धाशिवाय शांततेच्या मार्गाने लढाया जिंकण्याचे साधन माणसाला उपलब्ध झाले होते. केवळ दैवाचे साधन वापरले म्हणजे त्या चार कर्मयोगी पांडवांच्या कर्तृत्वाचा पुरता फडशा पाडता येईल. युधिष्ठीर दैववादी म्हणून तो त्याचे वडीलकीचा दबाव वापरून त्या कर्तृत्वान पांडवांना गप्प करील आणि तेसुद्धा आज्ञाधारक मूर्खासारखे गप्प रहातील. त्याचाच आपल्याला उपयोग करावयाचा आहे. शत्रूच्या कमजोरीचा उपयोग करणे हे एक राजकारणातील धोरण असते म्हणून त्यात कांहींही गैर नाही. त्यासाठी वेळ न दवडता शकुनीच्या प्रस्तावाला मान्यता द्या आणि त्वरित द्युतासाठी एक सभागृह तयार करण्याची आज्ञा द्यावी. शांततेच्या मार्गांने आम्ही वैभव मिळवणार असल्यामुळें इंद्राला आम्हालाच मान्यता द्यावी लागेल. त्यासाठी द्युत हाच खरा मार्ग ठरणार आहे. लढणे व माणसांना ठार मारणे हे पापकारक ठरते कारण त्यामुळें मोठ्या प्रमाणात हिंसा होत असते. त्यात युधिष्ठीर आणि आम्ही एकाच योग्यतेचे ठरणार आहोत. पांडवांनी हिंसा करून जे मिळवले ते आम्ही शकुनीच्या नेतृत्वात शांततेने करून दाखवणार आहोत. युद्धापेक्षां द्युताचा मार्ग शांततामय असल्यामुळें इद्राला हा मार्ग दैवी कार्यक्षेत्रात सन्मान्य करावा लागेल.

ते ऐकून धृतराष्ट्र बोलतात, "तुझ्या बोलण्याने माझ्यासाठी कांहींही सिद्ध होत नाही. तुला जे योग्य वाटते ते कर, तू येथे राजा आहेस. परंतु, तुझ्या निर्णयाचे परिणाम तुलाच भोगावे लागणार आहेत हेसुद्धा लक्षात घे. अशा युक्तिवादानें तुला समृद्धी प्राप्त होईल असे जर तुला वाटत असेल तर ते शक्य होणार नाही. कारण द्युत हा असत्यावर आधारीत असतो. त्यात दैवी प्रवृत्ती नसते. द्युत असुरीप्रवृत्तीचे प्रतिक आहे हे सगळे जाणतात. युद्ध आणि त्यामुळें मिळणारा मृत्यू प्रशस्त असतो कारण जन्मणारे मरणे हांच नियम आहे. त्यामुळें शांतता ही कांही युक्त बाब समजली जात नाही. विदूरानी शांततेचाच मार्ग अवलंबला आहे पण त्यात द्युतासारखा असत्यावर आधारीत मार्ग नाही. द्युत कधीही खरेपणावर आधारीत नसतो हे तुला माहीत आहे म्हणून त्याची अशा रितीने शिफारस करणे केवळ मिथ्याचार ठरतो. क्षत्रियांचा नाश होण्याचे भाग्यात असेल तर ते होणारच. अगदी प्राचीन काळांपासून असें होत आहे".

वैशंपायन सांगत असतात, द्युताचे दुर्योधनाने केलेले समर्थन प्रशस्त नसतांना तो अंधत्वामुळें दुबळा झालेला राजा दैववादी होतो व आपल्या अविवेकी मुलापुढे एका प्रकारे हार मानतो. तेथे असलेल्या सेवकांना एक सभागृह बांधण्याची आज्ञा मोठ्याने ओरडून देतो. लवकरच राजांनी सांगितल्या प्रमाणें, मौल्यवान रत्नांनी जडवलेले शंभर खांबी सभागृह उभे होते. त्याला सभोवार शंभर द्वार होते. सोन्याचे पत्रे आणि नीलमणी वापरून सर्व महाल मढवला गेला होता, सुंदर कमानी उभारून त्यावर त्या महालाचे बांधकाम केलेले होते. त्याची लांबी व रुंदी दोन कोस एवढी होती. राजाच्या त्या आज्ञेनुसार शेकडो कारागिर त्या कामात गढून जातात. त्यात जे कांहीं देखणे असेल ते सगळे समाविष्ट केलेले होते. सुंदर विविध रंगांचे गालिचे आंथरलेले होते. परंतु त्याची सर पांडवांच्या मायासुरांनी उभारलेल्या सभागृहाशी होत नव्हती. त्याचे दुःख दुर्योधनाला होते.

ते तयार झाल्याचे धृतराष्ट्राला कळवण्यात येते. सर्वकांहीं जाणणारा तो अंध राजा त्याच्या भावांस जो त्याचा मंत्रीसुद्धा होता त्या विदूराला बोलावतो. त्याला आज्ञा देतो किं, त्याने लवकरात लवकर खंडप्रस्थास प्रयाण करावे आणि युधिष्टीराला व त्याचा भावंडाना घेऊनच यावे. तो अंध राजा आता इरेला पेटलेला, ठरवून असतो कीं, जे व्हावयाचे ते होणारच. धृतराष्ट्र विदूराला सांगतो, "माझ्या पुतण्याना पाहू दे आमचा नवा वाडा आणि

आल्यासारखे जर त्यांचीसुद्धा इच्छा असेल तर एक द्युताचा डाव होऊन जाऊ द्यावा कारण, मला माहीत आहे, कीं, युधिष्ठीराला द्युत खेळावयाला आवडते".

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा छप्पन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग सत्तावन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, राजा धृतराष्ट्र त्याच्या मुलांचा निश्चय पाहून आणि त्यामुळे जे कांहीं होणार त्याची कल्पना असतांना विदूराला ती पांडवांना पाचारण करण्याची आज्ञा देतात. विदूर तरीसुद्धा, त्याच्या दूर धोरणाने ते करण्यास नकार देतो. तो त्याच्या ज्येष्ठ बंधूस बोलतो, "बंधू, आपण जाणता ह्यात सगळे कुळ नष्ट होऊ शकते, त्यासाठी मी तुमची ही आज्ञा मान्य करू शकत नाही. प्रथम त्या भावंडांत फाटाफूट होईल. त्यातून शत्रूत्वाची सुरुवात होईल, म्हणून आपण केवळ मुलाच्या प्रेमाखातर असा विघ्नकारक निर्णय घेऊ शकत नाही. दुर्योधनाचे वागणे अविवेकी आहे हे स्पष्टपणे दिसत असतांना असा घातक निर्णय आपण कसा घेऊ शकता? आमंत्रणाचे ठीक आहे पण त्यात मैत्रीपूर्ण किंवा कसाही, द्युत खेळण्याचा भाग नसावा".

हवालदील झाल्यासारखा तो हस्तिनापुरीचा राजा विदूराला सांगतो, "अरे बंधू जर दैव सुयोग्य असेल तर सगळे ठीक होईल. शेवटी जे कांहीं सृष्टीत घडते ते सर्व त्या विधात्याच्या संम्मतीनेच होत असते. ज्या त्वेषाने माझा मुलगा त्याचा आग्रह चालू ठेवत आहे, मला वाटते की, कदाचित ही त्यांच्या दैवाचीच प्रेरणा आहे. मी ते बदलू शकेन असें वाटत नाही. मी दुर्योधनाला त्या पासून अटकाव करण्याचा बराच प्रयत्न केला परंतु, माझ्या बायकोचा भाऊ, सुवलाचा पुत्र, शकुनी त्याला सतत उत्तेजन देत आहे कीं, तो युधिष्ठीराला लिलया द्युतात हरवेल व त्या मार्गाने पांडवांनी जे मेहनत करून जिंकून मिळवले ते सगळे केवळ दुर्योधनाचे करून देईल. त्या मोहात माझा मुलगा अडकला आहे व त्याचा आग्रह पहाता मला तरी दुसरा कोणताही पर्याय दिसत नाही म्हणून कृपया त्याप्रमाणे तुम्ही करावे. जे होईल त्यात युधिष्ठीरसुद्धा तितकाच जबाबदार असेल जितका माझा मुलगा, जर तो त्या द्युताचे आमंत्रण स्वीकारेल. म्हणून त्या कुंतीपुत्रांना तू घेऊन ये .

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा सत्तावन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग अठ्ठावन्नावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर विदूर दिलेल्या आदेशानुसार परंतु, त्याच्या मर्जी विरुद्ध इंद्रप्रस्थाकडे निघतो. त्याच्याकडे वेगांने धावणारे घोडे असतात. आतून अस्वस्थ असलेला तो दूर धोरणी विदूर पांडवांच्या घराकडे इंद्रप्रस्थी निघतो. तेथे पोहोचल्यावर तो तडक पांडवांच्या वाड्याकडे जातो. तेथे अनेक ब्राह्मण त्याची पुजा करून स्वागत करतात. तो महाल कुबेराच्या महाला सारखा दिव्य होता. त्यानंतर तो धृतराष्ट्राचा गुणी प्रधान, युधिष्ठीराला भेटतो ज्याचा जन्मदाता यम आहे. त्याचे तो तेजस्वी अजमिदा, जो सत्याचा पुरस्कर्ता आहे, असा युधिष्ठीर स्वागत करतो. तो अजातशत्रू विदूराचे पुजन करतो. त्यानंतर तो धृतराष्ट्र आणि इतर वडीलधार्यांचे क्षेमकुशल विचारतो. विदूराच्या चेहर्यावरून युधिष्ठीर समजतो कीं, कांहीतरी बिघडले आहे. तो खत्ताला (विदूराला) विचारतो, "काय बात आहे? तुमचा चेहरा सांगतोय कीं, आपण अस्वस्थ अहात. असें काय झाले आहे कीं, आपण एवढे बेचैन झाला अहात"? तुम्ही येथे मजा करावयाला आला अहात कां? सर्वकाही तेथे ठीक ठाक आहेना? धृतराष्ट्राचे पुत्र आज्ञाधारकपणे सगळे काम करतात कीं नाही? कां ते कांहीं नेहमी प्रमाणे आगळीक करून म्हातार्या बापाला त्रास देत आहेत? मला आशा आहे सर्व कांहीं यथायोग्य आहे, अशी मी आशा करतो. अशी सगळी पृच्छा ऐकल्यावर त्याला विदूर सांगतो, "धृतराष्ट्र व त्याची मुलं बरी आहेत. त्याच्या सग्यासोयर्यांच्या मदतीने त्याचा राज कारभार व्यवस्थित चालू आहे". त्याचा कारभार इंद्राच्या कारभारासारखा आहे. त्याची मुलं त्याच्या आज्ञेत आहेत व सगळे कांहीं उत्तम आहे. तो प्रभावी राजा स्वताचे महत्व वाढवण्याच्या योजना आखत आहे. कुरु राजाने तुमच्या ख्यालिखुशालीची चौकशी करण्यासाठी मला येथे पाठवले आहे. तुम्हाला कांहीं दिवसांसाठी हस्तिनापुराला येण्याचे आमंत्रण देण्यासाठी मला पाठवले आहे. त्यांनी एक नवीनच महाल बांधला आहे. तो तुमच्या महाला इतका श्रेष्ठ आहे कां ते पहाण्यासाठी पृथाच्या पुत्रांना त्यांने बोलावले आहे. तेथे थोडे दिवस मजा करावी व खेळावे आणि आनंद करावा असें त्यांचे म्हणणे आहे. तेथे युधिष्ठीराला आवडणारा द्युताचा डाव सुद्धा आयोजित केला आहे म्हणजे तो त्याच्या प्रिय खेळात रमू शकेल. इतरही त्यांच्या

आवडीच्या खेळात रमू शकतील. एकंदर सर्व विचित्रवीर्याची नातवंड एकत्र आनंदात रहावीत असें त्यांना वाटते तरी तेथे निघण्यास तयार व्हावे. इतर सगळे कुरु घराण्याचे आप्त आधीच आले आहेत. फक्त तुम्ही नव्हता म्हणून मला तुम्हाला आणण्यासाठी पाठवले आहे. एरव्ही सगळ्यांच्या खेळांची व्यवस्था होते पण तुझ्या आवडीच्या द्युताची व्यवस्था कोणी करत नाहीत म्हणून तुझ्यासाठी खास द्युत खेळणारे सुद्धा बोलावले आहेत. बरेच दिवसांपासून तू द्युत खेळला नसशिल तर तुझी ती इच्छा तेथे तू पूर्ण करू शकशिल. अहो इंद्रप्रस्थाचे प्रभू आमच्या राजाचे हे आमंत्रण आपण स्वीकारावे व निघावे".

युधिष्ठीर विदूराला बोलतो, "जर आम्ही द्युत खेळावयास बसलो तर आमच्यात भांडणे होणारच. ज्या माणसाला हे माहीत आहे तो असें द्युत खेळण्याचे आमंत्रण कसें स्वीकारेल? तुम्हाला काय वाटते आम्ही काय करावे"? तुमच्या आज्ञेनुसार आम्ही तेथे वागू".

ते ऐकून विदूर त्याला सांगतो, "मला माहीत आहे कीं, द्युत दुःखाचे कारण आहे. मी राजाला ते न करण्याचे सांगत आहे पण तो त्याच्या मतात बदल करण्यास तयार नाही. म्हणून त्याने मला तुम्हाला आमंत्रण देण्यासाठी पाठवले आहे. मला पसंत नाही ही योजना परंतु आता तुम्ही मोठे झाला अहात तेव्हां तुम्ही तुमचे निर्णय स्वतः घ्यायला पाहिजेत"

युधिष्ठीर बोलतो, "मला सांगा तेथे धृतराष्ट्राच्या सोबत आणखीन कोण लुच्चे जुगारडे जमा झाले आहेत"? मला सगळे सांगा अहो आमचे विश्वासू काका, कांहीं लपवून ठेवू नका. तेथे मला कोणाबरोबर खेळावे लागेल ते सांगा. आमच्या मालमत्तेवर कोणाची नजर आहे ते समजले पाहिजे". त्याला विदूर सांगतो, "तेथे गंधारचा राजा शकुनी तुझ्याबरोबर खेळणार आहे. तो द्युतात अव्वल आहे, कधीही आजवर हरलेला नाही. डाव लावण्यात व तो जिंकण्यात तो कोणालाही हरणारा नाही. त्याशिवाय विवींगती, राजा चित्रसेन, सत्यव्रत, पुरुमित्र, जय असें इतर खेळणारे आहेत".

युधिष्ठीर बोलतो, "म्हणजे जबरदस्त जुगारी खिलाडी तेथे जमणार आहेत जे द्युतात लुच्चेगिरी करण्यात एक अव्वल आहेत. कोणीही कितीही खोटा असला तरी शेवटी विधात्याच्या मर्जीबाहेर कांहींही जात नाही. जुगार सुद्धा नशिबाचाच खेळ आहे असें मी समजतो, मग त्यात कितीही लुच्चेगिरी कोणी करोत. मी मात्र धृतराष्ट्र बोलावतो म्हणून

तेथे जाऊन द्युत खेळणार नाही. पिता आपल्या पुत्रासाठी काही करत असतो. मला खात्री आहे ह्यात दुर्योधनाचा डाव आहे परंतु, अहो काका मला खरे ते सांगा. काय आमच्यासाठी योग्य असेल, विचारण्याचे कारण आम्ही नेहमीच तुमच्या मार्गदर्शनाची प्रतिक्षा करत असतो. मी द्युत खेळण्यास उत्सुक नाही. त्या लुच्च्या शकुनीनी मला आव्हान दिले तरी मी ते घेणार नाही. परंतु, जर त्यांने मला आव्हान दिले तर मी काय करावे"? मला ते आव्हान स्वीकारावेच लागेल नाहीतर तो आमच्या इभ्रतीचा प्रश्न होईल. क्षत्रियाला द्युतसुद्धा खेळता आला पाहिजे व त्यातसुद्धा त्याला यश मिळवायला पाहिजे असें म्हणतात. युद्ध आणि द्युत हे दोन मार्ग क्षत्रियांना अवगत असले पाहिजेत. द्युतात काय किंवा युद्धात काय लुच्चेगिरी असतेंच. खर्या लढाया अखेरीस लुच्चेगिरी करूनच जिंकता येतात जेव्हां लढण्याची कुवत कमी असते, तरी ते सर्वमान्य असते. नशीब दोनही ठिकाणी तितकेच बलवत्तर असते. मी आजवर जे प्राप्त केले ते माझ्या नशीबानेच असें मी समजतो".

वैशंपायन नंतर सांगतात, विदूराशी एवढे बोलल्यावर तो हस्तिनापुरास निघण्याच्या तयारीला लागण्याची आज्ञा करतो.

दुसर्या दिवशी राजा युधिष्ठीर त्याच्या सर्व परिवारासह, ज्यात द्रौपदी आणि इतर बायका होत्या हस्तिनापुराकडे निघतात.

युधिष्ठीर विचार करत असतो, "असें वाटते डोळ्यासमक्ष एकादी तेजस्वी गोष्ट खाली कोसळत आहे, केवळ दैवाच्या खेळामुळें. दैव आपल्याला विवेकापासून दूर ठेवते, बर्याच वेळी आपल्याला माहीत असूनही आपण त्या धोक्याच्या ठिकाणी जातो कारण दैव ते करावयास लावतेय. इच्छा असो अगर नसो तो माणूस त्या गोष्टी करण्यास प्रवृत्त होतो कारण परिस्थिती त्याला दुसरा पर्याय ठेवत नाही. कोणीही त्याला त्यानें घेतलेल्या निर्णयावरून दोषी ठरवू शकतो पण त्याच्या त्या निर्णयावर असलेला दैवाचा प्रभाव कोणीही समजून घेत नाही. दैव कोणालाही टाळता येत नाही. जेव्हा आपले दैव सोयिस्कर असते तेव्हां सगळे कर्तृत्वाचे कौतुक करतात पण जेव्हां दैव सोयिस्कर नसते तेव्हां सुद्धा तितकेच उत्तम कर्तृत्व असले तरी त्यात यश येत नाही व त्या कर्तृत्वाची निर्भत्सना होत असते". असां विचार बोलत तो राजा विदूराबरोबर जास्त कांहीं न बोलता निघतो. तो

शत्रूघ्न वल्हीकांने दिलेल्या रथातून आपल्या कुटूबियांसह प्रवासास निघतो. त्याच्या अंगावर त्याच्या योग्यतेप्रमाणे देखणा पोशाख होता. त्याच्या बरोबर त्याचे बंधू त्यांच्या रथातून येत होते. त्यांच्या त्या रथांच्या पुढून ब्राह्मण चालत होते. ते सगळे त्यांच्या काकाच्या आमंत्रणामुळें जरी जात होते त्यांना त्या मागील उद्देशाबद्दल शंका होत्या. युधिष्ठीरा प्रमाणे ते दुसरे पांडवसुद्धा दैवाच्या खेळाचा अदाज घेत होते. काळाचा असा कोणता खेळ ह्यामुळें सुरु होत आहे त्याचा विचार करत होते. हस्तिनापुरास आल्यावर तो इंद्रप्रस्थाचा राजा त्याच्या काकाला भेटतो. त्यानंतर तो व त्याची भावंड भिष्म, कृप आणि द्रोण ह्यांना भेटतात. तो तेथे त्यांना आलिंगन देतो. परस्पर आंदोलनाने ते आपापले प्रेम व्यक्त करतात. त्यानंतर ते सोमदत्तास भेटतात. त्यानंतर दुर्योधनाला भेटतात. त्याबरोबर शल्य, शकुनी आणि दुसरे राजे जे तेथे आले होते त्याना सुद्धा भेटतात. त्या नंतर तो दुःशासनाला आणि इतर सगळ्या कौरवांना भेटतो. त्यानंतर तो जयद्रथाला भेटतो आणि इतर सगळे कुरु घराण्यातील कुटूंबियांना सुद्धा भेटतो. त्या सगळ्या भेटीगांठी झाल्यावर ते धृतराष्ट्राच्या कक्षात जातात आणि चुलती गांधारीला आपला आदर व्यक्त करतात. तिच्या अनेक सुना सगळ्या तेथे त्यांना भेटतात. त्यांना गांधारी शुभेच्छा देते. त्यानंतर युधिष्ठीर त्याच्या वृद्ध काकाला भेटतो. धृतराष्ट्र त्याच्या कपाळाचे चुंबन घेतो. त्यानंतर तो त्यांचा काका इतर पांडवाच्या कपाळांचे चुंबन घेतो. त्या प्रकारे तो त्याच्या शुभेच्छा त्यांना देतो. पांडवांना पाहून तेथे जमलेले कुरु घराण्याचे कुटूंबी फार आनंदी झाले. भेटण्याचा विधी संपल्यानंतर राजा त्यांना त्यांच्या दालनात जागा दाखवतो. त्यांची दालनं रत्न, हिरे आणि मोती अशा मौल्यवान खड्यांने मढवलेले होते. पांडवांच्या मायासुराने बांधलेल्या सभेची नक्कल करण्याचा तो प्रयत्न होता. आम्ही कांहीं कमी नाही, असें दाखवण्याचा तो प्रयत्न होता. सगळे पांडव आपल्या दालनात गेल्यानंतर कौरव परिवारातील स्त्रीया दुःशलाच्या नेतृत्वात त्यांना भेटण्यास जातात. कौरवांच्या बायकांनी द्रौपदीचे सौंदर्य, वैभव व तेज पाहून मत्सराने बेचैन झाल्या. पांडवांतील पुरुष मंडळी त्या स्त्रीयांना भेटल्यानंतर आपल्या इतर कामासाठी व दैनिक कर्मकांडं करण्यासाठी तेथून निघून गेले. ते उत्तम जातीच्या चंदनाचे गंध अंगाला लावून आपल्या ब्राह्मणांबरोबर नित्य विधी करतात. सुदैव सदैव आपल्या बरोबर रहावे म्हणून ते अंगावर शुभचिन्हं गंधाने काढतात.

त्यानंतर ते नित्या प्रमाणे ब्राह्मणांना दानं करतात. ब्राह्मण त्यांना आशिर्वाद देतात हे सर्व नित्याप्रमाणे होते. "?

ते सगळे झाल्यावर ते जेवतात. त्यांचे जेवण स्वादिष्ट असते. त्यानंतर ते निद्रा घेण्यासाठी आपल्या कक्षात जातात. त्यांच्या झोपण्याच्या कक्षात सुमधूर संगीत सुंदर स्त्रीयांकडून वाजवले जात होते. त्यांची रात्र त्या स्त्रियांबरोबर मजेत गेली. ते जसे उठले तेथे पुनः श्रवणीय धून ऐकू येत होती. सगळे मोठे आनंदमय होते. नेहमीचे प्रातर्विधी उकरून व धार्मिक विधी उरकून ते सभागृहात आले. तेथे आधीच द्युत खेळणारे जमा झाले होते ते त्यांचे स्वागत करतात.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा अठ्ठावन्नावा भाग संपला.

# सभा पर्व भाग एकोणसाठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, पृथाची मुलं त्यांच्या मोठ्या भावाच्या नेतृत्वाखाली त्या सभागृहात प्रवेश करतात. तेथे पोहोचल्यानंतर ते तेथे उपस्थित असलेले इतर राजेरजवाडे त्यांना भेटतात व त्यांच्या यशस्वी राजसूय यज्ञाबद्दल त्यांना अभिनंदन देतात. पांडव त्यांना अभिवादन करतात ज्याची वयोमानानुसार त्याप्रकारची योग्यता होती. त्यानंतर ते पराक्रमी पंडुपुत्र तेथे ठेवलेल्या सुंदर सजवलेल्या प्रशस्थ आसनांवर विराजमान होतात. ते व्यवस्थित बसल्यावर सुवलाचा मुलगा शकुनी युधिष्ठीराला बोलतो, "अहो राजर्षी, आता सभागृह भरलेले आहे. सगळे आपल्या आगमनाची प्रतिक्षा करत आहेत. तरी कृपया द्युताचा डाव सुरु करू. त्यासाठी जे नियम असावेत ते सुद्धा निश्चित करण्याचे काम सुरु करू". युधिष्ठीर त्याला बोलतो, "द्युतात लुच्चेगिरी हा नेहमीचा धोका असतो कारण, त्या द्युतात क्षात्र तेज नसते तो सावकारीचा प्रकार ठरतो. जो द्युत सच्चाईने खेळला जातो तोच क्षत्रियांचा खेळ समजला पाहिजे. ज्या द्युतात सच्चाई नाही तो द्युत पापकारक असल्यामुळें मी तसा द्युत खेळण्यास बांधलेला नाही म्हणजे, आपल्यापैकी कोणीही खरा क्षत्रिय बांधलेला नाही". ते ऐकल्यावर शकुनी विचारतो, "जर असें आहे तर तुम्हाला द्युत कां आवडतो"? युधिष्ठीर सांगतो, "मी आताच सांगितले कीं, सच्चाईने जो द्युत खेळला जातो तो क्षत्रियांचा द्युत असतो व ज्या द्युतात फसवणूक आहे तो वैश्यांचा द्युत असतो व तो मला मान्य नाही. अरे शकुनी, तू जो द्युत खेळतोस तो फसवाफसवीचा असतो हे सगळे येथे असलेले राजे जाणतात. तशा असत्यावर आधारित द्युतात मला रस नाही. जर खरा प्रामाणिक द्युत असेल तरच तो क्षत्रियांनी खेळावयाचा असतो. त्याला उत्तर देण्यासाठी शकुनी बोलतो, "उच्चकुलीन द्युत खेळणारे जाणतात द्युतातील बारकावे. त्यातील चतुर चालीसुद्धा ते जाणतात. प्रतिस्पर्ध्याला घाबरवण्यासाठी ज्या चाली खेळल्या जातात त्यांना कोणी फसवणूक समजत असेल तर ते योग्य नाही. प्रतिस्पर्ध्याचे अंदाज खोटे ठरवण्यासाठी कांहीं डाव केले जातात त्यांनासुद्धा कांहीं कच्चे खेळाडू फसवणूक समजतात तेसुद्धा योग्य नाही. ज्याला हे सगळें बारकावे समजतात तो न घाबरता त्या सगळ्या चाली द्युत खेळाचा भाग आहेत हे समजून, तो खेळू शकेल. फांसा

आपल्या बाजूचा पडणे अथवा विरुद्ध बाजूला पडणे हांच तर खेळ आहे. त्यात आणखीन काय फसवणूक होऊ शकते? फांसा फेकण्यात फक्त कला असते. ज्याच्या कडे ती आहे तो जिंकत जातो, एवढेच सत्य ह्या खेळात आहे. समजलास कां पृथा पुत्रा? द्युताबद्दलचे गैरसमज ते लोक पसरवतात, ज्यांना हे फांशा फेकण्याचे तंत्र समजत नाही". एवढे बोलल्यावर शकुनी सांगतो, "चला वेळ व्यर्थ न दवडता खेळाला सुरुवात करू".

शकुनीचे ते फसव्या द्युताचे समर्थन न पटल्यामुळें युधिष्ठीर बोलतो, "ते सर्वश्रेष्ठ मुनी देवल, असितांचे पुत्र, ज्यांच्या कडून मी मार्गदर्शन घेतले आहे त्यांनी ह्या अशा सर्व गोष्टींबद्दल जे सांगितले आहे ते पाहिले पाहिजे. कोणत्या कृतीमुळें क्षत्रिय स्वर्गात जातो व कोणत्या कृतीमुळें तो पाताळात जातो ते त्यांनी सांगितले आहे व ते नियम सर्व कुलिन क्षत्रियांना बंधनकारक असतात, ते काय ते पहायला पाहिजे. त्यात त्यांनी सांगितले आहे किं, कोणताही असत्यावर आधारित खेळ राजा खेळू शकणार नाही. युद्ध सुद्धा नियमानुसारच खेळले गेले तरच ते खरे युद्ध एरवी तो छल समजावा असें दिले आहे. द्युताला तेंच नियम लागू होतात. द्युतात फांसे टाकणारा खेळणार्यांपेक्षा वेगळा असावा आणि तो त्या जागी बसलेला नसावा असें सांगितले आहे. तरच तो खरा प्रामाणिक द्युताचा खेळ समजता येईल. अरे शकुनी, द्युताच्या कमाईत ब्राह्मणांना दानं करता येत नाहीत म्हणून तो मार्ग कुलिन क्षत्रियांसाठी वर्ज समजला जातो. तू खोटा खेळ खेळून आमची मेहनतीने मिळवलेली ती सारी संपत्ति हडप करण्याचा बेत करत आहेस हे न समजण्याइतके आम्ही दुधखुळें नाही. तशा मार्गाने मिळालेल्या वैभवात सुख नसते कारण, त्यावर राक्षसांची मालकी होते. जे जे कांहीं असत्याने माणूस मिळवतो ते सगळे वस्तुतः राक्षसांचे असते व राक्षस त्याचा उपयोग करूं लागल्यास त्या माणसाचा नाश होत असतो असें ऋषी सांगतात. म्हणून अशा कमाईचे कौतुक तू करण्याचा जर विचार करत असशील तर ते तुझ्यासाठी घातक आहे.

शकुनी त्यावर बोलतो, "अहो शहाणे युधिष्ठीर, जिंकण्याची इच्छाच मुळी पापकारक असते हे माहीत असून तू मला शहाणपण सांगतोस ते योग्य नाही. त्याच प्रमाणे दुसर्याचा पराभव करण्याची इच्छा असणे हे सुद्धा सत्यात बसत नाही. तरी सगळे क्षत्रिय त्यात गुंतेले असतात. विद्वानाने एकमेकांशी चर्चा करणे व त्यात कोणी एक हरला अथवा

जिंकला तर ते अप्रामाणिकपणाचे मानले जात नाही. त्याच प्रमाणे फांसे टाकण्यात हुशार असलेला खेळाडु जर त्यात कमी हुशार असलेल्याला हरवेल तर तेसुद्धा अप्रामाणिकपणाचे समजता येणार नाही. कारण हुशार नसलेल्याने हुशार असलेल्याशी खेळणे, ही त्या कमी हुशार खेळणार्याची चुक असते. जर कोणी चुक करील तर त्याचे परिणाम त्याला भोगावे लागले तर त्यात जिंकणार्याला दोष कसा देणार? म्हणजे तुल्यबळांनी खेळावयाचे असते. अहंकाराने उन्मत्त झालेला अशी चुक बहुधा करतो असा अनुभव आहे. म्हणून जर तुझ्यात हिम्मत नसेल तर तू खेळू नकोस. पण जर तुझ्य़ात तुझ्या खेळण्याबाबत विश्वास असेल तर खेळ, कोणी जबरदस्ती करत नाही. हा मैत्रीपूर्ण खेळ आहे असें आधीच जाहिर झालेले आहे".

युधिष्ठीर बोलतो, "मला आमंत्रण दिले आहे तेव्हा मी खेळणार कारण तसे माझे व्रत आहे. मी मागे हटणार्यांतील नाही. माझा दैवावर पूर्ण विश्वास आहे किं, ते मला जिंकवणारच. आज पर्यंत माझ्या दैवाने कधी मला दगा दिलेला नाही. मग खेळ सच्चा असेल नाहीतर लुच्चा असेल. मी कोणाबरोबर डाव लावावयाचा ते सांगा. कोण माझ्या तोलामोलाचे पणाला लावू शकतो त्यांने माझ्या बरोबर खेळले पाहिजे".

दुर्योधन त्यावर बोलतो, "मी पाहिजे तेवढे ऐवज पणाला लावीन पण माझ्यावतीने माझा मामा शकुनी खेळेल".

युधिष्ठीर सांगतो, "जो पण लावतो तोंच खेळला पाहिजे, त्यासाठी कोणी दुसरा खेळेल तर ते नियमा बाहेर आहे. जर तुला पण लावावयाचा तर तूंच खेळले पाहिजे. तुला हे नियम माहीत नाहीत कां"? तरी जर तुला तसें खेळावयाचे असेल तर खेळू, कारण हा मैत्रीपूर्ण गमतीचा खेळ आहे असें तू सुरुवातीलच सांगितले आहेस.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा एकोणसाठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग साठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, जेव्हां खेळ सुरु झाला तेव्हां धृतराष्ट्राच्या बाजूचे सगळे राजे एका बाजूस जमा होऊन बसले. त्यात स्वतः धृतराष्ट्र सुद्धा येऊन बसले. युधिष्ठीराच्या बाजूला भिष्म, विदूर, कृप आणि द्रोण येऊन बसले होते. त्यांच्या चेहर्यावरील तेज झाकोळलेले होते. नाईलाज असावा असें ते त्या सभागृहात येऊन बसले होते. नरसिंह जणू आहेत असें ते सभागृह त्यांच्या उपस्थितीमुळें उजळून निघाले होते. त्यांची आसने उंचावर होती त्यामुळें ते राजे द्युताचा खेळ व्यवस्थितपणे पाहू शकत होते. ती सर्व आसने सुंदरशा मखमलीच्या आवरणांने शुशोभित केलेली होती. तेथे जमलेल्या सगळ्या राजांना वेदाची चांगली माहिती होती. ते सुसंस्कृत वागणूक असलेले होते. अशा परिस्थितीत तो मैत्रीचा द्युत सुरु झाला. युधिष्ठीराने सांगितले समुद्रातून ढवळून काढलेले अत्यंत मौल्यवान आणि चमकणारे मोती पहिल्या डावात पणाला लावले. आणि दुर्योधनाला तो विचारतो, "बोल तुझी कोणती बोली आहे"? दुर्योधन सांगतो, "माझी बोली रत्न आणि माणकांची करतो कारण, ते माझ्याकडे विपुल आहेत. ते आता तू जिंकून दाखव". त्या डावात युधिष्ठीर हरतो.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा साठावा भाग संपला.

# सभा पर्व  भाग  एकसष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

त्यावर युधिष्ठीर बोलतो, "तूं लुच्चेगिरी करून हा डाव जिंकला आहेस पण चालेल, आता दुसर्या डावात मी माझ्याकडील खजिन्यात पडून असलेली अमोल रत्नं आणि सोनं, चांदी आहे ते लावतो. तू बोल काय पणाला लावतोस"?

वैशंपायन पुढे सांगतात, अशा प्रकारे बोलल्यावर शकुनी कुरु घराण्याच्या दैवतांना उद्देशून बोलतो, "हा पंडुचा ज्येष्ठ मुलगा, जो कधीही कमीपणा घेत नाही, आज माझ्यापुढे हरला आहे.

त्यावर युधिष्ठीर बोलतो, "तो चमकणारा यशस्वी रथ ज्याने आम्ही येथे आलो मी पणाला लावत आहे. जो हजार रथांच्या पेक्षा जास्त मौल्यवान आहे. त्याचे अंतरंग वाघाच्या कातड्याने सजवले आहे, ज्याची चाक आणि ज्याच्यावरील ध्वजाचा दांडा सुंदर आहे, ज्याच्या भोवती लहान घंटां टांगलेल्या आहेत. ज्यांच्या आवाजाने आसमंत दुमदुमून निघतो, ज्याला खेचण्यासाठी आठ शुभ्र रंगाचे अश्व लावलेले आहेत, तो मी पणाला लावतो". त्यानंतर शकुनी फासे टाकतो व पुनः जिंकतो". ते ऐकल्यावर शकुनी पुनः फासे टाकतो व पुन्हा जिंकतो.

युधिष्ठीर पुनः पणाला त्याच्या एक लक्ष दास्या लावतो. तो त्यांची माहिती देतो, त्या सगळ्या तरुण होत्या आणि सोन्याच्या दागिन्याने मढवलेल्या होत्या. त्यांच्या गळ्यात निष्क (त्या काळातील चलनी नाणे) नाण्याच्या माळा त्या घालून होत्या. त्यांच्या अंगावर उंची वस्त्र होते. त्या सगळ्या साठ कलांत निपुण होत्या. विशेष करून नृत्य आणि गायन कलांत निपुण होत्या व त्या ब्राह्मण स्नातकांची देखभाल करत असतात.

वैशंपायन सांगतात, ते ऐकल्यावर शकुनी पुन्हा त्याचे फसवे फासे टाकतो व पुन्हा जिंकतो.

युधिष्ठीर बोलतो, "माझ्याकडे हजार सेवक आहेत, त्यांना पाहुण्यांची व्यवस्था कशी करावयाची त्याचे उत्तम ज्ञान आहे. ज्यांच्या अंगावर रेशमी वस्त्र आहेत, त्यांच्या अंगावरसुद्धा योग्य त्या प्रकारचे दागिने आहेत. सर्व पाहुण्याची देखभाल ते हातात ताट वाट्या घेऊन तयारीने करत असतात. ते मी पणाला लावतो".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर शकुनी त्याचे फसवे फासे टाकतो व पुनः जिंकतो.
युधिष्ठीर बाजी लावतो, एक हजार हत्तींची. ज्यांच्या कपाळावर कमळाचे शुभ चिन्ह आहे. ज्यांचे दांत सुळे नांगराच्या फाळासारखे आहेत, जे युद्धाच्या कामासाठी तयार केले आहेत, ज्यांचा वर्ण पावसाच्या ढगांसारखा सावळा आहे, त्या प्रत्येका बरोबर आठ मादी हत्तीणी आहेत. ती बाजी लावल्यावर तो सुवलाच्या मुलांस सांगतो. त्यांने त्याचे फांसे टाकावेत.
पुनः शकुनी फासे टाकतो व जिंकतो. तो युधिष्ठीराकडे पाहून हसूं लागतो. तरी युधिष्ठीर मागे हटत नाही. तो पुन्हा नवीन बाजी लावतो, ह्यावेळी त्याच्याकडे असलेले सगळे रथ आणि हत्ती लावतो. पुनः शकुनी खुनशीपणे फांसे टाकतो व पुन्हा जिंकतो.
त्यानंतर युधिष्ठीर त्याच्या कडील तित्री, कल्माश आणि गंधर्व जातीचे अमुल्य घोडे पणाला लावतो. त्यानंतर चित्ररथाने दिलेला रथ जो अर्जुनाला भेट दिला होता तो पणाला लावतो.
वैशंपायन पुढे सांगतो, शकुनी त्याच्या कावेबाजपणें फांसे टाकतो व पुनः जिंकतो.
त्यानंतर युधिष्ठीर बोलतो, त्याच्याकडे दहा हजार आणखीन रथ आहेत, त्या सर्वांना उत्तम जातीचे घोडे लावलेले आहेत. ते तो पणाला लावतो व हरतो. त्यानंतर तो दैववादी युधिष्ठीर त्याच्याकडील साठ हजार युद्ध प्रवीण सैनिक पणाला लावतो ते सगळे फक्त दूध पितात आणि भात खातात, व हरतो. पुनः शकुनी त्याचे फांसे टाकतो व पुन्हा पुन्हा जे जे युधिष्ठीर पाणाला लावतो ते सगळे खोट्या डावांने जिंकत जातो.
वैशंपायन पुढे सांगतात, त्यानंतर तो राजा त्याला त्याच्या भावांनी कमवून आणलेले आयते मिळालेले आणखीन द्युतात लावतो, त्यात चार हजार निडी प्रकारचे रत्न जे तांब्याच्या जडावात बसवलेले होते, त्याशिवाय सोन्याचे पत्रे पणाला लावतो.
शकुनी तेसुद्धा खोटे फांसे टाकून जिंकतो.
अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा एकसष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग बासष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, तो द्युताचा खेळ पहात असतांना त्यात युधिष्ठीर निश्चितपणे बरबाद होणार ह्याची लक्षणे विदूराला दिसू लागतात. तेव्हां तो विदून धृतराष्ट्राला बोलतो, "अहो राजर्षी, भरत कुळांचे अग्रणी, मी काय सांगतो ते जरा लक्ष देऊन ऐका. जरी माझे शब्द तुम्हाला आवडणारे नसले तरी ऐका. ज्यांचा अंतकाळ समीप आला आहे त्यांना कदाचित माझे सांगणे आवडणार नाही तरी सांगतो". "तुम्हाला आठवते कां, जेव्हां हा दुर्योधन जन्मला तेव्हां कोल्ह्यासारखा ओरडत होता. त्याचा अर्थ तुझा मोठा मुलगा कुकर्मा आहे हे आपण सर्वांनी जाणले. तो आपल्या कुळाचा नाश करणारा आहे हे त्या लक्षणांतून स्पष्ट झाले होते. म्हणून अरे राजा, आपल्या घरात तुझ्या पुत्राच्या रुपात एक कोल्हा रहात आहे. तुझ्या एकट्याच्या पुत्रप्रेमाच्या मूर्खपणामुळें आपले घराणे बरबाद होऊ शकते. शुक्राने त्याच्या कवनात काय सांगितले आहे ते आठवं. त्याने सांगितले आहे, जे उंचावर चढून मध काढतात त्यांना उंचावरून खाली पडण्याचा धोका असतो. त्यामुळें मरणसुद्धा येऊ शकते. तुझा मुलगा दुर्योधन तेंच करत आहे. पांडवांच्या द्वेषाने प्रेरीत झालेला तुझा मुलगा स्वतः बरोबर इतर अनेकांचे जीव धोक्यात घालत आहे कारण, जरी युधिष्ठीराला हरवले तरी त्याने जे पणाला लावले आहे ते त्याने कमावलेले नाही, ते त्याच्या कर्तृत्ववान कर्मयोगी अशा चार भावंडांनी कमावलेले आहे. जर ते भडकले तर कौरवांचा नाश निश्चित होईल ते तुझ्या लक्षात येत नाही. जर युद्ध सुरु झाले तर ते ह्या शकुनाच्या अधर्मी द्युता इतकेच अधर्मी होऊ शकते. त्यांना वाचवण्यासाठी तू आत्ताच कांहीं केले पाहिजेस". "तू हे सगळे जाणतोस. तू खूप हुशार आहेस, कंसाचे काय झाले ते तुला माहीत आहे, सगळे भोज त्यांच्या इतर मुलांच्या भल्यासाठी एकाला सोडून गेले, त्यानंतर भोज, अंधक आणि यादव एकत्र येऊन त्यांने त्याला कृष्णाच्या मदतीने ठार मारले. त्या प्रमाणे, तुझ्या आदेशांने हा राक्षस तुझा सुयोधन, त्याला जर अर्जुनाने ठार मारले तर तुझे इतर कौरव सुखांने त्याचे राज्य उपभोगू शकतील. तसे झाले तर तुझी सगळी मुलं सुखाने पुढील अनेक वर्षें आनंदाने राहू शकतील. तसें नाही केलेस तर अंती सगळे कौरव तुझ्या पुढे मारले गेलेले तुला पहावे लागेल. अरे राजा, तुला कोणते जास्त

श्रेयस्कर वाटते"? त्या शकुनी सारख्या कावळ्यापेक्षा पांडवांच्या सारखा मोर तू निवडलास तर ते सगळ्या कुरु घराण्यासाठी प्रशस्त होईल. त्या कोल्ह्या सारख्या दुर्योधनापेक्षा पांडवांसारखे वाघ तुला तुझ्या ह्या परिस्थितीत (अंधत्व) जास्त चांगले मदत करतील. पुत्रप्रेमापेक्षा तू स्वतःवर प्रेम करणे जास्त हितकारक आहे, हे तुझ्या लक्षात येते कां? राजनितीच्या शास्त्रात सांगितले आहे किं, कुटूंबाच्या भल्यासाठी एका माणसाचा त्याग करणे योग्य असते, सबंध गावांच्या भल्यासाठी एका कुटूंबाचा त्याग करणे श्रेयस्कर असते. एका प्रांताच्या भल्यासाठी एक गांव नष्ट झाले तर चालेल. आणि स्वतःच्या भल्यासाठी सगळी पृथ्वी पणाला लावावयाला हरकत नाही. असा सल्ला कव्याने (शुक्राचार्य, असुरांचा गुरू) असुरांना, जंभाच्या जन्माच्या वेळी दिला होता. तुला एक गोष्ट माहित असेल त्यात एक राजा सोने ओकणार्या पक्षांना पाळतो व त्यांची संख्या वाढल्यावर त्यांना लोभीपणामुळें मारून टाकतो, तुझा दुर्योधन तेंच करत आहे. अशा गोष्टी कोणीही दूरधोरणी करत नाहीत हे तुला सांगावयाची गरज आहे कां"? "म्हणून घराण्याच्या खर्या वारशांना तू मदत केली पाहिजेस. कोठलीही गोष्ट कशी करावयाची त्याची मर्यादाशील पद्धत असते त्या मर्यादा लक्षात न घेता काम केल्याने सर्वस्व नष्ट होईल हे लक्षात घे. पांडव आपल्या शंतनुचे खरे वारस आहेत कारण ते त्या घराण्याच्या संस्काराचा वारसा जो त्या घराण्याचा खरा वारसा असतो, ते सांभाळत आहेत म्हणून त्यांना तू संरक्षण दिले पाहिजे. तुझे पुत्र जरी रक्तांने तुझे वंशज असले तरी ते संस्काराने अजिबात शंतनुचे वारस नाहीत. कारण ते असुर संपदाचे वारस आहेत त्याउलट आपला वारसा आहे दैवी संपदेचा. आर्य परंपरेत संस्काराचा वारसा खरा वारसा समजला जातो, रक्ताचा वारसा खरा वारसा समजला जात नाही म्हणून पांडवांचे जन्मदाते कोण आहेत हे महत्वाचे नसते, ते कोणता संस्कार पुढे चालवतात ते महत्वाचे असते. तू वेळीच हा विध्वंस थांबवला नाहीस तर जे घडेल त्याची तू जबाबदारी घेणार आहेस. तुझे मुलगे पांडवांशी लढू शकणार नाहीत हे लक्षात घेऊन तुला तो निर्णय घ्यावयाला पाहिजे. अरे दैवी शक्तीसुद्धा त्यांच्याशी लढू शकत ऩाहीत. जर असा प्रसंग आला तर एक गोष्ट लक्षात घे माझ्या ज्येष्ठ बंधू, तुझी सगळी मुलं मारली जातील व त्याला तू आणि तूंच जबाबदार असशिल".

अशारितीने सभापर्वातील द्युतपर्वाची बासष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग त्रेसष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

पुढे विदूर आपल्या मोठ्या भावाला सांगत असतो, "मुळात जुगार द्वेष आणि फाटाफूटीचे कारण होत असते. त्यामुळें शत्रूत्व उत्पन्न होते ज्याचे परिणाम विध्वंसक असतात. हे जाणत असूनही तुझा मोठा मुलगा दुर्योधन त्याला मोठ्या जोरांने उत्तेजन देत आहे. राजा प्रतिपाचे, शंतनुचे आपण प्रतिष्ठीत वारसदार आहोत. त्या सगळ्या संस्काराची वारसदारी मानणार्या वंशजांना त्यांच्या वल्हीकासारख्या दोस्तांबरोबर दुर्योधनाला युद्धात त्याचे पाप संपवण्यासाठी भेटतील. त्यामुळें तुझ्या रक्ताच्या वंशजांचा नाश होईल. दुर्योधन त्याच्या मस्तीत त्याच्या भावंडांचे भवितव्य बरबाद करत आहे. जसें मस्तीत मुसंडी मारणारा बैल आपले शिंग मोडून घेतो. जो शहाणा माणूस स्वताची दूरदृष्टी हरवून बसतो, तो दुसर्याच्या मनाप्रमाणे वागू लागतो, असा माणूस हमखास मोठ्या संकटात पडत असतो जसे लहान बालकांने हाकलेले जहाज समुद्रात अडकते. दुर्योधन तुमच्या भावाच्या मुला बरोबर जुगार खेळतो आणि जिंकत आहे म्हणून तुम्ही खूष दिसता पण ही खुषी अल्पकाळाची असेल हे तुमच्या लक्षात येत नाही कां? हा द्युताचा कैफ सुरुवातीला जरी सुख देत असला तरी परिणामांती तो क्लेशदायकच ठरणार आहे हे मिळणार्या यशांत मश्गुल राहून तू कसा विसरतोस"? धृतराष्ट्र विदूराला काकुळतीला येऊन सांगतो, "मी हा खेळ जर आत्ता थांबवला तर माझा सुयोधन त्याचा जीव देण्याची धमकी देत आहे व ते मी कसे सहन करू ते सांग"? ते ऐकून विदूर धृतराष्ट्राला बोलतो, "एक गोष्ट तुम्ही कौरव विसरता कीं, पांडव आणि तुम्ही जवळचे आप्त अहात त्यामुळें केवळ ते पांच नाहीत तर इतर आप्तसुद्धा त्या भोवर्यात अडकणार आहेत त्यांचा विचार करण्याच्या मनस्थितीत दुर्योधन नाही पण तुम्ही असायला पाहिजे. असुरांना कव्याने जो सल्ला दिला तो मी तुम्हाला आधी सांगितला आहे त्याप्रमाणे एका दुर्योधनाला जाऊद्या, त्यामुळें बाकीचे तुझे पुत्र जीवंत राहणार असतील तर काय हरकत आहे? अजून परिस्थिती सुधारण्याच्या स्थितीत आहे तर वेळीच हा जुगाराचा खेळ थांबवण्याचा आदेश दे. अरे शंतनु पुत्रा, प्रतिपाच्या वंशजा, जे जमले आहेत ते सगळे आपले आप्तच आहेत. त्यांना सांग कीं, हा मैत्रीपूर्ण खेळ खूप झाला. दुर्योधनाच्या धमक्यांना घाबरण्याचे कारण नाही, तुझी जबाबदारी केवळ त्या एका पुरती

नाही, तू कुटूंब प्रमुख आहेस म्हणून तुला इतरांच्या हिताचा सुद्धा विचार करावयाला पाहिजे. जर पंडुचा मुलगा द्युतांने चिडून उठला आणि त्याला वृकोदराने व अर्जुनाने आणि नकुल, सहदेव ह्यांनी साथ दिली तर तुझ्या मुलांचे काय होईल त्याचा विचार कर. तसे झाले तर तू असा म्हातारा आणि अंध कोणाच्या आधाराने जगशील? तुझ्याकडे काय कमी आहे किं, ह्या खोट्या खेळांनी तुला पांडवांचे आणखीन धन मिळवण्याची गरज आहे"? खरे क्षत्रिय द्युताचा आधार कधीही घेत नाहीत. तो सुवलाचा मुलगा, त्याचे प्रस्थ येथे वाढवण्यासाठी दुर्योधनाला चेतवत आहे. त्या त्याच्या प्रयत्नांना तू उत्तेजन देऊ नकोस. प्रतिप आणि शंतनुच्या कुळात हे काय अभद्र होत आहे, आपले पितर आपल्याला माफ करणार नाहीत हे तुला समजले पाहिजे. तुझ्या म्हातारपणी खरे तर हे पांडवच तुला आणि गांधारी मातेला आसरा आहेत, तुझे पुत्र काय लायकीचे आहेत हे तू चांगलेच ओळखतोस. त्या शकुनाला त्याच्या गांधार देशाला ताबडतोब पाठवून दे, त्यातच सगळ्या कुरु घराण्याचे भले आहे". आपल्याला घरात युद्ध नको, मी स्पष्टपणे सांगत आहे, त्याला भिष्म आणि द्रोण, कृप ह्या सर्वांचे सहमती आहे.

अशारितीने सभापर्वातील द्युतपर्वाचा त्रेसष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग चौसष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

ते विदूराचे धृतराष्टाराशी मोठ्याने होणारे बोलणे दुर्योधन ऐकतो व बोलतो, "अहो काका, तुम्हाला माझ्या शत्रूंचे भारी कौतुक असते. माझ्या बापाच्या मुलांमध्ये तुम्हाला नेहमीच कांहीं खोट दिसते. आम्हाला माहीत आहे कीं, ते पांडव तुमचे लाडके आहेत. तुम्ही आमचा नेहमीच द्वेष करत आला अहात. हा जगाचा नियम आहे कीं, कोणताही इसम त्याच्या लाडक्यांचे भले व्हावे असें पहातो व ज्यांचा तो द्वेष करतो त्यांच्या विरुद्ध बोलत असतो, त्याप्रमाणे तुझे हे वागणे आहे. म्हणंच आहे, आपला तो बाब्या व दुसर्याचा तो कारटा. तुमचा हा सल्ला जो तू माझ्या पित्याला देत आहेस तो त्या गुणांमुळें तू करत आहेस. तू खरे काय ते कधीच बोलत नाहीस. तुझ्या मनात आमच्या बद्दल जो हेवा आहे त्यापेक्षा तुझ्या बोलण्यात कितीतरी जास्त आहे. आमच्या प्रिय पित्याला आमच्या विरुद्ध उलटवण्याचा तू प्रयत्न करत आहेस ते मी सहन करणार नाही. आम्ही तुला सांभाळतो जसें साप सांभाळावा. तू त्या मांजरासारखा आहेस जे त्याला दूध देणार्यालाच चांवते. शास्त्र सांगते धन्याचा द्वेष करण्यासारखे महापाप नाही. तुला असें पाप करतांना लाज कशी वाटत नाही. आम्ही आमच्या शत्रूला हरवल्याने आमची ताकद वाढलेली आहे म्हणून सांभाळून रहा. आमच्या बद्दल बोलतांना विशेष काळजी घेणे तुझ्या भल्याचेच आहे. तू नेहमीच शत्रूंशी समझौता करण्याच्या बाजूचा असतोस. म्हणूनच तू आमचा द्वेष करत असतोस. अक्षम्य पद्धतीने बोलणारा शत्रू ठरतो. त्याच बरोबर शत्रूची बाजू घेणे हासुद्धा अक्षम्य गुन्हा ठरतो. तुझ्यासारखा आमच्यात असेल तर शत्रूला आमच्या गुप्त गोष्टी समजण्याची शक्यता असते. हे नियम तू आता मोडत आहेस. तू एकाद्या बांडगुळासारखा आमच्यात आहेस. आमच्या गोष्टीत तू बोलू नकोस. तू त्या म्हातार्यांत जाऊन बस. ज्यासाठी तुझे प्रसिद्धी आहे ते करत रहा. आमच्या कामात लुडबुड करू नकोस. तू स्वतःला आमचा मार्गदर्शक समजू नकोस. आम्ही तुला तुझा सल्ला विचारलेला नाही. आमचे भले कशात आहे ते आम्ही चांगलेच जाणतो. आम्ही आधीच तुझ्या अशा लुडबुडीमुळें त्रस्त झालो आहोत त्यात भर घालू नकोस. तेथे वर एक विधाता आहे तो सगळ्या सृष्टीच्या गोष्टींचे कारभार पहात असतो त्याची जागा घेण्याचा प्रयत्न करू नकोस.

तो विधाता मातेच्या उदरातील गर्भाचेसुद्धा नियंत्रण करतो. तो पाहिल काय व्हावयाचे असेल ते. मी जे करत आहे ते नेमके त्याच्या मर्जीनुसार होत आहे. म्हणून त्या भाग्यात तुझा हस्तक्षेप नको. लोक जे कांहीं करत असतात ते त्यांच्या कर्मानुसार करत असतात त्यात कोणी बोलू नये हेंच खरे. म्हणून मला व माझ्या पित्याला सल्ला देण्याचे काम करू नका. जो आग लावतो तो त्याच्या राखेचा विचार करत नाही. शत्रूच्या मित्राला आसरा शहाणा देत नाही. जो त्याच्या आश्रयदात्याच्या विरुद्ध वागतो त्याला तो आश्रयदाता शत्रू समजू शकतो. म्हणून तू अरे विदूरा, तुला जेथे जावयाचे आहे तेथे जा. आम्हाला तुझी आणि तुझ्या सल्ल्याची आवश्यकता नाही. तू तशा बाईसारखा आहेस जिला कितीही चांगले वागवले तरी ती आपल्या वळणावरच जाणार, परपुरुषाला मिठी मारणार".

ते ऐकल्यावर विदूर धृतराष्ट्राला बोलतो, "अरे राजा, आत्ता सांग तुझे काय मत आहे दुर्योधनाच्या ह्या वक्तव्याबद्दल"? जे लोक, काम झाले का उपयोगी आलेल्यांना दांडुकांने मारून हकलवून देतात, त्यांच्या बद्दल काय मत आहे ते सांग. राजाचे हृदय एवढे नीच प्रवृत्तीचे नसावे. प्रथम संरक्षण द्यावे व गरज भागली कां विसरून जावे". त्यानंतर विदूर दुर्योधनाकडे पहात बोलतो, "अरे राजपुत्रा, तू स्वताला फार शहाणा समजतोस कां"? येथे कोणी कोणाला आश्रय देत नाही. तू तुझी मर्यादा ओलांडत आहेस. मी माझ्या हक्काने येथे शंतनुचा वंशज म्हणून आहे, तो माझा हक्क अबाधित आहे. पापी बुद्धी असलेला कधीही आपली चुक सुधारत नाही. एकाद्या बदफेली बाईसारखा तो असतो. मला खात्री आहे किं. एकादा म्हातारा जर लहान मुलीशी लग्न करण्याचा विचार करत आहे, चळ सुटलेल्या त्याला कांहीं सांगणे उपयोगाचे नसते. चुकीच्या दिशेने पावले टाकणार्याला कोठलाही चांगला सल्ला आवडत नाही म्हणून तो सल्ला चुकीचा ठरत नाही. पाप करण्यासाठी निघालेल्याला पुण्याचा मार्ग आवडत नाही अशी तुझ्या मोठ्या मुलाची गत झाली आहे. तोंच खरा दोस्त असतो राजाचा, जो राजाला वेळीच सावध करण्याचे काम करतो. राज्याचा प्रधान ह्या नात्याने मी माझे काम करतांना कोणाला काय रुचेल न रुचेल त्याचा विचार करत नाही. जो प्रसंगी राजाचा रोषसुद्धा त्यासाठी सहन करत असतो. हिताचा सल्ला विवेक हरवलेल्यांना शत्रूत्वाचा वाटतो. त्यांच्या चुकीच्या वागण्यास आक्षेप घेतला कीं तो अद्वातद्वा बोलू लागतो तसे ह्या दुर्योधनाचे झालेले आहे. बर्याच वेळा अप्रिय

सल्ला कडु औषधासारखा असतो म्हणून तो आणि तो देणारा शत्रू ठरत नाही. कसाही असला तरी तो औषध म्हणून स्वीकारावा त्यातच त्याचे भले होणार असते. अरे राजा, गुपचुप बसू नकोस कारण, त्यातच तुझे व तुझ्या कुटूंबाचे भले आहे. वेळीच ह्या मूर्ख दुर्योधनास आवर. मी नेहमीच धृतराष्ट्रा, व तुझ्या मुलांचे भले चिंतीले आहे पण त्यासाठी हा मार्ग नाही म्हणून माझा आक्षेप आहे ह्या खेळाला. जे घडणार ते घडल्या शिवाय रहाणार नाही हेंच खरे म्हणून, मी तुला व सभेला वंदन करून येथून निघून जात आहे. ब्राह्मण मला शुभेच्छा देतील अशी अपेक्षा करतो. ह्या प्रसंगातून मी एक शिकलो किं, शहाण्याने विषारी सापाला चांगला सल्ला देऊ नये. कारण त्याचा कांहीं उपयोग नसतो. असं बोलून तो दूरदृष्टी विदूर सभागृहा बाहेर जाऊन तेथे बसतो.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा चौसष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग पासष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

शकुनी युधिष्ठीराला विचारतो, "अरे अजातशत्रू, तूं तुझ्या चार भावंडांनी स्वकर्तृत्वाने मिळवलेली सगळी संपत्ती तुझ्या खोट्या दैवापायी आता पर्यंत आम्हाला जिंकण्यास दिली आहेस. जे तू पणाला लावलेस त्यातील एक कपर्दीकही तू कमावलेली नव्हती. तुझ्या सारखा बेजबाबदार व भावंडांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेणारा नीच माणूस मी आतापर्यंत पाहिलेला नाही. जेव्हां तुझे बंधू चारही दिशांना फौजा घेऊन लढाया जिंकत होते, घाम गाळत होते तेव्हां, तू फुकट मिळालेल्या द्रौपदीबरोबर महालात मजा करत होतास. फुकट मिळत गेले कीं, माणसाला वाटू लागते कीं, त्याचे दैव फळफळले आहे. पण अरे नीच माणसा, ते दैव तुझे नव्हते, ते तुझ्या चार पराक्रमी भावांचे होते जे द्युत कधीही खेळणार नाहीत कारण ते कर्तृत्ववान आहेत. जे कर्तृत्वहीन असतात तेंच (तुझ्यासारखे) द्युतात रमतात कारण, त्यांना त्यांच्या दैवाची खात्री नसते. खरे कर्तृत्ववान दैवाचा विचार करत नाहीत, दैव त्यांच्या कडे खेचून जात असते, पण ह्या गोष्टी तुला बोलून काय उपयोग, ते तुला कधीच समजणार नाही. ती द्रौपदी, जिला तू तुझी पत्नी समजून तिच्या बरोबर मजा करत असतोस ती द्रुपदाची कन्यासुद्धा धनंजयाने मिळवली आहे व तू तुझ्या आईच्या मूर्खपणामुळें त्या राजकन्येचा उपयोग तुझे घाणेरडे भोग घेण्यासाठी करत आहेस. सात्त्विकतेचे सोंग घेऊन तू सगळ्यांना अगदी त्या वृश्नीलासुद्धा मूर्ख करू शकशील पण आम्हाला नाही. खरेतर तू सात्त्विक नसून कमालीचा तामसी आहेस. आता पर्यंत जे तू घालवले आहेस ते पुनः मिळवण्याची हिम्मत तुझ्या चार शूर, पराक्रमी, महारथी, तेजस्वी भावंडांत आहे व म्हणूनच तू असा बेफिकीरीने त्यांनी कमवलेली मिळकत द्युतात घालवत आहेस हे आम्ही चांगलेच ओळखतो". एवढे बोलल्यानंतर तो सुवलाचा पुत्र शकुनी युधिष्ठीराला विचारतो, "काय तू अजून आणखीन खेळू इच्छितोस कां? "तुझ्याकडे तुझ्या भावंडांनी मिळवलेली आणखीन संपत्ति आहे कां"?

युधिष्ठीर त्याला प्रश्न विचारतो, "माझ्याकडे अमाप धनदौलत आहे पण तू कां असा प्रश्न विचारत आहेस? तुला काय वाटते, माझी संपत्ती संपली आहे? तू तुझ्या कडील सगळी संपत्ति पणाला लाव मग ती हजाराने असेल नाहीतर लाखांने असेल नाहीतर करोडोने

असेल नाहीतर अब्जाने असेल नाहीतर त्याही पेक्षा जास्त असेल मी त्यापेक्षा जास्त संपत्ति पणाला लावू शकतो. मग ती कोणी कमावली तो तुमचा विषय नाही. आम्हा पांडवांत एक समझौता आहे त्याप्रमाणे सर्वात मोठा बंधू म्हणून मी त्या सगळ्या मिळकतीचा मालक ठरतो व म्हणून मला वाटेल ते त्या संपत्तीचे करू शकतो, दान करीन अथवा द्युतात उडवीन तुम्हाला त्याचा विचार करण्याची गरज नाही. आमच्या पांच भावांची एकी ही आमची खरी संपत्ति आहे कारण, ती आमच्या मातेच्या आदेशानुसार आहे". वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून शकुनी छद्मीपणे हंसून फांसे टाकण्यास सुरुवात करतो आणि पडलेले फसवे फांसे दाखवून बोलतो, "हे बघ, तू पुनः हरलास"!

युधिष्ठीर त्याला बोलतो, "माझ्याकडे अगणित पशुधन आहे, तुझ्याकडे आहे का"? "ते सगळे माझ्या राज्यात पसरलेले आहे जसे सगळ्या राजांचे असते तसें, ते परनसा पासून सिंधू नदीच्या तीरापर्यंत पसरलेले आहे, ते लावतो",

शकुनी फांसे टाकतो व नेहमी प्रमाणे पुनः जिंकतो. माझ्याकडे माझे राज्य आहे, त्यातील घरं आहेत, त्यातील नागरिक सुद्धा पणाला लावतो, फक्त ब्राह्मणांचे सोडून बाकीचे मी लावतो. शकुनी पुनः फांसे टाकतो व जिंकतो.

युधिष्ठीर पुनः पणाला तयार होतो व बोलतो, हे येथे जे माझे मुलगे बसले आहेत ते माझी संपत्ति आहे ते लावतो. शकुनी फांसे चाकतो व तेसुद्धा जिंकतो.

वैशंपायन सांगतात, शकुनी फांसे टाकण्यासाठीच बसलेला होता तो त्वरित फांसे टाकतो व ते जिंकतो.

त्यानंतर युधिष्ठीर नकुलाकडे पाहून बोलतो, "हा माझा भाऊ माझी संपत्ति आहे". त्यावर नकुल कांहीं हरकत घेत नाही, त्यामुळें तो युधिष्ठीराची संपत्ति ठरतो व पणाला लागतो. शकुनी त्यालासुद्धा जिंकतो.

शकुनी युधिष्ठीराला बोलतो, "आता तुझा प्रिय सावत्र भाऊ आमचा दास झाला आहे. आणखीन काय तू पणाला लावणार आहेस"?

शकुनी आता पूर्ण आत्मविश्वासाने पुन्हा फांसे टाकतो युधिष्ठीर बाजी लावण्या आधी. युधिष्ठीर सहदेवाकडे पहातो व त्याला लावतो. दुर्योधन त्याच्याकडे पहातो पण सहदेव

आक्षेप घेत नाही त्याचा अर्थ त्याचा आक्षेप नाही. त्याबरोबर तो पणाला लागला आणि शकुनी जिंकल्याचे सांगतो. अशारितीने पांडवांतील दोघे कौरवांचे दास झाले.
घाबरत घाबरत शकुनी भिमाकडे व अर्जुनाकडे पहात छद्मी हास्य करतो, आणि युधिष्ठीराला विचारतो आता कोणाला तू पणाला लावणार आहेस. युधिष्ठीर वैतागलेला असतो, तो ओरडतो, "अरे तुम्ही आम्हा भावंडांत फळी पाडत अहात, हे चांगले नाही".
शकुनी त्याच्या बडबडीकडे दुर्लक्ष करत पुढचा प्रश्न करतो, "आता कोणाला लावणार"?
शकुनी युधिष्टीराला उद्देशून बोलतो, "मी मघा बोललो ते तू कसे सिद्ध करत आहेस ते स्पष्ट होत आहे. तू इतका नीच आहेस कीं तुझ्या भावंडाना पणाला लावत आहेस. फक्त एक नीच माणून अशा गोष्टी करु शकतो. तू तुझ्या खोट्या दैवाच्या व्यसनामुळें असा पाप कर्मात फसत आहेस, मला कांहीं हरकत नाही जर तुला भिमाला आणि अर्जुनाला पणाला लावलेस एवढेच नाही तर अखेरीस तू तुला स्वतःला पणाला लावू शकशील. कांहींही केलेस तरी तू जिंकण्याची सुतराम शक्यता नाही. तुला द्युत खेळता येत नसतांना कशाला ह्या भानगडीत पडलास ते समजत नाही. आता मला वाटते तुझ्या भावांचा मोठा भाऊ होण्याच्या लायकीचा तू नाहीस हे तू दाखवत आहेस. तुझ्या मतलबी पणाची हद्द तू दाखवत आहेस. एवढे बोलल्यावर शकुनी विचारतो आता कोणाला लावतोस"? "भरत वंशाला तुझ्यासारखा माणूस काळीमा लावत आहे. स्वप्नातसुद्धा अशाप्रकारे कोणी द्युतात बाजी लावत नाहीत". असें बोलून शकुनी जे घडत आहे त्याबद्दलची त्याची नाराजी व्यक्त करतो. तो सांगतो, त्याच्या मनात पांडवाबद्दल खूप आदर आहे. पण दुर्योधनासाठी तो खेळत आहे. सगळ्या पांडवांकडे पाहून तो त्याची अस्वस्थता खांदे उडवून दाखवतो. त्याच्या वागण्याचा अर्थ असा निघत होता किं, युधिष्ठीरामुळें हा अनर्थ होत आहे. असें वागण्याचे कारण द्युतात जरी हरले तरी ते मोठे योद्धे होते व शेवटी सगळ्या गोष्टी लढाईनेच निश्चित होणार असतात. त्यात कौरवांची हार निश्चित होती. तरी तो द्युताचा डाव अजून संपला नव्हता.
युधिष्ठीर वैतागून बोलू लागतो, "आता कौरवांशी दोन हात होणे लांब नाही. कारण मला आता फाल्गुनाला पणाला लावावे लागत आहे".

वैशंपायन पुढे सांगत असतात, ते ऐकून शकुनी फांसे टाकण्याच्या तयारीत रहातो. पुनः फसव्या डावांने तो फांसे टाकतो आणि जिंकतो.
शकुनी अर्जुनाकडे पहात बोलतो, "धनंजय महान योद्धा पण एका फालतु आणि मूर्ख मोठ्या भावामुळें आज तू माझा झाला आहे. मला माहीत आहे, कीं, हे तांत्रिक आहे कारण ह्या योद्ध्यांना गुलाम करणे ह्या जगात कोणालाही शक्य नाही. तरी तत्वतः मी त्याचा आता मालक झालो आहे तेव्हां, आता युधिष्ठीरा, बोल तुझी पुढची बोली कोणाची आहे? आणखीन कोणती संपत्ति तुझ्याकडे आहे जी तू पणाला लावू शकतो".
युधिष्ठीर बोलतो, मला माहीत आहे किं, हा माझा भाऊ पणाला लावण्याच्या सारखा नाही पण तरीसुद्धा मी त्याची बोली लावतो व बोलतो हे माझे चार भाऊ जरी मी हरत असलो तरी त्यांना काबूत ठेवण्याची हिम्मत तुमच्यात असली पाहिजे कारण, ती जबाबदारी माझी नसेल. त्यांच्यामुळें तुमचे कांहीं नुकसान झाले तर ते तुमच्या मूर्खपणाचे असेल. ते ऐकून तेथे जमलेले सगळे राजे हे काय घडत आहे असें पहात राहीले होते.
ते ऐकल्यावर दुर्योधन घाबरतच त्या भिमाकडे पहातो पण तो आज्ञाधारक भाऊ किंचितही विरोध करत नाही, त्यामुळें बोली लागते व त्यात सुद्धा युधिष्ठीर हरतो. भिमाकडे नजर उठवून पहाण्याची कोणाची हिम्मत नव्हती. संपूर्ण सभागृह निःशब्द झाले होते.
शकुनी त्याचे फांसे हातात घेऊन खुळखुळ वाजवत युधिष्ठीराला बोलतो, "घोडे, सैनिक, दास्या, हत्ती आणि आता हे तुझे जीवलग भाऊ तू माझ्याकडे हरला आहेस. अजून तुझी द्युत खेळण्याची खुमखुमी संपली नाही कां"?
युधिष्ठीर त्याला बोलतो, "मी सगळे सतत हरत आहे, एकाही डावात मला यश आले नाही. हे कसे माझे दैव"? असें बोलल्यानंतर तो इंद्रप्रस्थाचा नरेश शकुनीला बोलतो, आता सांग, तू जिंकलेला असल्याने, ह्यापुढे मी काय करावयाचे"?
वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर शकुनी पुनः फांसे टाकतो व जिंकतो. तो सांगतो, "अहो इंद्रप्रस्थाचे नरेश, तुम्ही स्वतःला लावले आहे व हरला अहात"!
पुढे तो बोलतो, "अहो हे फारच वाईट झाले आहे". एवढे झाल्यावर तो हलकट शकुनी, सुवलाचा पुत्र, दुर्योधनाचा दोस्त आणि मामा त्या सगळ्या जमलेल्या राजांना उद्देशून बोलतो, "आपण सगळे माझ्या फांशात अडकलेले अहात. परंतु, अजून एक चिज आहे जी

युधिष्ठीराला अतिप्रिय आहे ती पणाला लावलेली नाही, ती आहे पांचाल कन्या, ह्या सगळ्या पांडवांची समाईक पत्नी. तुझा जर दैवावर इतका विश्वास आहे तर तिला पणात लावून पहा, कांहीं नशिब साथ देते कां"? ते ऐकून दैववेडा युधिष्ठीर सांगतो कीं, "तो त्यांची समाईक बायको जी सावळी आहे, बुटकी आहे, केस जिचे कुरळे आहेत, जी साक्षात लक्ष्मी सारखी आहे, तिला मी पणाला लावतो. मी तिच्या दैवाने निश्चित पुनः सगळे जिंकून घेईन". भावनेच्या भरात तो विवेकशुन्य झालेला यमाचा पुत्र द्रौपदीचे वर्णन करत रहातो, तिच्या सौंदर्याचे कौतुक करतो, कोणाही माणसाला अशी पत्नी असावी असेंच वाटेल असें तिच्या बद्दल बोलतो. रात्री उशीरा झोपणारी व सकाळी लवकर उठणारी, प्रेमळ, जिचे शरीर मऊ मलायम आहे व जिच्या स्पर्शाने सुख मिळते, सर्व कामात निपुण आहे, बोलण्यात गोड आहे, वगैरे वगैरे.
ते वर्णन ऐकल्यावर तो सुवलाचा पुत्र आवाज देतो किं, "चला त्या सुंदरीला आणा. तिला पणाला लावलेले आहे तिच्या पतिने. अर्थात् तिच्या सम्मतिशिवाय तिला पणाला लावता येणार नाही तरी तिला येथे हजर करावे. म्हणजे मी फांसे टाकीन".
वैशंपायन सांगतात, त्या दैववेड्या ज्यांनी त्याची बुद्धी दैवापुढे हरवली आहे अशा युधिष्ठीराने द्रौपदीला आणण्याचे सांगितले मात्र, त्यामुळे तेथे जमलेल्या सगळ्या आमंत्रितांमधून छीः छीः असे तिरस्कार दर्शक उद्गार निघाले. तेथे उपस्थित असलेले सगळे वडीलधारी पुरुष अस्वस्थ झाले. सगळे एकंदरच जे तेथे होत होते त्यावर विश्वास न बसल्यासारखे हळहळ करू लागले. भिष्म, द्रोण, कृप ह्यांना घाम फुटला होता. सभागृहाबाहेर बसलेल्या विदूराने त्याचे डोके दोनही हातात पकडून विवेक नष्ट झाला आहे असा बसला होता. सापाची जशी वळवळ व्हावी अशी त्याची गत झाली होती. असें जरी झाले होते तरी तो अंध राजा धृतराष्ट्र मात्र ते सगळे ऐकून खूष झाल्यासारखा स्मित करत होता. जणू त्याला जे घडत होते त्याबद्दल समाधान वाटत असावे. तो अंध राजा इकडे तिकडे चेहरा फिरवत विचारत होता, "काय डाव शकुनीने जिंकसा काय"? तो त्याचा हर्ष लपवू शकत नव्हता. कर्ण आणि दुःशासन आणि इतर कौरव एकमेकांशी हसत खिदळत होते. त्याच वेळी इतर बहुतेकांच्या नेत्रांतून अश्रू वहात होते. कोणी डोळे पुसत होते तर कोणी ते लपवत होते.

पुनः पुन्हा सुवलाचा तो धूर्त मुलगा आपण युद्ध जिंकलो आहोत व तेसुद्धा एकट्याने अशा अविर्भावात इकडे तिकडे पहात होता. जणू तो शाब्बासकीची दाद मागत होता.

शकुनीने फांसे टाकले व तो पुनः जिंकला. द्रौपदी कौरवांची दासी झाली होती!

अशारितीने सभापर्वातील द्युतपर्वाचा पासष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग सहासष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

दुर्योधन खत्ताला (विदूराला) बोलतो, "अहो काका, तुम्ही तुमची लाडकी सुन, पांचही पांडवांची प्रिय पत्नी, द्रौपदीला येथे घेऊन या. तिच्याकडून मी माझे कक्ष साफ करून घेणार आहे. ती ह्यापुढे आमच्या दास्या जेथे रहातात तेथे रहाणार आहे". त्याचे ते उद्धटासारखे बोलणे ऐकून विदूर त्याला बोलतो, "अरे कौरवांच्या ज्येष्ठा, तू अशी भाषा वापरून आगीत तेल ओतत आहेस हे तुझ्या कसे लक्षात येत नाही. तुला अजून लक्षात आलेले नाही कीं, हे जे आज घडत आहे तुझ्यामुळें, त्यामुळें तू एका खोल दरीच्या काठावर जाऊन उभा राहिला आहेस. असें मूर्खासारखे बोलून तू अनेक सिंहांना आव्हान देत आहेस. भयंकर विषाने सज्ज असलेले नाग तू तुझ्या दिशेने बोलावत आहेस. अरे मूर्खा, आणखीन तंटा वाढवू नकोस. ती केवळ पांडवांची पत्नी आहे असें नसून ती द्रुपदाची मुलगी आणि दृष्टद्युम्नाची बहीण आहे. ह्या सगळ्या गोष्टींचे भान ठेव तसेंच इतर असंख्य राजे तुझे वागणे पहात आहेत त्यांपासून सुद्धा तुला धोका भविष्यात होणार आहे ह्याची जाणीव असू दे. ते तुला व तुझ्या भावांना यमाकडे पाठवू शकतात. त्याशिवाय अशा द्युतांने कृष्णा तुमची गुलाम होत नाही. कारण जो स्वतः हरला आहे त्याला दुसर्या कोणालाही पणाला लावता येत नाही हा नियम तू आणि तुझा मामा विसरले आहेत काय? त्याशिवाय हा पहिला ठरल्याप्रमाणे, मैत्रीपूर्ण खेळ होता, त्यामुळें त्यातील जिंकणे व हरणे दोनही सत्याला धरून नाहीत. ज्याप्रमाणे बांबू वृद्ध झाल्यावर त्याला फुलं लागतात त्या प्रमाणे धृतराष्ट्राने फसवून आपल्याच भावाच्या मुलांचे, त्यांनी स्वकष्टाने कमावलेले धन हडपले आहे. हे सर्व जण पहात आहेत. त्यात कोठला पुरुषार्थ आहे? तुझ्या पित्याला बुद्धी नाश झाला आहे त्याला म्हातारपणी असा मोह कसा होतो? ज्यामुळें केवळ वैराची बिज पेरली जात आहेत. कोणीही कटु शब्दांचा उपयोग करू नये, ज्यामुळें एकाद्याच्या हृदयाला दुःख होईल. आपल्या शत्रूला कोणी द्युताच्या डावांने गुलाम करत नाही. खरे क्षत्रिय अशा गोष्टी करत नाहीत. वेदांना अमान्य असलेली भाषा कुलिन लोक वापरत नाहीत जी तू माझ्याशी व द्रौपदीशी करत आहेस. ह्या सगळ्या गोष्टींचे भयंकर परिणाम तुम्हा कौरवांना व त्यांच्या दोस्तांना भोगावे लागणार आहेत. त्यावेळी हा तुझा मामा

शकुनी उपयोगाला येणार नाही. तो वेळ न दवडता आपल्या गांधार देशाला निघून जाईल. म्हणून त्याच्या बोलण्यात तू रमलास ते तुम्हा कौरवांना फार महाग पडणार आहे. कटू वाणी शत्रू निर्माण करते. त्याचे दुरागामी परिणाम होत असतात. अशी अपमान कारक भाषा कोणीही सहसा विसरत नाही. त्यामुळें उद्याची युद्धे होत असतात. पांडवांची संपत्ति तुम्हाला पचणार नाही. ती विषासारखी तुम्हा सगळ्या कौरवांना जाळून टाकील. म्हणून ती संपत्ति तू त्यांना शहाण्यासारखी परत कर. त्यांच्याशी शत्रूत्व तुम्हाला परवडणारे नाही. एकदा द्युतात जिकले म्हणून तुम्ही त्यांना हरवले असें जर तू समजत असशील तर तू मूर्ख आहेस. क्षत्रिय द्युताने हरत नाहीत त्यांना हरवण्यासाठी युद्धच करावे लागते.
क्षत्रिय कधीही गुलाम होत नाहीत. ते आज्ञा देतात, आज्ञा घेत नाहीत म्हणून जर तू समजत असशील कीं, त्या पांडवांना व द्रौपदीला तुम्ही गुलामा सारखे वागवू शकाल तर तो तुमचा घोर गैरसमज आहे.
एक गोष्ट लक्षात ठेव ही पंडुची मुलं तुम्हा धृतराष्ट्राच्या मुलांचा द्वेष करत नाहीत ते तुम्हाला त्यांचे चुलत भाऊ म्हणूनच समजतात, मग तू कां त्यांचा द्वेष करतो आहेस"?
ते ऐकल्यावर उत्तर देण्यासाठी दुर्योधन बोलतो, "हा युधिष्ठीर माझ्या पेक्षा मोठा आहे व हा भिम माझ्या एवढा आहे वयांने म्हणून, मी त्या दोघांचा द्वेष करतो. कारण जर मी मोठा असतो तर हस्तिनापुराचे राज्य कायदेशीरपणे माझे झाले असते. इतर पांडवांचा मी द्वेष करत नाही कारण ते माझे प्रतिस्पर्धी नाहीत. उलटपक्षी, मला त्यांच्या बद्दल विशेष करून नकुल व सहदेवा बद्दल अनुकंपा वाटते परंतु, त्यांचे ह्या दोघांशी बांधले जाण्यामुळें माझा नाईलाज होतो व म्हणून मी त्यांना सुद्धा ह्यात खेचले. युधिष्ठीर व भिम माझा द्वेष करोत अगर न करोत त्यांचे माझ्यापेक्षा ज्येष्ठ असणे हेंच सर्व शत्रूत्वाचे कारण आहे. तू अरे माझ्या चुलत्या, मला कटू बोला बद्दल मोठे भाषण देतोस पण तुला माहीत आहे कां तेथे इंद्रप्रस्थात माझी मयसभेत फजिती होत होती तेव्हा फक्त नकुल आणि सहदेव मला थोडा दिलासा देत होते व हा भिम आणि अर्जुन व त्याची पत्नी द्रौपदी मला कसे फिदीफिदी करून चिडवत होते ते पाहिले नाहीस, तेथे मी रडकुंडीला आलो होतो पण त्याना माझी दया आली नव्हती. आज माझी पाळी त्यांना हसण्याची आली आहे आणि त्यांची पाळी रडण्याची. हा नियतीचा खेळ समज".

ते ऐकून विदूर पुढे बोलतो, "तुम्हा धृतराष्टाराच्या मुलांना साधे नियम माहीत नाहीत कां, त्याचे द्वेषामुळें त्या नियमांकडे दुर्लक्ष झाले आहे ते समजत नाही. तो नियम असा की, अप्रामाणिकपणा माणसाला मृत्यू नंतर नरकात ढकलतो. ह्या खोट्या द्युताच्या खेळामुळें दुर्योधना बरोबर दुःशासन व इतर धृतराष्ट्राची मुलं नरकाच्या दिशेने जात आहेत, त्याचे मला दुःख होते आहे. दुर्बुद्धीने भ्रष्ट झालेले ही धृतराष्ट्राची मुलं माझे कधीही ऐकणार नाहीत, त्यांचे भले चिंतणेच केवळ वेडगळपणाचे ठरत आहे. किंबहुना चांगला सल्ला न ऐकणे हा त्यांचा स्वभाव झाला आहे. अंध बाप आणि डोळे असूनही न पहाणारी आई त्यांच्या नशिबी आली, ह्याचा हा परिणाम असेल कदाचित्. त्यामुळें सतत चुकीच्याच दिशेने जाणारे अखेरीस कुरु वंशाच्या नाशास कारणीभूत ठरणार आहेत.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा सहासष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग सदुसष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, तो जिंकण्याच्या कैफात उन्मत्त झालेला धृतराष्ट्राचा मुलगा विदूराकडे तुच्छतेने पहात बोलतो, "अरे खत्ता, तुझा धिक्कार मी करतो", असें बोलून तो नीच माणूस तेथे उपस्थित असलेल्या सेवकांस आज्ञा करतो कीं, तो राणीवसात जाऊन द्रौपदीला खेचून सभागृहात आणेल. हे करतांना त्या सभागृहात इतर ज्येष्ठ मंडळी आहेत त्याची तो अजिबात पर्वा करत नाही. तो त्या सेवकांना सांगतो, ह्या पांडवांना बिलकुल घाबरण्याचे कारण नाही. त्या विदूरालासुद्धा भिण्याची गरज नाही. तोंच आता आम्हाला घाबरायला लागला आहे. आमचे हे मिळालेले वैभव त्याला रुचत नाही. तशी आज्ञा झाल्यावर ते सुत जातीचे सेवक लगबगीने पांडवांच्या दालनातील राणीवासांत शिरतात जणू काय सिंहाच्या गुहेत जात आहेत. तेथे असलेल्या द्रौपदीला ते सांगतात किं, युधिष्ठीर पणात तिला हरला आहे. तेव्हा तिने मुकाट्याने त्यांच्या बरोबर बाहेर यावे नाहीतर जबरदस्ती करून धृतराष्ट्राच्या घरी न्यावे लागेल. तेथे तुला कांही दासीचे काम करावे लागेल असें त्यांनी सांगितले. ते ऐकल्यावर ती त्या सेवकाला विचारते, "तू असें काय बोलत आहेस? काय ते राजकन्येला पणात लावत आहेत? राजा खरोखरच जुगाराच्या व्यसनात फसला आहे. एरवी कोणी आपली पत्नी पणाला लावील कां? त्याला दुसरे कोणी नाही मिळाले बोलीसाठी"? द्रौपदी विचारते.

त्यावर तो सेवक तिला सांगतो कीं, "जेव्हां दुसरे कांहीं उरले नव्हते तेव्हां त्यांनी आपल्याला पणाला लावले. प्रथम त्यांनी स्वताच्या भावांना लावले व नंतर स्वतःला लावले आणि शेवटचा दैवाचा खेळ म्हणून त्यांनी आपल्याला लावले. आणि त्यातही तो हरला आहे". ते ऐकून ती त्या सुताला बोलते, "अरे सुता, जा आणि त्या जुगारड्या युधिष्ठीराला विचार, त्याने कोणाला प्रथम लावले व हरला? स्वतःला कां मला? त्याचे उत्तर प्रथम आण आणि मगच मला न्यायला ये".

वैशंपायन पुढे सांगतात, तो संदेशवाह सभागृहात येतो व द्रौपदीचा प्रश्न सांगतो तेथे जमलेल्या सगळ्यांना. तो युधिष्ठीराकडे पाहून तो प्रश्न सांगतो. तिने विचारलेले असते, तू

कोणाचा मालक स्वतःला सजतोस? तू स्वताला प्रथम हरवलेस मग मला कसे पणाला लावतोस? युधिष्ठीराकडे त्या प्रश्नाला उत्तर नव्हते.

तेव्हां दुर्योधन बोलतो, "त्या राजकन्येला प्रथम येथे आणावे. येथे येऊन तिला जे विचारावयाचे ते विचारावे. येथे जमलेल्या सगळ्यांना ऐकू आले पाहिजे त्या दोघांतील संभाषण".

तो इमानदार संदेशवाह तो संदेश घेऊन पुनः एकदा राणीवशात गेला. तो ते करतांना खूपच अस्वस्थ दिसत होता. तो तेथे जाऊन कृष्णेला दुर्योधन काय बोलला ते सांगतो. व तिला बरोबर येण्याची विनंती करतो. त्यालासुद्धा असे वाटते कीं, कौरवांचा अंतकाळ समीप आला आहे. तो संदेशवाह बोलतो, "हा अविवेकी राजा त्याची सगळी सत्ता आणि वैभव लवकरच नष्ट करणार आहे असें दिसते".

द्रौपदी त्या संदेशवाहास बोलते, कदाचित् असें कांहीं अघटीत व्हावे असें विधात्याच्या नियोजनांत असावे असें दिसते. आनंद आणि दुःख सगळ्याच्या भाग्यात येत असते मग तो शहाणा असेल अथवा अक्कलशुन्य असेल. परंतु, नैतिकता ही सर्वश्रेष्ठ असते तिचा अव्हेर करणारा मूर्ख ठरतो. नैतिकता सगळ्यांना दुवा देत असते. कौरव जर ती नैतिकता त्याग करणार असतील तर त्यांना कोणीही वाचवू शकणार नाही. आता तू पुनः सभागृहात जा आणि माझे हे बोलणे तेथे जमलेल्या नितिमान वडीलधार्या मंडळींना सांग.

वैशंपायन पुढे सांगतात, तो सुत जातीचा संदेशवाह तो निरोप घेऊन सभागृहात आला. त्याने जे कृष्णा बोलली ते तसेंच तेथे सगळ्यांना सांगितले. ते ऐकून सगळे वडीलधारे खाली मान घालून बसलेले होते. एक शब्द कोणी बोलू शकत नव्हता. तरी परिस्थितीचा अंदाज घेऊन युधिष्ठीर आपला एक संदेशवाह तिच्याकडे पाठवतो. असा निरोप घेऊन कीं, जरी तू मासिकपाळीत असल्यामुळें एका वस्त्रात असलीस व तुझी नाभि दिसत असली तरी सभागृहात त्वरित निघून ये आणि सासर्यापुढे तिची कैफियत मांडावी. तो हुशार संदेशवाह तडकाफडकी द्रौपदीकडे जातो व य़ुधिष्ठीराचा निरोप तिला सांगतो. त्यात युधिष्ठीराचा उद्देश तो तिला समजावून सांगतो. त्या परिस्थितीत अडकलेले ते शक्तिमान पांडव शब्दात अडकल्यामुळें असहायपणे एकमेकाकडे पहात रहातात. पांडवांची ती हालाखीची परिस्थिती पाहून तो नीच प्रवृत्तीचा त्याच्या मनातल्या मनात खूष झालेला

खलपुरुष त्यांच्या डोळ्यात डोळा लावून त्याच्या संदेशवाहाला बोलतो, "त्या दासीला खेचून आण, आम्ही कौरव तिच्या प्रश्नाची उत्तर देण्यास तयार आहोत". तो आज्ञाधारक सेवक ती आज्ञा अमलात आणण्यासाठी निघतो पण त्याच्या मनात द्रौपदी काय करेल त्या बाबत घाबरलेला असतो. त्यामुळें तो सभागृहातील सगळ्यांना विचारतो, "मी पांडवांच्या राणीस काय बोलू"?

ते त्या घाबरलेल्या सेवकाचे असहाय अवस्थेतील उद्गार ऐकून आपल्या धाकट्या भावास आज्ञा करतो, अरे दुःशासना, हा सेवक वृकोदराला घाबरलेला आहे म्हणून, तू जाऊन त्या यज्ञसेनाच्या मुलीला जी आता आपली दासी झाली आहे तिला जबरदस्तीने खेचून घेऊन ये. आपले शत्रू तुर्तास आपल्या मर्जीचे दास झाले आहेत. ह्या दैववादी मूर्खाच्या अविचारी कृत्यामुळें ते आता आपले दास झाले आहेत. त्यांना अजिबात घाबरू नकोस. ते ऐकून तो लाल झालेल्या डोळ्याने तो कौरव उठतो. तडक त्या पांडवांच्या दालनात बेधडक शिरतो. तेथे द्रौपदीला उद्धटपणे बोलतो, "अग ए कृष्णे, पांचालच्या राजकन्ये, तुला आम्ही कौरवांनी जिंकले आहे. म्हणून तू कमलनयना, आत्ताच्या आत्ता सभागृहात येऊन आम्हा कौरवांना तुझे पति म्हणून जाहिर कर. त्याशिवाच तुला दुसरा पर्याय नाही. तुला आम्ही वैध मार्गांने आमचे केले आहे. तू आता आमची झाली आहेस. ते ऐकल्यावर ती फिक्की पडलेली राजपुत्री झटकन धांवत धांवत तिच्या सासर्याच्या कक्षाकडे निघते. तेथे धृतराष्ट्राच्या घरातील इतर महिला हजर होत्या. ते पाहून मोठ्या रांगाने तो क्रुरकर्मा दुःशासन तिच्या मागून धावत गेला आणि तिच्या केसांना धरून पकडले. ते लांब आणि कुरळे केस त्याच्या हातात राहिनात. जे केस राजसूय यज्ञाच्या प्रसंगी मंत्राने संस्कारीत केलेले होते. ते आता एका दुष्कर्म्याच्या हातात आले होते. दुःशासन पांडवांच्या बाबत भिती न बाळगता तिला तसेंच खेचत सभागृहाकडे आणू लागतो. त्यामुळें ती सम्राज्ञी संतापाने आणि भितीने थरथरत होती. एवढे शूरवीर पति असूनही तिची अशी अवस्था झाली होती. ती अस्पष्ट आवाजात ओरडत होती, "अरे चांडाळा, तुला असें करतांना लाज कशी वाटत नाही? मी ऋतुस्नात झाली आहे अशा परिस्थितीत कोणाही स्त्रीला असें वागवायचे नसते". परंतु त्या ओरडण्याचा त्या नीच माणसावर कांहीही परिणाम होत नव्हता. द्रौपदी त्यानंतर फक्त कृष्णाचा धावा करू

लागली. दुःशासन मात्र तिला सांगत असतो किं, तू आता आमची दासी झाली आहेस व तुला आमच्या नोकरांच्या ठिकाणी रहावे लागेल व आमच्या मर्जीप्रमाणे वागावे लागेल. द्रौपदीचे ते हाल होतांना द्वारकेत असलेला कृष्ण त्याच्या दिव्य दृष्टीने पहातो. तिची आर्त किंकाणी त्याला ऐकू येते. तिचा धावा तो समजतो. तिची ही अवस्था होण्यास कोणीही जबाबदार असो, तो ते सहन करू शकत नाही. त्याचवेळी कृष्णा विचार करत असतें किं, मी अशा अवस्थेत तेथे त्या पुरुषात जाणे अयोग्य आहे. मला कोण वाचवेल, जो वेदाचा ज्ञाता आहे, जो ज्ञानी आहे असा कृष्णच मला ह्यातून वाचवू शकतो.

द्रौपदी तशा अवस्थेत ओरडत असते, "अरे नीचा, चांडाळा, अशा अवस्थेत मी असतांना तू मला फरफटत कां नेत आहेस? माझ्या अंगावर जास्त कपडे नाहीत तेसुद्धा सुटले तर काय होईल"? "माझे पति जे जगातील सर्वश्रेष्ठ योद्धे आहेत ते हे कधीही सहन करणार नाहीत". मला समजते कीं, ते तुर्त वचनात आडकले आहेत पण वचनाचीसुद्धा मर्यादा असते, त्यापुढे वचन बंधन पाळावयाचे नसते कारण, त्या नैतिकतेला अर्थ उरत नाही. नैतिकता ही सत्याच्या संरक्षणार्थ पाळावयाची असते, असत्याचे जर तशा नैतिक बंधनाने फावणार असेल तर ती नैतिकता व त्यातून उत्पन्न होणारी बंधनं पापकारक ठरू शकतात". "नैतिकतेचे नियम तोंच समजू शकतो ज्याला सुक्ष्मज्ञान आहे. एरवी नैतिकतेच्या नियमाच्या सबबीखाली अनैतिकतेचाच प्रचार होत असतो. माझ्या पतित कांहीं दोष असेल हे मला पटत नाही. त्यांचे गुणच मला जास्त भावतात. परंतु, अरे दैवा, खरे काय आहे त्याच्या संभ्रमात मी अडकले आहे. माझा पति इतका खालच्या पातळीला जाऊ शकतो कीं, त्याने त्याच्या पत्नीला ती मासिकपाळीच्या काळात असतांना पणाला लावले"? "कुलिन क्षत्रियांचे वागण्याचे नियम तो इतक्या लवकर विसरला? खरोखरच मला पणाला लावले आहे कां, हा सगळा कौरवांचा बनाव आहे? खरेच माझा लिलाव युधिष्ठीरानी द्युतात मांडला असले नाहीतर माझे कुरु पति असें निःशब्द मान खाली घालून बसले नसते. ते पहा द्रोण आणि भिष्म गुपचुप कसे अशा स्थितीत बसू शकतात. त्यात ते माझे काक सासरे विदूर, नैतिकतेचा साक्षात अवतार, न्याय देवतांच जणू, तेसुद्धा कसे निःशब्द झाले आहेत. ते सगळे पराक्रमी राजे असें शांतपणे खाली मान घालून बसले आहेत. कांही अंदाजसुद्धा करता येत नाही. हे सगळे अघटीत आहे. माझा माझ्यावरचा

विश्वास उडण्याची वेळ आली आहे. माझ्यावर सगळ्यांच्या समक्ष घोर अन्याय होत असतांना, ते असत्या विरुद्ध उभे रहाणारे आज कां कांहीं बोलत नाहीत"?

वैशंपायन पुढे सांगत रहातात, अशाप्रकारे हवालदिल झालेली ती नाजुक शरीरयष्टी असलेली कृष्णा, मोठ मोठ्याने आकांत करत असतांना तो कौरव तिला केसाने पकडून फरफटत ओढत सभागृहाकडे आणत असतो. द्युताच्या मंचावर ती आणली गेली. आता ती संतापलेली, तितकीच हताश झालेली, यज्ञसेनाची असहाय्य यज्ञकन्या, आपल्या पराक्रमी पांचही पतींकडे रागांने पहात असते. तिला स्पष्टपणे दिसते किं तिचे चारही पांडव अत्यंत क्रुद्ध अवस्थेत तेथे बसलेले होते. हा काय प्रकार आहे ते तिच्या अजून लक्षात आलेले नव्हते. तिच्या असा स्थितीत तेथे कौरवानी आणण्यामुळें ते भयंकर संतापलेले तिला दिसत होते.

वैशंपायन सांगत असतात, त्या पांडवांना त्यांचे राज्य गेले त्याचे दुःख नव्हते. ते दागिने, रत्नं, जडजवाहर, परंतु, द्रौपदीच्या त्या तिरस्कार व्यक्त करणार्या दृष्टीने ते जास्त अस्वस्थ झालेले दिसत होते. कृष्णाला एका हातात तिचे सुटलेले केस पकडून तो दुःशासन तुच्छपणे पांडवांकडे पहात ज्यात छद्मीपणा परिपूर्णतेने भरलेला होता, तिला बोलतो, "अग आमच्या दासी"? एवढे बोलून तो व इतर त्याचे दोस्त जोरजोरांनो हसत ओरडू लागतात. ते पाहून त्यांतील कर्ण विशेष खूष झालेला दिसतो. तो टाळ्या वाजवून त्याला साथ देत असतो. त्यांचा मामा सुद्धा त्यात भर घालत असतो, टाळ्या वाजवून. ते सगळे कौरवाच्या बाजूचे असें वागत असतात, जणूकाय दुःशासनाने मोठी लढाईच जिंकली असावी. इतर कौरव जरी खूष दिसत होते त्यात दुर्योधन विशेष खूष दिसत होता. बाकीचे सभागृह ते दृष्य पाहून शरमेने खाली मान घालून होते. तेथे जणू सुसंस्कृततेचा बळी दिला जात होता व हे सगळे स्वतःला कुलिन म्हणवणार्या कुरु घरात होत होते.

तिला अशा रीतीने आणलेले पाहून भिष्म कृष्णाकडे पहात बोलतो, "मुली तुझे भले होवो, एक गोष्ट समजून घे, नैतिकता तरल असते. त्यामुळें तुझ्या प्रश्नाचे अचुक उत्तर मला देता येत नाही. तरीसुद्धा जे मला वाटते ते सांगतो, आपल्या सामाजिक मान्यतेनुसार पत्नी पुरुषाची संपत्ती असें समजले जात आहे. किंबहुना बहुतेक स्त्रियासुद्धा तेंच पति पत्नीतील नाते योग्य समजतात. तरीसुद्धा युधिष्ठीरानी त्या नात्याचा येथे जसा वापर केला आहे ते

मात्र मला अयोग्य वाटते कारण, ते नैतिकतेच्या मुलभूत सिद्धांताच्या विरुद्ध आहे. कारण, मालकी वस्तुची आणि माणसांची ह्यात मोठा फरक असतो. दुसरा भाग ह्या बाबतीत असा आहे कीं, द्युताच्या नियमानुसार दोन तुल्यबळ खेळू शकतात, जसे द्वंद्वात असते. येथे युधिष्ठीराला माहीत होते कीं तो शकुनीच्या योग्यतेचा खेळाडु नाही तरी त्याच्याशी तो द्युत खेळण्यास तयार झाला व शकुनीनेसुद्धा ते मान्य केले अशा व्यस्त परिस्थितीत दोष युधिष्ठीराचा दिसतो. त्याने द्युत खेळण्यास नकार दिला असतां तर हे घडलेच नसते. म्हणून युधिष्ठीर दोषी ठरतो व त्यात हरल्यानतर तो त्याच्या पत्नीला पणाला लावतो हेसुद्धा अक्षम्य चुकीचे होते. युधिष्ठीराच्या अंध दैववादामुळे हे घडले आहे असे माझे मत झाले आहे. ते भिष्माचे ऐकून द्रौपदी बोलते, माझ्या पतीस प्रथम पाहुणे म्हणून बोलवायचे व मैत्रीपूर्ण सांगून अमैत्रीपूर्ण असा द्युताचा डाव मांडावयाचा त्यात कोणती नैतिकता आपण पाहिली आजोबा"? मैत्रीपूर्ण द्युत व खरा अटीतटीचा द्युत ह्यात फरक असतो, परंतु, हा द्युत मैत्रीपूर्ण नव्हता म्हणून तो व त्यातील जिंकणे आणि हरणे कोणत्याही नैतिकतेच्या नियमानें योग्य ठरत नाही. मैत्रीपूर्ण सांगून अटीतटीचा द्युत खेळून शकुनीने गुन्हा केला आहे. ह्यांचे परिणाम सुद्धा खोटे ठरवले पाहिजेत कारण खोटे बोलून ते हा खेळ खेळत होते. पांडवांच्या राजाला खोटे बोलून त्याच्या द्युताच्या व्यसनाचा गैर फायदा घेतला गेला आहे. म्हणून हा सगळा खेळच अवैध ठरतो व त्याचे परिणाम सुद्धा तितकेच अवैध ठरतात. एकाद्या माणसाच्या विशिष्ठ कमजोरीचा वापर करून त्याच्याशी मैत्रीच्या नावांखाली अमैत्रीपूर्ण खेळ करणे कोणच्या न्यायाच्या मर्यादित येते ते सांगा. पाहुण्यावर अशारितीने दबाव आणणे कसे न्यायाला धरून होते"? वस्तुतः खेळ खेळावयास जायलाच नको होता पण तुमच्या सारख्या ज्येष्ठानी त्याला चालू देऊन कोणती नैतिकता सिद्ध केली ते सांगा. जर माझ्या पांडवाची संपत्ती कौरवांना पाहिजे होती तर ते तसे सांगते तर माझी खात्री आहे, माझ्या पांचही पतींनी ती त्यांना स्वखुषाने दिली असती. कारण पुनः तितकी संपत्ती कमावणे माझ्या पतींना मुळीच अवघड नाही. पण प्रामाणिकपणाचा लवलेश नसलेले ते अशा अन्यायकारक गुन्हेगारी स्वरुपाच्या योजना करत राहिले व आपण बुजूर्ग ते निमुटपणे पहात राहता हे कोणत्या नैतिकतेत बसते ते सांगा. नैतिकता तरल असते अशी सबब सांगण्यात काय अर्थ आहे ते सांगा. तरीसुद्धा माझ्या

माहितीप्रमाणे विदूर त्याला विरोध करत असतांना आपण कुटूंबाचे ज्येष्ठ गप्प कां बसला होता? विदूर काकांच्या मताची बाजू कां घेत नव्हता? तुमच्या घरात असेंच कां सुनांना वागवतात"? स्वताला कुलिन क्षत्रिय म्हणवून घेण्याच्या योग्यतेचे आपण राहिले नाहीत हे तुमच्या लक्षात येते कां"? माझ्या प्रश्नाची प्रामाणिकपणे उत्तरं द्या.

वैशंपायन सांगत असतात, ते बोलून अगतिक झालेली ती कृष्णा उभी होती व त्या तिच्या बोलण्याचा यत्किंचितही परिणाम झाला नसल्या सारखा दुःशासन तिला शिव्या देतच असतो. तेवढ्याने समाधान न झाल्या प्रमाणे तो तिचे आधीच सैल झालेले एकवस्त्र तिच्या पासून काढून तिला सगळ्यांच्या पुढे नग्न करण्याचा प्रयत्न सुरु करतो. ह्या सगळ्या प्रकाराने संतापलेला तो वृकोदर आता द्रौपदीच्या युक्तिवादाने प्रभावित झाल्यामुळें क्रोधांने युधिष्ठीराकडे पहातो, त्याचा संयम सुटतो.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा सद्दुसष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग अड्डुसष्ठावा

(द्युत पर्व पुढे चालू)

भिम उठून बोलतो, "अहो युधिष्ठीर, जुगारी लोकांच्या घरात बर्याच नितीशुन्य बायका असतात. तरी ते जुगारी लोक आपल्या खेळाच्या मस्तीत त्या बायकांना पणाला लावत नाहीत. कितीही संपत्ति आणि इतर गोष्टी पणाला लावल्या तरी ते त्यांच्या बायका, मुलं, सैनिक, दास व दास्या ह्यांची बोली करत नाहीत. अशी बोली द्युताच्या कोणत्याही नियमात बसत नाही. स्वताचे राज्य आणि स्वताला पणात लावणे असें कांहींही खर्या द्युतात मान्य नसतांना तू ते कां केलेस"? "तू मला व माझ्या भावांचा सौदा केलास, मी काहीं बोललो नाही कारण आम्ही आमच्या मातेला शब्द दिला आहे कीं, आम्ही तुझ्या सगळ्या आज्ञांचे विनाशर्त पालन करू, पण तुझे ह्या निष्पाप यज्ञज द्रौपदीला पणाला लावणे मला अजिबात आवडले नव्हते आणि ज्या अर्थी तिने तुझा असा कांहींही अधिकार तिच्यावर नाही असें म्हंटल्यानंतर मी तुला आता ह्या सगळ्या बेजबाबदार वागण्याचा जाब विचारणार आहे". असे बोलून तो महाबली वृकोदर त्याच्या धाकट्या भावाला बोलतो, "अरें सहदेवा, थोडा विस्तव घेऊन ये". असे बोलून नंतर तो बलशाली भिम दुर्योधनाकडे पाहून गरजतो, "त्या शकुनीला येथे आण, मला त्याचीसुद्धा दखल घ्यावयाची आहे. कारण मैत्रीपूर्वक द्युताचे नियम त्याला मला सांगावयाचे आहेत. असें विचारण्याचे कारण, जे घडत आहे ते विशेष करून दुर्योधनाची भाषा, वागणे, दुःशासनाचे द्रौपदीशी वागणे हे आणि इतर कांही सगळे कोठल्या प्रकारच्या मैत्रीत येते ते समजून ध्यावयाचे आहे".

ते भिमाचे कठोर उद्‍गार ऐकून अर्जुन उठून त्याला बोलतो, "माझे ज्येष्ठ, आज पर्यंत आपण अशारितीने युधिष्ठीराशी कधी पूर्वी बोलल्याचे मला स्मरत नाही. ह्या दुष्ट लोकांचा तुझ्यावर दुष्परिणाम तर झाला नाहींना"? "आपण आपली नौतिकता सांभाळणे अशा परिस्थितीत, आवश्यक आहे असें तुम्हाला वाटत नाही कां"? "मला वाटते अशा वागण्याने तू आपल्या वैर्यांच्या इच्छा पूर्ण करत आहेस, म्हणून जरा दमाने घे. आपल्या गुणी वडील भावाचा अशारितीने उपमर्द करणे तुझ्या नैतिक मुल्यात बसते कां"? "गोष्टी कशा घडत गेल्या ते पहा, प्रथम कौरवांनी पापबुद्धीने प्रेरित होऊन आपल्याला पाहुणे म्हणून बोलावले. त्यामुळें पाहूण्याचे नैतिक नियमांचे बंधन आपल्या मोठ्या भावाला

पाळावे लागले, त्यात त्याला त्याच्या मर्जी विरुद्ध द्युत खेळावा लागला. जरी द्युत खेळणे त्याला आवडत असले तरी असा खोटा द्युत तो कधीच खेळत नाही हे तू चांगलेच जाणत आहेस. सुरुवातीलाच अजातशत्रू शकुनीला बोलला होता कीं, तो जो द्युत मांडत आहे तो अनैतिक आहे, तरी पाहुण्याच्या मर्यादा पाळण्याच्या उद्देशांने तो खेळत राहीला व त्याचा परिणाम स्वरुप जे घडले ते आपण पाहिले आहे. मला वाटते जे युधिष्ठीराने केले ते प्रस्थापित नैतिक मुल्यांच्या प्रमाणे योग्य होते".

ते ऐकून भिम त्याला जाब देतो, "जर अशारितीने बेजबाबदारीने वागणे ज्यामुळें आपल्या पत्नीला, द्रौपदीला पणाला लावणे जर योग्य असेल तर मी त्याचे दोनही हात उखडून काढतो आणि विस्तवात भाजून काढतो". असें बोलून तो त्याचे प्रचंड हात जोरांने उखडण्याच्या अविर्भावात हलवतो.

वैशंपायन सांगतात, वातावरण आता तापत आहे हे पाहिल्यावर दुसरा एक कौरव, विक्रांत पुढे होतो व विचारतो, "अहो राजन, यज्ञसेनीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देण्याची कृपा करावी. जर आपण सगळे अयोग्य मार्गाने हे सर्व करत असलो तर, लवकरच आपण सगळे नरकात जाऊ". पुढे तो विक्रांत भिष्म, धृतराष्ट्र, द्रोण आणि कृप ह्यांच्या कडे अंगुली निर्देश करत त्याचा प्रश्न त्या कुरु परिवारातील वडीलधार्यांसाठी आहे असें दाखवतो. त्याला त्या बुजूर्गांकडून उत्तराची अपेक्षा आहे असें तो दाखवतो. पुढे तो त्यांना विचारतो, "जर यज्ञसेनेच्या म्हणण्यानुसार हा सगळा प्रकार मैत्रीच्या नावां खाली चालवून प्रत्यक्षात मात्र वैरपूर्ण होता तर मग हे वडीलधारे जे ज्ञानी आहेत व काहींतर अवतारी आहेत, कां ते पहात बसले? त्यांनी ह्या सगळ्या प्रकाराला वेळीच आक्षेप कां घेतला नाही? त्याच प्रमाणे हे जमलेले राजे पहात आहेत त्यांनीसुद्धा कां आक्षेप घेतला नाही"? त्या सगळ्यानी त्याच्या त्यांच्या दृष्टीने ह्या सगळ्या प्रकारावर आपापले मत काय आहे ते सांगावे". त्यात जिंकणे व हरण्याचा विचार नसावा. केवळ नैतिकतेच्या दृष्टीकोनाचीच बाजू पहावी. पुनः पुन्हा तो विकर्ण त्या जमलेल्या राजांना त्यांचा अभिप्राय काय आहे असें विचारत रहातो पण कोणीही त्याला एका शब्दाने उत्तर देत नाहीत. फक्त हाता पायांची चुळबुळ करण्या पलिकडे ते राजे कांहीं करू शकत नव्हते. त्यांची असहायता स्पष्टपणे दिसत होती. त्यांच्या कडे द्रौपदीच्या एकाही प्रश्नाचे कांहींही उत्तर नव्हते. शेवटी तो राजपुत्र बोलतो,

तुम्ही उत्तर द्या अगर नका देऊ, परंतु, मी तुम्हाला उत्तर देतो. त्याचे खरे कारण काय, ज्यामुळे हे येथे जमलेले राजे कां उत्तर देत नाहीत. त्याच कारण असें आहे कीं, सर्व राजे बाईकडे एक उपयोगाची गोष्ट समजून पहातात. राजे त्यांचा समय शांततेच्या काळात शिकार, जुगार, नशा आणि बाई ह्यांत व्यतीत करत असतात. ही चार व्यसने आजच्या राजांना कमजोर करत आहेत. ह्या चार गोष्टींमुळें हे राजे दुर्व्यसनी झाले आहेत. त्यांचा विवेक नष्ट झाला आहे. त्यामुळें हे राजे ह्या गोष्टींमुळें जे अन्याय उत्पन्न होतात ते थांबवू शकत नाहीत. हे पंडूचे पुत्र सुद्धा ह्याला अपवाद नाहीत. म्हणूनच तो इंद्रप्रस्थाचा नरेश त्याच्या पत्नीला तिच्या अशा परिस्थितीत द्युतात बोलतो आणि हरतो, त्याला त्याच्या दैवाने मदत केली नाही. कारण अशा दुर्व्यसनी पांडवांच्या राजाला जो नैतिकतेच्या गप्पा मारत असतांना दुसरीकडे अनैतिक कारवाया करण्यात गुंतलेला आहे. आज ह्या घटनेमुळें सगळ्यांना हे पांडव, विशेष करून युधिष्ठीराचे खरे रुप बाहेर आले व ते त्याच्या पत्नीने उघड केले म्हणून ते कोणालाही नाकारता येणार नाही. त्या निष्पाप राजकन्येची काय अवस्था झाली आहे पहा. कदाचित ती तिच्या मनातल्या मनात स्वतःच्या दैवाला दोष देत असेल ज्यामुळे तिचा संबंध ह्या व्यभिचारी पांडवांशी झाला. माणसाच्या दैववादी असण्याचा व त्यासाठी कोठल्याही थराला जाण्याचा मूर्खपणा म्हणजे काय ते ह्या स्वताला नैतिकतेचा पुतळा समजणार्या युधिष्ठीराने दाखवून दिला आहे. तेवढ्याने झाले नाही म्हणून कीं काय अर्जुन त्या नीच मोठ्या भावाचे समर्थन करतांना दिसत आहे. तो महाबली भिम योग्यतेच करण्यासाठी तयार झाला असतांना हा दुसरा व्यभिचारी धनंजय त्याला तो योग्य निर्णय घेण्यापासून कसा अडवत आहे ते पहा. विशेष म्हणजे अहो राजांनो ह्यांच पांडवांने त्या यज्ञजाला द्रुपदाच्या कडे झालेल्या तिच्या स्वयंवरा प्रसंगी जिंकले होते. ते पहाता आम्ही समजत होतो कीं, तो तिची बाजू घेऊन ह्या अजातशत्रूला आवरेल पण कसले काय, त्याला सुद्धा त्याच्या पत्नीच्या संरक्षणापेक्षा त्याच्या नालायक मोठ्या भावाच्या इभ्रतीचे पडले आहे. ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं आज ह्या पंडुपुत्रांचे खोटेपण सिद्ध झाले आहे, आणि तेसुद्धा त्यांच्या सर्वांच्या समाईक पत्नीनी केले आहे. मी सर्व कौरवांच्या वतीने सांगू इच्छितो किं, आज आमच्या भावजईने खरी लढाई जिंकली आहे. तिचे हक्क कोणीही नाकारू शकणार नाही. असें बोलणे झाल्यावर धृतराष्ट्राचा

मुलगा दुर्योधन त्याला अडवत बोलतो, "अरे विकर्णा, तू अजून लहान आहेस, त्या प्रमाणे तुझे विचार आहेत. तो रागावलेला असतो. तो त्याच्या भावाला बोलतो, "तू एकाद्या म्हातार्यासारखा हे सांगत असलास तरी त्यात तथ्य नाही. तुझा दावा कीं, द्रौपदी बरोबर आहे ते अयोग्य आहे कारण, युधिष्ठीराने तिला त्याची मालमत्ता सांगून पणाला लावली होती. असा परिस्थितीत ती कांहींही बोलली तरी त्यात कांहीं अर्थ उरत नाही. तिला योग्य समजण्याचा मूर्खपणा तू करत आहेस म्हणून तू गप्प बस. सुवलापुढे तिला युधिष्ठीराने पणात लावले असतांना व तो हरला, मग ती कशी योग्य ठरते. तिच्या प्रश्नांची दखल घेण्याची काय गरज आहे"? एका दासीच्या प्रश्नाची दखल घेण्या इतके हे येथे जमलेले राजे हीन नाहीत. तू तिला अशारितीने तिच्या एका वस्त्रात आणले ते अयोग्य आहे तेसुद्धा निरर्थक आहे. तुला माहित आहे कां देवांनी जे नैतिकतेचे नियम केले आहेत त्याप्रमाणे एका स्त्रीला फक्त एकाच पति बरोबर जीवन व्यतीत करावयाचे असते. असें असतांना हि कृष्णा पांच पुरुषां बरोबर संसार करत आहे. त्याचा अर्थ ती कुलटा आहे. अशा स्त्रीला कांहीं प्रश्न विचारण्याचा अधिकार नसतो. तुझ्या न्यायाच्या कल्पना सामान्य समाज कधीच मान्य करणार नाही. त्याकरतां तिला अशारितीने खेचत आणण्यात आम्हा पुरुषांच्या जगात कांहींच गैर नाही. तू उगाचच मोठेपणाच्या गोष्टी करू नकोस. अशा बायकांना असेंच सभेत आणायचे असते. त्यात कांहींच गैर नाही. त्यांना कोणी वाली नसतो. त्यात तुला आश्चर्यचकित होण्यासारखे कांहींच नाही. त्या सगळ्या पांडवांचे जे कांहीं आहे ते सगळे शकुनीने वैध मार्गाने जिंकले आहे. हा वरकरणी जे शहाणपणाचे बोलत आहे त्याचे कारण तो अजून लहान आहे. तो अजून पुरुषांच्या जगात कसे काम होते त्याबद्दल अज्ञानी आहे. तो त्याच्या आईच्या कुशीत असलेल्या बालकासारखा बोलत आहे. दुर्योधन आज्ञा करतो कीं, ते पांडव त्यांचे कपडे काढतील व ते ऐकताच सगळ्या पांडवांनी त्यांचे वरचे वस्त्र काढून खाली फेकले, ते झाल्यामुळें उत्तेजित झालेला तो कौरव कृष्णेचे वस्त्र फेडण्यासाठी सरसावतो. त्यामुळें व्यथित झालेली द्रौपदी जनार्दनाचा धावा करू लागते.

वैशंपायन पुढे सांगत असतात, जेव्हां दुःशासन तिचे कपडे काढण्याचा प्रयत्न करण्यासाठी पुढे होते. तेव्हां कृष्णा जनार्दनाला जोरा जोरांने हांका मारू लागते. "अरे गोविंदा, अरे हरी, अरे तू जरी द्वारकेला असलास तरी मला तुझ्याशिवाय कोणीही आधार नाही. ती मोठ्याने

असें ओरडून कृष्णाला हांका मारत होती. ती पुढे त्या विश्वनाथाला हांक मारते, अरे वृंदावनच्या गोवर्धना, केशवा, तू हे काय होत आहे ते पहात आहेस नां"? माझा विनाकारण अपमान होत आहे. अहो लक्ष्मीवरा, वृंदावनच्या व्रजनाथा, सर्व विघ्नहर्त्या, अरे जनार्दना, कृपा कर आणि मला ह्या कौरवांकडून होणार्या आपत्तीपासून वाचव. अरें कृष्णा, लक्ष्मीवरा, तू महान योगी आहेस, विश्वाचा श्वास आहेस, जगनियंता आहेस, गोविंदा, मला फक्त तूंच वाचवू शकशिल, मी मोठ्या अडचणीत आहे धावून ये, ह्या नराधमांच्या कौरवांच्या मध्ये एकटी झाली आहे". अशारितीने मोठ्या अवघड परिस्थितीत असलेली ती कृष्णा दामोदराला हांका मारत असते. त्या तीव्र चिंतेने व्यथित झालेली कृष्णा सारखी जनार्दनाला मोठ मोठ्याने हांका मारत असते. ती तिचा चेहरा दोनही हाताने झाकून सारखी कृष्णाला बोलावत असते, ती प्रार्थना तिन्ही जगाच्या मालकाला ऐकू जाते. तिची ती आर्त हांक त्याला समजते. त्याच्या दैवी सिद्धीमुळें तो अदृष्य असा त्या सभागृहात येतो. त्याला ते दिसते किं, तो दुःशासन आता तिची लाज चव्हाट्यावर आणणार असतो. तो त्या सभागृही पहातो बाकीचे सगळे गुपचुप बसलेले होते. जसें तो कौरव तिचे कपडे खेचू लागतो तसें, तिच्या अंगावर नवीन कापडं चमत्कारीकपणे येत होते. तो नराधम पुनः पुन्हा ते उत्पन्न झालेले कपडे ओढून काढत होता. पुनः नवीन कापडं तिच्या अंगावर अवतरत होते. तो कौरव ती कापडं काढून काढून शेवटी थकला. परंतु, तिच्या अंगावरील कापडं येणे चालूच होते. तो प्रकार पाहून त्या सभेत उपस्थित असलेले सर्व राजे थक्क झाले. द्रौपदीला कृष्णाचे संरक्षण असल्याचे सिद्ध होत होते. सर्व सभागृह उठून द्रौपदीची वहाव्वा करू लागतात. कौरव तो प्रकार पाहून अवाक् झालेले होते. दुःशासन ती कापडं काढण्याचे थांबतो. सगळे आता धृतराष्ट्राच्या मुलांची निर्भत्सना करू लागतात. त्यामुळें उत्तेचित होऊन महाबली भिम त्याचे हात आवळत आणि ओठ चावत त्या जमलेल्या सभेत मोठ्या गर्जनेने जाहीर करतो, "मी भिम आज जाहिर करतो, जसें आजपर्यंत कोणीही आव्हान दिलेले नाही, अहो समस्त जगभरच्या क्षत्रियानो ह्या कौरवांचा नाश मी करणार त्यासाठी युद्ध होणार. त्याशिवाय मी माझ्या पूर्वजांच्या गतिला जाणार नाही. जबरदस्तीने त्यांच्यावर युद्ध लादून त्या नराधमांचे रक्त नाही प्यालो तर माझे नांव घेणार नाही".

वैशंपायन सांगत रहातात, ती भिम प्रतिज्ञा ऐकून त्या सभेत असलेल्या मंडळींच्या अंगावरील केस ताठ उभे रहातात. त्यातील सर्व राजे कौरवांची निंदा करू लागतात. दामोदराने घडवलेल्या चमत्कारामुळें पारडं उलटल होत. तेथे रंगीबेरंगी कपडे एक मोठा ढीग होऊन पडलेले होते. शकुनी सह सगळे कौरव घाबरून गेले होते. त्याची बोलती संपली होती. प्रत्यक्ष भगवंताने कौरवांचा धिक्कार केला होता. आणखीन काय पाहिजे"? आता एकेकांना कंठ फुटले व ते कौरवाच्या विरुद्ध बोलू लागले. द्रौपदीने विचारलेल्या प्रश्नावर सर्वत्र चर्चा सुरू झाली. त्याला उधाण आलं. त्यामुळें धृतराष्ट्राची मोठ्या प्रमाणात निर्भत्सना सुरु झाली. आता विदूरालासुद्धा उत्साह येतो. नैतिकमुल्यांचा अभ्यास असलेला विदूर त्याचे दोनही हात वर करून तेथे जमलेल्या प्रतिष्ठीत जनसमुहास शांत होण्याचे आवाहन करतो. नंतर बोलतो, "अहो सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व सज्जनानो, राजपुत्री द्रौपदीने जे प्रश्न विचारले आहेत त्याची तुमच्या नैतिकतेच्या कल्पनेनुसार उत्तरे आपल्या पैकीं कोणीही दिलेली नाहीत, ती अभागिनी आज आपल्यात उभी राहून रडत आक्रंदत प्रश्न विचारत आहे. पुण्य आणि नैतिकता अशा दोनही महत्वाच्या मुद्द्यांची येथे परवड झाली आहे. एक अडचणीत सांपडलेली व्यक्ती राजांच्या सभेत कांहीं विचारत आहे व कोणीही त्याला जाब देत नाही परंतु, त्या प्रश्नांचे समाधान होत नाही हे राजांना शोभणारे नाही. तिच्या प्रश्नाला तुम्ही उत्तर देण्यास बांधलेले अहात कारण तुम्ही सगळे राजे अहात. राजाला जर निर्णय घेता येत नसेल तर त्याला राजा कसे मानता येईल"? राजा न्याय देण्यासाठी विधात्याचा प्रतिनिधी स्वरुप असें आपण समजतो आणि तो प्रतिनिधी जर ते न्याय देण्याचे कार्य व्यवस्थितपणे करू शकत नसेल तर ते राजे, राजे म्हणवून घेण्यास लायक नाहीत असें स्पष्ट होत आहे. म्हणून आपण सगळे आपापल्या ज्ञानानुसार तिच्या प्रश्नांची उत्तर देण्याचा प्रयास करावा. विकर्णांने त्याच्या बुद्धीनुसार जे त्याला योग्य वाटते ते सांगितले बाकीचे सुद्धा त्यांच्या दृष्टीने काय ते उत्तर देतील असें मी सांगतो. प्रतिष्ठेची सबब करून त्या प्रश्नांची उत्तर देण्याचे टाळता येणार नाही. ती उत्तरे देतांना हितसंबंध सांभाळून उत्तर न देता एकाद्या निष्णात न्यायाधीशा सारखी द्यावीत. तुमचा नितिशास्त्राचा अभ्यास चांगला असतो म्हणून हे आव्हानात्मक प्रश्न पहावेत. जे जाणून बुजून हित संबंध राखण्याच्या पापकारक उद्देशांने उत्तरे देण्याचे

टाळतील ते खोटे बोलण्याच्या पापाचे धनी होतील, आणि जे समजून उमजून खोटे उत्तर देतील ते खोटे बोलण्याचे व करण्याचे पाप केल्याप्रमाणे दोषी ठरतील व नरकात जातील. प्रामाणिकपणे खरे न्यायकारक उत्तर देणारे पुण्याचे मानकरी होतील". एवढे बोलल्यावर विदूर तो मुद्दा (खरे अथवा खोटे बोलण्याचा) समजावण्यासाठी उदाहरण म्हणून एक प्राचीन काळी होऊन गेलेली गोष्ट सांगतो.

वैशंपायन सांगतात, ती प्रह्लाद व अंगिरसाच्या मुलाची गोष्ट आहे. मी ती तुला जनमेजया, आता पुनः सांगतो. वैशंपायन बोलतात, फार प्राचीन काळी एक दैत्यांचा राजा होऊन गेला. त्याचे नांव होते प्रह्लाद. त्याला एक पुत्र होता, त्याचे नांव होते विरोचन. स्वतासाठी पत्नी मिळवण्यासाठी तो विरोचन अंगिरसाच्या मुला बरोबर भांडतो. त्या मुलाचे नांव असते सुधान्वन. असें ऐकण्यात आहे किं, तो भांडणाचा वाद मिटवण्यासाठी ज्यात त्या दोघांपैकी श्रेष्ठ कोण ते ठरवावे लागणार होते. त्यांच्याने ते ठरवणे अशक्य झाल्यामुळें शेवटी ते ठरवतात कीं, राजा प्रह्लादाला मध्यस्थी नेमून त्याच्या कडून कोण जास्त श्रेष्ठ ते ठरवावे. ते प्रह्लादाकडे जातात व त्याला विचारतात, सांगा आमच्या पैकीं कोण जास्त श्रेष्ठ आहे ते. ते अट घालतात कीं प्रह्लादाने खोटी प्रशस्थी देऊ नये. त्या वादामुळें प्रह्लाद घाबरला होता. तो सुधान्वन कडे पहातो. तो सुधान्वन रागावलेला दिसतो. त्याचे स्वरुप यमाच्या तळपत्या गदेसारखे होते. सुधान्वन त्याला रागांत बोलतो जर तुम्ही खोटे बोललात तर किंवा कांहींच नाही बोललास तर तुमच्या डोक्यावर वीज पडून त्याचे शतशः तुकडे होतील. ते सुधान्वनाचे बोलणे ऐकून प्रह्लाद मदतीसाठी ऋषी काश्यष्यपांकडे गेला त्यांचा सल्ला घेण्यासाठी. काश्यपाला भेटून प्रह्लाद त्याला बोलतो, "आपण आमचे गुरू अहात, सर्वज्ञानी अहात तरी मला एक सांगा, नैतिकतेचे नियम जे देव, ब्राह्मण आणि असुर ह्या तिघांना सारखेच लागू आहेत. मी असें विचारण्याचे कारण, मी एका विचित्र प्रकारच्या अडचणीत सांपडलो आहे. मला सांगा जर मी उत्तर दिलेच नाही तर काय माझे होईल, खोटे उत्तर दिले तर काय होईल"? काश्यप त्याला सांगतात, जो भितीपोटी अथवा स्वार्थासाठी अथवा रागामुळें खोटे उत्तर देतो किंवा उत्तर देत नाही त्याला वरुण देवाचे हजार कांटे लागतील. जो समजून उमजून खोटे बोलतो त्याला वरुणाचे हजार कांटे

लागतील. एक वर्ष पूर्ण झाल्यावर ते कांटे सुटतील. म्हणून ज्याला खरे उत्तर माहीत आहे त्यांने ते न डगमगता द्यावे हेंच श्रेयस्कर ठरते.

विदूर पुढे बोलतो, "जर पुण्याचा भेद पापाने केला तर येथे जमलेल्या प्रत्येकाचे कर्तव्य ठरते कीं, तो भेद उघड करावा. नाहीतर ते स्वतः त्या भेदाचे बळी ठराल. जर अशा सभेत एकादी खरोखरचे खोटे कृत्य उघड झाले नाही तर त्याचा अर्धा दोष ह्या सभेचे नियोजन करणार्यावर जाईल. चौथा भाग त्याला जाईल जो ते दोषपूर्ण कृत्य करतो. त्याउलट जर तो भेद उघड झाला तर ह्या सभेचे नियोजनकार त्या दोषापासून मुक्त होतील. त्याच प्रमाणे इतर सदस्य सुद्धा मुक्त होतात. फक्त ज्याने त्या पापाला सुरुवात केली तोच केवळ दोषी ठरतो".

पुढे काश्यप ऋषी बोलतात, "जे खोटे बोलतात त्यांच्या त्या खोटे बोलण्यामुळें आधीच्या व नंतरच्या सात पिढ्यांचे वंशजांचे सगळे पुण्यकृत्य नष्ट होते. अशामुळें त्या वंशाची संपत्ति संपते, त्याशिवाय कोणाचे मुलगे मरतात, कोणाचे विवाह मोडले जातात, कोण कर्जबाजारी होतो, कोणाचा पति मरतो, कोणावर राजाची अवकृपा होते, कोणाची बायको वांझ होते, कोणाला वाघ खातो, कोणाची मालमत्ता त्याला फसवून काढून घेतली जाते, कोणाची मुलं मरतात असें सगळे परिणाम त्या खोटेपणाच्या तीव्रतेनुसार अनुभवास येतील, असें ब्रह्मदेव सांगतात. अशा प्रकारचे विविध दुःखकारक दुष्परिणाम खोटे बोलणार्याला अनुभवावे लागतात. त्याला ते वाईट परिणाम होतांना पहावे लागते. ते होऊ नये म्हणून साक्षीदाराने कधीही खोटी साक्ष देऊ नये असा संकेत आहे. खरी साक्ष देणारा नेहमी पुण्यवान ठरतो आणि त्याचे अध्यात्मिक कल्याण होत रहाते.

ते काश्यपांचे सांगणे ऐकल्यावर प्रह्लाद त्याच्या मुलास सांगतो, "सुधान्वन तुझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे. त्याच प्रमाणे त्याचे पिता अंगिरस सुद्धा माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. त्याची आईसुद्धा तुझ्या आईपेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणून अरे विरोचन हा सुधान्वन तुझ्या पेक्षा जास्त श्रेष्ठ झाला आहे". ते ऐकल्यावर सुधान्वन बोलतो, "अहो प्रह्लाद तुम्ही तुमच्या मुलावरील प्रेमाखातर खोटे बोलला नाही. म्हणून मी तुमच्या मुलाला आशिर्वाद देतो कीं, तो शंभर वर्षे जगेल.

असें सोदाहरण खरे बोलण्याचे महत्व काय असते ते सांगितल्यानंतर विदूर त्या सभेतील सगळ्या राजांना बोलतो, "खरे बोलण्याचे महत्व लक्षात घेऊन सगळे राजे त्यांचे द्रौपदीच्या प्रश्नांची प्रामाणिकपणे उत्तरे देतील".

वैशंपायन पुढे सांगतात, एवढे विदूर बोलला तरी तेथे बसलेले राजे एकही शब्द बोलण्यास तयार नव्हते. तरी कर्ण दुःशासनाला बोलला, "ह्या दासीला, द्रौपदीकडे पहात, अंतःपुरात घेऊन जा.  त्यावर दुःशासन तिला पुनः खेचत आत घेऊन जाऊ लागला ती असहाय, निष्पाप द्रौपदी रडत होती. ती पांडवांकडे अपेक्षेने पहात होती पण ते तिला मदत करण्यासाठी पुढे आले नाहीत.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा अड्डुसष्ठावा भाग संपला.

# सभा पर्व भाग एकोणसत्तरावा

(द्युत पर्व पुढे चालू)

द्रोपदी बोलते, जरा थांबा, अहो नीच माणसांनो, तू पापकर्मा दुःशासना, मला एक उच्च दर्जाचा विधी करावयाचा आहे जो मी अजून केलेला नाही. ह्या दुष्टाने त्याच्या पुरुषी ताकदीने मला खेचण्यास सुरुवात केल्यामुळे मी माझे अवधानच हरवून बसले आहे. रिवाजानुसार मला माझ्या ज्येष्ठ लोकांची पुजा करण्याचे राहिले आहे, ते मला करावयाचे आहे. ते पुजन मी करू शकले नाही कारण हे कौरव त्यांचे रानटी वागणे थांबवत नव्हते. म्हणून पुजा न करण्यात माझा दोष नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, द्रौपदीला आणखीन जोरांने तो नराधम खेचत रहातो. ती तोल जाऊन जमिनीवर पडते. ती सारखी रडत असते. ती उद्‌गार काढते, फक्त स्वयंवराच्या वेळी अशारितीने राजे माझा हात पकडण्यासाठी धडपडत होते. त्यानंतर असें कधीच झाले नाही. आज मला सभेत आणले जात आहे, ज्या द्रौपदीला सूर्य किंवा वारासुद्धा स्पर्श करू शकत नव्हते. आज ती अशी असहाय अवस्थेत सगळ्या लोकांच्या समोर उघडी त्यांच्या नजरेपुढे उभी होती. तिला कोणी स्पर्श करणे शक्य नव्हते ती द्रौपदी आज कोणाच्याही पुढे असुरक्षित अशी उभी होती. हे सगळे त्या नकर्त्या पांडवांमुळें होत होते त्याचे तिला नवल वाटत होते. कौरवांच्या घरात त्यांच्या सुनांचे असे हाल होत आहेत त्यांना कुलिन क्षत्रिय कसे समजावयाचे. पुरुषांच्या वादात बायकांमुलांचा बळी देणे कोणत्याही नैतिकतेत बसत नाही, जेव्हां तसें होते तेव्हां त्या घराण्याचा नाश होतो कारण बाईचा शाप, तळतळाट त्या घराण्याला पुढचे सात पिढ्याना बाधत असतो. आता सगळ्या मर्यादा ओलांडल्या गेल्या आहेत. माझ्या सारख्या उच्चकुलीन स्त्रीचे असें हाल जेथे होतात तेथे सामान्य स्त्रीयांचे काय होत असेल"? "राजा सर्वात श्रेष्ठ नैतिकता पाळणारा असावा लागतो पण येथे नीच पातळीपेक्षा नीच पातळीची अनैतिकता मी अनुभवत आहे, अरे माधवा, तू माझी लाज वाचवलीस पण ह्यापुढे माझे हे नराधम काय करणार समजत नाही. माझे पति व्यर्थ झाले केवळ त्यांच्या आईला दिलेल्या एका शब्दाच्या वचना खातर. स्त्रीच्या इज्जतीपेक्षा त्यांचा शब्द जास्त मोठा असेल तर तशा शब्द–वचनाचा काय उपयोग? माणूसकी, स्त्रीदाक्षिण्य, चांगुलपणा हे त्या दिशाहीन वचनबंधापेक्षा कमी

महत्वाचे कसे ठरू शकतात? नितीच्या शास्त्रात शब्द–वचन ह्या तिनांपेक्षा जास्त मोठ्या दर्जाचे कसें ठरवले गेले"? "कां, ह्या पुरुषांच्या विकृत मनांमुळें त्यांचा विवेक हरवला आहे? तेथे विदूर सासरे मोठ्याने ओरडून विचारत आहेत तो माझा चुलत दीर विकर्ण सांगण्याचा प्रयत्न करत आहे पण केवळ कौरवांच्या वागण्याचा ओरडून निषेध करण्या पलिकडे जाऊन मला ह्या दांडगटाच्या तावडीतून कां कोणी सोडवण्यासाठी येत नाही? पुरुषांच्या कोठल्या नितिशास्त्राप्रमाणे हे होत आहे किं, मी इंद्रप्रस्थाची राणी, पांडवांची पत्नी, प्रिशताच्या मुलाची कन्या, यज्ञजा, वासुदेवाची मैत्रीण एवढी सगळी बिरुद असूनही अशी असहाय्य कशी झाली? प्रत्यक्ष कृतीपेक्षा तत्त्वचर्चा ह्यांना जास्त महत्वाची वाटते, त्यात किती समय व्यर्थ जाणार आहे व माझी ह्यातून सुटका होणार आहे. मी तुमच्या योग्यतेच्याच कुळातील असूनही मी दासी कशी ठरवली जाते जिचा ह्या द्युताशी यत्किंचितही संबध नाही? मला पटेल असें उत्तर द्या, जे येथे जमलेले इतर राजेसुद्धा ऐकतील व त्यांनी सांगावे कोणत्या नितिशास्त्राच्या नियमांनुसार हे सगळे अन्याय होत आहेत? हा नराधम माझी व त्याबरोबर सगळ्या कुरुघराण्याची इज्जत चवाठ्यावर आणत आहे असें कृत्य करत असतांना, तरी तुम्ही राजे नुसते पहात रहाता"? असे बोलून ती तेजस्वी द्रौपदी तिची सहनशिलता संपुष्टात आल्याचे सांगते. ती शेवटी निर्वाणीचा प्रश्न विचारते, बोला, मी जिंकले कीं नाही ते सांगा? जो निर्णय तुम्ही घ्याल तो मी स्वीकारेन असें ती भिष्माकडे पहात बोलते. त्यावर भिष्म तिला सांगतात, त्यावेळी दुःशासन तिचे केस सोडतो व बाजूला उभा रहातो. भिम तिला तेथे ढीग होऊन पडलेल्या कापडांनी गुंडाळतो. "नैतिकतेची तत्त्वं लवचिक असतात, जशी वळवाल तशी वळवता येतात. म्हणूनच न्यायालयांत दोन वकिल आपले मुद्दे एका मागोमाग एक मांडून त्यांची बाजू कशी जास्त रास्त आहे ते पटवण्याचा प्रयत्न करत असतात. त्यात केले जाणारे युक्तिवाद भल्याभल्याना चक्रावून सोडतात. ह्या जगात जास्त बलवान माणूस जी नैतिक तत्त्वे मांडील ती इतर कमजोर स्विकारतात असा साधारण अनुभव आहे. म्हणजे, "बळी तो कान पिळी", हेंच अखेरीस सगळ्या नैतिकतेचे ठरत असते. तेंच खरे ठरते राजकारणात. अध्यात्मात वेगळे निकस असतात, परंतु, येथे राजकारण प्रबळ दिसते म्हणून त्यातील नियम ह्याठिकाणी सर्वमान्य होत आहेत हे आपल्या सगळ्यांचे दुर्दैव आहे. म्हणूनच मुली,

मी कोणता निर्णय तुझ्याबाबत घ्यावयाचा ते ठरवण्यास असमर्थ झालो आहे. तरीसुद्धा एक गोष्ट मला स्पष्ट दिसते ती अशी कीं, संपूर्ण कुरु वंशाचे लोक तामसी (स्वार्थ पांच प्रकारचे सांगितले आहेत, दैवी स्वार्थ, सात्त्विक स्वार्थ, रजोगुणी, तामसी, राक्षसी असें ते आहेत) स्वार्थाने प्रेरित झालेले दिसत आहेत. त्यामुळें ह्या कुळाचा नाश समीप आला आहे (तामसी आणि राक्षसी स्वार्थ नाशास कारणीभूत असतात) हे सुद्धा निश्चित झाले आहे. एक मात्र तुला सांगू इच्छितो कीं ज्या पंडुच्या घरात तू लग्न करून आली आहेस त्या घराण्यातील पुरुष पुण्यकर्मास मदत करणारा मार्ग धरूनच जगतात. अग राजकन्ये, अशा परिस्थितीतसुद्धा तू पुण्याचा मार्ग कोणता तेंच पहात आहेस हे कौतुकास्पद आहे. हे ज्ञानी लोक जसें द्रोण आणि कृप मान खाली घालून बसले आहेत जसें काय ते मेले आहेत. कारण, ते तुझ्या तीक्ष्ण प्रश्नाचे उत्तर देण्यास असमर्थ आहेत. एवढे सांगितल्यावर भिष्म युधिष्ठीराकडे बोट करून तिला सांगतो, हा तुझा नवरा नैतिकतेच्या गुंतागुंती जास्त चांगल्या प्रकारे उलगडून तुला सांगू शकेल. फक्त तोंच सांगू शकतो, तू जिंकली आहेस कां नाहीस".

अशारितीने सभापर्वातील द्युतपर्वाचा एकोणसत्तरावा भाग संपला.

## सभा पर्व भाग सत्तरावा

(द्युत पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधनाला भिऊन तेथे जमलेले राजे एकही शब्द बोलत नव्हते, त्याच्या बाजूने अथवा विरुद्ध, ती अभागिनी द्रौपदी मात्र सतत टाहो फोडून रडत होती, ते पाहून तो धृतराष्ट्राचा मुलगा, दुर्योधन गालातल्या गालात हसू लागला. त्यानंतर तो तिला सांगतो. "पांचाल राजाच्या मुली, य़ज्ञसेना, तुझ्या प्रश्नाची उत्तरं तुझ्या ह्या चार नवर्यांना देण्यास सांग. तेंच त्यांची उत्तरं देतील". असें बोलून तो भिम, अर्जुन, नकुल आणि सहदेवांकडे पहातो व बोलतो, "त्यां चारांनी ह्या सगळ्यांच्या समक्ष जाहिर करावे कीं, ते युधिष्ठीराला त्यांचा राजा मानत नाहीत. असें ते बोलले तर तुझी व त्याची ह्या गुलामगिरीतून सुटका होईल. निदान तुझ्यासाठी तरी ते असें जाहिर करतील तर त्यावरून ते तुझ्यावर खरोखरच खर्या पतिप्रमाणे माया करतात असें समजता येईल. त्या चारांना काय जास्त प्रिय आहे ते एकदाचे स्पष्ट होऊद्या. त्यामुळें हा नितिमत्तेच्या वल्गना करणारा दिखाऊ माणूस सर्वांच्या पुढे उघडा पडेल. मला तेवढेच पाहिजे कारण माझे वैर फक्त आणि फक्त युधिष्ठीराशी आहे. त्याच खोटेपणा दिसला म्हणजे झाले. असें झाले म्हणजे तुम्ही पांच माझ्या कौरवांच्या गुलामगिरीतून बिनशर्त मुक्त व्हाल. हा यमाचा ज्ञानी मुलगासुद्धा जाहिर करेल कीं, तो सुद्धा तुमचा राजा नाही".

असे सांगून तो कौरवांचा मुख्य तिला सांगतो, ते निश्चित झाले कीं बाकीच्या गोष्टीसुद्धा स्पष्ट होतील. मला दिसते किं, आम्ही सगळे कौरव तुझ्या अवस्थेमुळे अतिशय व्यथित झालो आहोत, कोणालाही तुझी ही अवस्था पहावयाला आवडत नाही परंतु, जे घडत आहे त्याची सर्व जबाबदारी ह्या एका दांभिक युधिष्ठीराची आहे. तू त्याला दोष दे आम्हाला नको".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून तेथे जमलेले बहुतेक राजे जे कौरवांच्या बाजूचे होते ते मोठ्यांने ओरडत हात वर करून आणि टाळ्या वाजवून दुर्योधनाच्या युक्तिवादाचे कौतुक करू लागले. जे पांडवांच्या बाजूचे होते ते मात्र निराश अंतःकरणाने चिंतातूरपणे युधिष्ठीराकडे व भिमाकडे, अर्जुनाकडे व त्या जुळ्या भावांकडे पहात राहीले. त्यांच्या तोंडांतून अरेरे, हाय हाय असे उद्गार ऐकू येत होते. त्या प्रतिक्रीया सभेतील मंडळींच्या

पाहिल्यानंतर दुर्योधनाचा उत्साह द्विगुणीत झाला होता. आपण ही बाजीसुद्धा जिंकली असां तो समजत होता. आता सगळ्यांची ते पांडव काय बोलतात ते ऐकण्यासाठी उत्कंठा शिगेला पोहोचली होती.

थोड्या वेळांनी सर्व शांत झाले ते पांडवांचे उत्तर काय असेल त्याबद्दल आपापल्या कल्पना लढवत होते. भिम त्याचे चंदनाच्या गंधाने रंगलेले अवाढव्य हात उंचावून बोलण्यास सुरुवात करतो. तो बोलतो, "जर हा आमचा मोठा भाऊ आमचा राजा नाही असें मानले गेले तर आम्ही पांडव कौरवांचा त्वरित नाश करून टाकू. केवळ त्याच्या आदेशांमुळें आज हे फुक्कट कौरव जीवंत आहेत. जर दुर्योधनाला असें वाटत असेल कीं, आम्ही त्याचे वरिष्ठत्व अस्विकृत करावे म्हणजे आम्ही मुक्त होऊ तर तसे करावे व नंतर त्वरितच युद्धाला तयार व्हावे, कारण माझी सगळ्या कौरवांचा ठार मारून नाश करण्याची तीव्र इच्छा आहे. खरे तर सगळ्या कौरवांनी आमच्या युधिष्ठीराचे शतशः आभार मानले पाहिजेत कारण त्याच्यामुळेंच आज तुम्ही आणि तुमचे हस्तिनापूर आहे. नाहीतर जेव्हां आम्ही चौफेर चढाया करत जात होतो तेव्हां सहदेवांनी हस्तिनापूर काबिज करण्याबद्दल प्रस्ताव मांडला होता परंतु, आमच्या मोठ्या भावांने तुम्हाला माफ करण्याचा आदेश दिला होता म्हणून तुम्ही आज येथे असे दिमाखात जीवंत अहात. खरे तर तुमचा नाश आधीच व्हावयाला पाहिजे होता, म्हणचे आजची परिस्थिती उद्भवली नसती. कोणाची हिम्मत होईल किं, त्याने द्रौपदीच्या केसाला स्पर्श करावा". दुर्योधनाकडे पहात भिम सांगतो, "ह्या अर्जुनाने मला आवरले म्हणून तू आणि तुझा हा बदमाष मामा शकुनी अजून जीवंत अहात नाहीतर द्रौपदीला खेचत आणले तेव्हांच त्या दुःशासनाचा मुडदा पडला असता. म्हणून तुम्ही मूर्ख कौरव अजून आवरा नाहीतर तुमचा विध्वंश निश्चित आहे. आता बोल, अरे कौरवा, मी युधिष्ठीराचे नेतृत्व झुगारू कां"? मी तत्वतः द्युत वगैरे मानत नाही हे तुला माहीत आहे, मी फक्त युद्धाची भाषा मानतो. शत्रूला ठार मारण्यात माझा विश्वास आहे. म्हणून सावध रहा दुर्योधना"!

वैशंपायन सांगत असतात, भिमाचे ते बोलणे ऐकल्यावर भिष्म, द्रोण आणि कृपाचार्य एकदम बोलतात, "अरे वृकोदरा तुला ते सहज शक्य आहे".

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा सत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग एकाहत्तरावा

(द्युत पर्व पुढे चालू)

कर्ण ते भिमाचे बोलणे ऐकून बोलतो, "ह्या सभेतील आपण, तिघे अर्थात् भिष्म, द्रोण आणि कृप हे स्वतंत्र बुद्धीचे अहात. मी पहात आहे किं, हे तिघे त्यांच्या राजाचे (धृतराष्ट्राचे) फक्त दोष पहातात, त्यांना ते विकृत वाटतात, आणि म्हणून त्यांची ते अवहेलना करत असतात. त्यांना त्याची प्रगती झालेली बघवत नाही असें दिसते". त्यानंतर तो द्रौपदीच्या प्रश्नांची उत्तरं देण्यास सुरुवात करतो. "अहो महाराज, गुलाम, पत्नी आणि मुलगा नेहमी परावलंबी असतात. ते कमाई करत नाहीत. कारण, जे त्यानी मिळवले ते त्याच्या मालकाच्या मालकीचे समजले जाते. तू एका गुलामाची बायको आहेस म्हणून तुला कांहीं अधिकार रहात नाहीत. म्हणून तू बर्या बोलांने धृतराष्ट्राच्या अंतःपुरात जावेस हेंच बरे. आणि तेथे त्यांच्या मंडळींची सेवा करत रहा. माझ्या मते तेंच तुझ्या प्रश्नेचे खरे उत्तर आहे. आता ह्यापुढे सगळे कौरव तुझे मालक झाले आहेत, आता पांडव तुझे मालक राहिले नाहीत. तू आता कोणी दुसरा मालक निवड असा जो तुला कधीही जुगारात बोली करून विकणार नाही. असें समजले जाते कीं, ज्या दासीला तिचा मालक निवडण्याचे स्वातंत्र मिळते ती दासी रहात नाही. त्याप्रमाणे तुला त्या मार्गाने पुनः स्वतंत्र होता येईल, म्हणून तसेंच तू करावे असें वाटते. तुझे सगळे पांचही पती कौरवांचे दास झाले आहेत त्यामुळें तुला दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही. तुला माहीत आहे कीं, आपल्या येथे बाईला स्वतंत्र स्थान नसते, ती लहानपणी तिच्या बापाची धन असते, लग्न झाल्यावर ती नवर्याची संपत्ती होते आणि म्हातारपणी मुलाची होते. पुरुषांचे व बायकांचे व्यवहार वेगळे आहेत ते समजून घे, मग तू पूर्वाश्रमीची राजकन्या होतीस ते आता विसरून जाशिल तर तेंच तुझ्यासाठी चांगले होईल. तो पृथाचा पुत्र सगळे सोडून तुला एका राजाच्या मुलीला द्युतात लावतो हे घृणास्पद, निंदनीय कृत्य झाले त्याने त्याचा विवेक, हिम्मत, धाडस व पौरुष्य पूर्णतया घालवले आहे कां"?

वैशंपायन पुढे सांगतात, ते कर्णाचे अपमानास्पद बोलणे ऐकल्याने रागावलेला भिम ओरडून बोलतो, "अरे सुताच्या मुलाच्या ह्या बडबडण्यामुळें मी चिडणार नाही. आम्ही

दास्य स्वीकारले आहे हे कबुल पण तुला तिला कांहीं सांगण्याचा अधिकार नाही कारण तू तिला पणात जिंकलेले नाहीस ".

वैशंपायन सांगतात, भिमाचे ते बोलणे ऐकल्यावर दुर्योधन उठून युधिष्ठीराला, जो त्याचे भान हरवून बेचैन अशा अवस्थेत बसला होता, बोलतो, "अहो राजे, हे तुमचे भाऊ अजून तुमच्या आज्ञेचे पालन करत आहेत व त्या नात्यानेच ते आमचे दास झाले आहेत. त्याच प्रमाणे ही तुमची बायकोसुद्धा तुझ्या आज्ञेनेच आमची दासी झाली आहे. म्हणून तू द्रौपदीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यास बांधलेला आहेस. सांग कीं, कृष्णा हरलेली आहे कारण, ती तुझी मालमत्ता आहे". एवढे बोलल्यावर कर्णाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने व भिमाला चिडवण्यासाठी त्याची उजवी मांडी उघडी करतो आणि द्रौपदीला तेथे बसण्याची आज्ञा करतो. ते पाहून संतापलेला, ज्याचे डोळे लालेलाल झाले आहेत असा वृकोदर सर्व सभेपुढे बोलतो, "अरे दुर्योधना, ही तुझी मांडी मी फोडून टाकीन माझ्या गदेच्या प्रहाराने नाहीतर मी माझ्या पूर्वजांचा वारस म्हणवून घेणार नाही". ते बोलल्यानंतर सगळे पहातात किं, भिमाच्या सर्वांगातून ठिणग्या बाहेर पडत आहेत. जशा ठिणग्या जळणार्या ओंडक्यातून निघतात. ते पाहिल्यावर विदूर बोलतो, अरे प्रतिपाच्या वंशजानो, हे पहा त्या भिमाच्या अंगातून मोठे संकट तुमच्यासाठी उत्पन्न होत आहे. अहो सगळ्यानो, समजून घेण्याचा प्रयत्न करा कीं, नजिकच्या काळात भरत कुळावर मोठे अरिष्ट येणार आहे. धृतराष्ट्राच्या मुलांनी पुढचा पाठचा विचार न करता द्युताचा हा घातक खेळ सुरु केला होता. आता ते पुरते नाही झाले म्हणून कीं, काय ते ह्या भर सभेत एका राजकन्येची चेष्टा करत आहेत. त्यामुळें हे सगळे कौरव मोठे पाप करत आहेत ज्याचे परिणाम विनाशाकडे नेणारे आहेत. अहो कौरवानो, माझे सांगणे तुमचा प्रधान ह्या नात्याने सांगतो म्हणून ऐका. जर पुण्याचा बळी गेला तर ही सगळी सभा भ्रष्ट होईल. जर, स्वतः हरण्या आधी द्युताच्या नियमानुसार जे सर्वांना माहीत आहेत, युधिष्ठीराने कृष्णेला पणाला लावले असते तर ती हरली होती पण ज्या अर्थी त्यांने तिला तो हरल्यानंतर लावले आहे ती पणाला लावली जाऊ शकत नाही. म्हणून ती जिंकलेली आहे. कारण द्युतात हरलेला माणूस कोणाचा मालक असू शकत नाही. ते विदूराचे बोलणे ऐकल्यावर दुर्योधन पुन्हा सांगतो, "मी ह्यासाठी तयार आहे पण त्यासाठी भिम, अर्जुन, नकुल आणि सहदेव असें सांगतील कीं ते युधिष्ठीराला त्यांचा

राजा मानत नाहीत. असे त्या चौघानी जाहिर केले तर मी त्या सगळ्यांना व कृष्णेलासुद्धा माझ्या बंधनातून मुक्त करतो".

ते ऐकल्यावर अर्जुन बोलतो, "युधिष्ठीराने आम्हाला पणाला लावले तेव्हां तो आमचा राजा होता परंतु तो त्याला स्वतःला हरवल्यामुळें आमचा राजा राहिला नसल्याने त्यांने आम्हाला जे लावले होते ते अवैध झाले. कौरवांनी सांगावे अशा परिस्थितीत काय निर्णय घ्यावा".

वैशंपायन पुढे सांगतात, त्यांचे असें बोलणे चालू असतांना नेमके त्याच वेळी एका कोल्ह्याचे मोठ्याने ओरडणे धृतराष्ट्राच्या घरातून ऐकू येऊ लागले. त्या बरोबर आजुबाजूची खेचरं सुद्धा खिंकाळू लागली. त्याच वेळी आकाशातील गिधाडं घिरट्या घालत त्या सभागृहाला फेर्या मारू लागली. कावळे जमा झाले व कर्णकर्कंश्य कांव कांव असे करून सर्व आसमंत भेसूर झाला. विदूर आणि सुवलाची मुलगी, गांधारी, दुर्योधनाची आई ह्याचा काय अर्थ ते समजून चुकले. त्या बरोबर सभेत बसलेले ज्ञानी लोक भिष्म, द्रोण, कृप, गौतम जोरांनो बोलू लागले, स्वस्ति! स्वस्ति! गांधारी व विदूर तो अशुभ संकेत समजले व धृतराष्ट्राला गांधारीने हे प्रकरण त्वरित मिटवण्याचे सांगितले. धृतराष्ट्र ते समजला व रागांने त्याच्या मुलांस ओरडून बोलला, "अरें नालायक मुला, तुझ्यामुळें सगळ्यांचा नाश होईल असें मी होऊ देणार नाही. जेव्हां तू त्या पांचांच्या पत्नीचा अपमान करत होतास तेव्हांच तू नाशाची बीज पेरत होतास". असें बोलून तो अंध राजा त्याच्या पत्नीच्या आदेशानुसार सारवासारावी करण्याचा प्रयत्न सुरु करतो. तो त्याचे व इतर मित्रांचे नातेवाईक ह्यांचे जीवन वाचवण्यासाठी मोठ्या दूरदृष्टीने पांचालीला जवळ बोलावून सांगतो, "तू माझी सर्वात मोठी सून आहेस. तुला काय मांगावयाचे आहे ते तू माझ्याकडे मांग, मी हस्तिनापुराचा राजा आहे. बोल तुला काय पाहिजे, जे पाहिजे ते मी तुला ताबडतोब देणार आहे. ह्या माझ्या मुलांच्या बोलण्याला तू पांडवांची समाईक पत्नी, महत्व देऊ नकोस". ते ऐकल्यावर ती द्रौपदी धृतराष्ट्राला बोलते, "जर तुम्ही मला वर मांगण्यास सांगत अहात तर मी मांगते कीं, प्रथम युधिष्ठीराला बंधनमुक्त करा. आमचा पुत्र, प्रतिविंध्य, आहे तो मोठा होत आहे, त्याला असें वाटता कामा नये कीं, तो एका गुलामाचा पुत्र आहे. तो सदैव स्वतःला राजपुत्र समजत आला आहे". ते ऐकल्यावर धृतराष्ट्र तिला

सांगतो, "अहो माझी पुण्यवान स्नुषा, तुझा हा वर मी मान्य केला व त्या प्रमाणे तुझा पति कोणाचाही दास राहिलेला नाही". तेवढ्याने राजाचे समाधान झाले नव्हते म्हणून तो कृष्णाला पुनः विचारतो, आणखीन एक वर मांग मी तोसुद्धा तुला देऊ इच्छितो". ते ऐकल्यावर द्रौपदी बोलते, माझी दुसरी मांगणी अशी किं, माझ्या इतर चार पतिंचीसुद्धा दास्यातून बिनशर्त मुक्तता झाली पाहिजे". धृतराष्ट्र ती मांगणीसुद्धा मोठ्या प्रेमांने कबूल करतो. त्यानंतर तो तिला आणखीन तिसरा वर मांग अशी विनंति करतो. धृतराष्ट्र तिला बोलतो, "एवढ्याने माझे समाधान झालेले नाही म्हणून तू आणखीन वर मांग. मी तोसुद्धा देणार आहे. तू माझी सर्वात श्रेष्ठ अशी मोठी सुन आहेस त्यामुळें तो तुझा हक्क होतो तरी तू काय मांगतेस ते सांग". ते ऐकल्यावर ती साध्वी द्रुपदाची कन्या जी सामान्य माणूस नव्हती कारण ती यज्ञजा (अग्नीकन्या) होती, त्याला सांगते, "अहो नरेशाधिपती, माणसाचा लोभ त्याला विनाशाकडे नेतो, मला कोणताही तिसरा वर मांगावयाचा नाही". ती पुढे सांगते, "अहो माझे दिव्य सासरेबुवा, असें समजतात किं, वैश्य एक वर मांगू शकतो, क्षत्रिय बाई दोन वर मांगू शकते, क्षत्रिय पुरुष तीन वर मांगू शकतो व ब्राह्मण शेकडो वर मांगू शकतो. त्याप्रमाणे मी माझे दोन वर मांगितले आहेत. माझा विश्वास आहे किं, जे घालवले आहे ते व त्याही पेक्षा जास्त पुन्हा मिळवण्याची हिम्मत माझ्या पतींमध्ये आहे.

अशारितीने सभापर्वातील द्युत पर्वाचा एकाहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग बाहत्तरावा

(द्युत पर्व पुढे चालू)

कर्ण ते सगळे पाहून बोलतो, "आम्ही आजवर असा प्रकार पाहिल्याचे आठवत नाही जसे ह्या द्रौपदीने केले आहे. जेव्हां हे दोन चुलत भाऊ एकमेकांशी टक्कर देत होते तेव्हां ही पांडवांची पत्नी पांडवांना संरक्षण अशा विलक्षण पद्धतीने देईल अशी साधी कल्पनासुद्धा कोणी केली नसेल. जणूकाय कौरव पांडवांच्या वादळरुपी सागरातून कृष्णा तारण कर्त्या होडीसारखी उपस्थित झाली असें दिसते".

वैशंपायन सांगत असतात, कुरुंच्या गोतावळ्यात बसलेल्या कर्णाचे ते खोचक बोलणे ऐकल्यामुळें सांतापलेला भिम त्याच्या भावाला उद्देशून बोलतो, "अरें अर्जुना, देवल ऋषीनी एकदा सांगितले आहे कीं, प्रत्येक माणसांत तीन आशास्थानं असतात, एक त्याची अपत्ये, दुसरे त्याचे कर्तृत्व आणि तिसरे त्याचे ज्ञान. त्या तिघांतून पुढील निर्मिती होत असते. जेव्हां मरण येते व शरीर निस्तेज होते व त्याचा नाश केला जातो तेव्हां हे तीन एकत्र राहून त्या आत्म्यास पुढचा मार्ग दाखवतात. परंतु, आपल्यातील हा दिवा आपल्या बायकोच्या अपमानाने मंद झाला आहे. तू मला सांग, अशा अपमानित पत्नीपासून आपल्याला तेजस्वी संतति मिळू शकते"? ते ऐकल्यावर अर्जुन त्याला शांत करण्यासाठी बोलतो, "अहो भरतकुलीन राजपुत्रा, फालतु लोकांच्या टीकेला व त्यांच्या कडून होणार्या अपमानाला कुलीन माणसे महत्व देत नाहीत. कुत्री भुंकणारच, त्या भुंकण्याचा एवढा विचार करणे श्रेयस्कर नसते. कोणत्याही लोकांकडून कांहीं चांगले त्यांच्यात असेल तेवढेंच शहाणी माणसें अजमावतात, त्यांच्या मूर्खपणाचा विचार करत नाहीत. कारण अशारितीने त्या गोष्टींचा विचार करण्याने आपण आपली शक्ती व्यर्थ घालवत असतो". ते ऐकूनही भिमाचा कौरवांवरील क्रोध कमी झालेली नसतो. तो अर्जुनाला विचारतो, "अरे धनंजया, मी विचार करतो आत्ताच्या आत्ताच ह्या कौरवांचा नाश करून टाकावा. म्हणजे सगळी पृथ्वी आत्ताच आपल्या कडे पुन्हा येईल व सगळे उटके (सूड) काढता येईल. ह्या साभागृहाबाहेर जाऊन त्यांना मी आव्हान देतो पाहू ते काय करतात. इकडच्या इकडेच सारा सोक्षमोक्ष करून टाकू, कसं वाटते तुला"? असें बोलून तो नरकेसरी आजू बाजूला त्याची जळळीत दृष्टी टाकतो. त्याच्या सर्वंगातून अग्नी मधून जसा धूर निघतो तसा धूर

येऊ लागतो. ठिणग्या बाहेर पडू लागतात. त्याचा चेहरा भयंकर भासू लागतो. त्याने रुद्रावतार घेतलेला असतो जणू. साक्षात यम अवतरला आहे असें ते दिसत होते. विश्वाच्या अंत समई जे स्वरुप काळ घेतो तसे ते भिमाचे रुप झाले होते. ते पाहिल्यावर त्यांचा मोठा भाऊ युधिष्ठीर त्याला मिठी मारून विनंती करतो किं तुर्त त्या सगळ्या गोष्टी पासून आपण दूर राहिले पाहिजे. "शांत हो वृकोदरा, जरा दमांने घे". त्याला शांत केल्यानंतर तो यमाचा अंशावतार युधिष्ठीर धृतराष्ट्राला जवळ जाऊन लवून नमस्कार करतो व त्यांची रजा मांगतो.

अशा रितीने सभापर्वातील द्युतपर्वाचा बाहत्तरावा भाग संपला.

# सभा पर्व भाग त्र्याहत्तरावा

(द्युत पर्व संपले)

युधिष्ठीर त्याचा काका धृतराष्ट्राला सांगतो, "अहो राजन, आपण आमचे धनी अहात. आपणच आम्हाला आज्ञा द्यावी कीं, ह्यापुढे आम्ही कसे करावे. आम्ही पंडुपुत्र आपल्या आज्ञेत सदैव राहू इच्छितो".

ते ऐकून तो अंध राजा बोलतो, "अरे अजातशत्रू, माझ्या आवडत्या पुतण्या, जा तुझ्या राज्यात तेथे तुझी सगळी संपत्ती तुझीच आहे, कांहीं फरक झालेला नाही. तो एक खेळ होता व तो आता संपला आहे. जी कटुता त्या प्रसंगाने उत्पन्न झाली ती सगळी विसरून जा व शांतपणे तुझे राज्य सांभाळ व उत्कर्ष कर. ह्या तुझ्या म्हातार्या चुलत्याचा आदेश मानून तुम्ही सगळे सुखात रहावे अशी माझी म्हातर्याची इच्छा आहे. तू नैतिकतेच्या लवचिक तर्हा समजून आहेसच. तू शहाणा, सूज्ञ आहेस व वडिलधार्याचा सन्मान करणारा आहेस, जेथे शहाणपण आहे तेथे दूरदृष्टी सुद्धा असते, म्हणून तुझ्या आत्म्याचा आवाज ऐक व त्यानुसार तुझी कामं करीत जा. तू नेहमी शांततेच्या मार्गाचा अवलंब करशिल असें पहा. लक्षात ठेव कुर्हाड लाकडावर मारतात, दगडावर नाही. तू माझ्या दुर्योधनासारखा उताविळ नाहीस, ते लोक पुढे जातात जे जुन्या वैरभावात अडकून न घेता नवीन मार्ग शोधतात. तुझ्या शत्रूचे गुण पहा, त्यांच्या दोषाकडे दुर्लक्ष कर. तू स्वतः शत्रूत्व सुरु करू नकोस. एक लक्षात ठेव चांगले काम चांगले परिणाम देतात व वाईट काम वाईट. उत्तम चांगुलपणा म्हणजे दुसर्याचे, त्याच्या कडून कोणतीही अपेक्षा न ठेवता चांगले करवे, तसे तू कर. अरें युधिष्ठीरा, वाईट माणसें भांडतांना कटू बोलतात. जे तटस्थ असतात ते कामा पुरते बोलतात, परंतु, ते जे चांगले असतात ते वाईट भाषणाला चांगल्या भाषणाने जाब देतात. जे स्वताचे सुख दुःख समजतात ते त्यावरून दुसर्याचे सुख व दुःख ओळखतात. म्हणून तू फक्त त्यांचे जे चांगले आहे तेवढे लक्षात ठेवशील आणि जे वाईट केले ते विसरशील. तू अगदी वाईट परिस्थितीत सुद्धा मोठ्या शांतपणे वागला आहेस, माझ्या मुलांने त्याच्या मर्यादा ओलंडल्या तरी तू व तुझे भाऊ त्यांच्या नैतिकतेच्या मर्यादा पाळत राहिले हे विशेष होते, तसेंच वागत रहा. आपले खरे जीवन मरणानंतर सुरु होते व त्यासाठी तयारी ह्या मनुष्य जन्मात करावयाची असते. जे हेंच आयुष्य समजून छोट्या

फायद्यांसाठी नैतिकतेचा बळी देतात त्यांचे मरणानंतरचे जीवन फार दुःखमय होते. तू हे चांगलेच समजतोस. म्हणून माझ्या मुलांचे कटू वागणे, बोलणे मनावर न घेता तू त्यांच्याशी प्रेमांने वागावे असें मला वाटते. तू हे तुझ्या धाकट्या भावंडांना समजावून सांग. जरा आम्हा तुझ्या काका व काकीकडे पहा. त्यांना तुमच्या मदतीची केव्हाही गरज होऊ शकते तेव्हां, तुम्ही सगळे आम्हा दोघा अंधांना मदतीला धावून यावे. तुला एक गोष्ट सांगतो, मला वाटले होते किं, ह्या द्युताच्या मैत्रीपूर्ण खेळामुळें माझी मुलं कांही चांगुलपणा शिकतील म्हणून मी त्या खेळाला परवानगी दिली पण तू पहात आहेस काय झाले! आता माझी भिस्त फक्त तुझ्यावर आहे. तूंच काय ते करू शकशिल. जेथे तुझ्या सारखे कुरुवंशी आहेत तेथे अन्याय होणार नाही. हेंच तुझे श्रेष्ठत्व आहे. पण माझ्या मुलांला ते समजत नाही. परंतु आता मला समजले किं, माझी मुलं सुधारणार नाहीत. जे राजे तुमच्या बरोबर आहेत व तो प्रधान मंत्री माझा भाऊ विदूर अशा सगळ्यानी कांहीं चिंता करू नये कारण त्यांना कोणताही त्रास ह्यापुढे माझ्या दुर्योधना कडून होणार नाही. तुझे पुण्य, अर्जुनाचा संयम, भिमाचे शूरत्व, नकुल व सहदेव ह्यांची ज्येष्ठां प्रती असलेली सन्मानाची भावना ह्या सगळ्यांचा मी आदर करतो. तुम्ही सगळे पांडव व तुमचे राजे सहकारी धन्य झाला अहात. अरें अजातशत्रू, आता तू तुझ्या परिवारासह तुमच्या राज्यात खांडवप्रस्थाकडे निघा. कृपा करून तुम्ही व तुमचे चुलत भाऊ ह्यांच्यात प्रेमभाव वृद्धींगत होवो. झाले गेले विसरून जा. वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर व त्याची चार भावंड त्याच्या काकाच्या अशा आश्वासनाने संतुष्ट होऊन नम्रपणे, आपल्या निवासस्थानी निघाले. त्यांच्या बरोबर त्यांची पत्नी द्रौपदी असते. अगदी आनंदात ते सगळे आपापल्या रथांत बसून इंद्रप्रस्थाकडे निघतात.

अशारितीने सभापर्वातील द्युतपर्वाचा त्र्याहत्तरावा भाग संपला.

## – महाभारत सभा पर्वाचा खंड दुसरा संपला –

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल देत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत

नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चानें शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विचारांमुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर तो ब्लॉग बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा

ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ २०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद